रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक २१५ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## मुलानं जन्मदात्यांनाच संपवलं

**नागपूर :** कपिलनगर पोलीस ठाण्यांतर्गत नववर्षाच्या पहिल्याच दिवशी दुहेरी हत्याकांडाची घटना उघडकीस आली आहे. मुलाने स्वतःच्या आई-वडिलांचीच निर्घुणपणे हत्या केली आहे. घटनेनंतर त्याने पोलीस आणि नातेवाईकांचीही दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. माय-बापाची हत्या नाही तर आत्महत्या असल्याचा बनावही रचण्याचा प्रयत्न त्याने केला. मात्र पोलिसी खाक्या दाखवल्यानंतर त्याने हत्येची कबुली दिली आहे. लिलाधर डाखोळे आणि अरुणा डाखोळे असे आईवडिलांचे नाव असून आरोपी मुलाचे नाव उत्कर्ष डाखोळे आहे. •> पान २ वर

रायगड, गुरुवार, दि. २ जानेवारी २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹

## थकबाकी न भरणाऱ्यांना दिलासा

**मुंबई :** बिलाच्या थकबाकीमुळे वीज कनेक्शन कायमस्वरुपी तोडलेल्या राज्यातील घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वीज ग्राहकांसाठी सुरू केलेल्या महावितरण अभय योजनेला ग्राहकांच्या मागणीनुसार ३१ मार्च २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत वीजबिलाच्या थकबाकीवरील संपूर्ण व्याज आणि विलंब आकार माफ होत असल्यामुळे वाढीव मुदतीत ग्राहकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले.राज्यातील महावितरणच्या ३१ मार्च २०२४ पर्यंत •> पान २ वर

**आजचा अग्रलेख**

**इस्त्रोची नवी भरारी**

### वे|ध|क

## जमीन विक्री प्रकरणी गुन्हा दाखल

**तळा :** तळा तालुक्यातील पढवण येथील २०११ ते २०१४ या दरम्यान झालेल्या अपात्र व्यक्तींना जमीन विक्री प्रकरणी तळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष नाना भौड, तत्कालीन तहसीलदार कविता जाधव, तलाठी सदानंद कुडाळकर, तलाठी एस.एस.सातांबेकर, राम चंद्र पांडुरंग काजारे, हरी नारायण हुमने, विश्राम गणू घाणेकर, नारायण जाणू तांबिटकर व धर्मा पवार अशी आरोपींची नावे आहेत. सविस्तर वृत्त असे की, तळा तालुक्यातील पढवण येथे २०११ ते २०१४ या काळात पात्र असलेले कुळधारक यांच्याऐवजी ज्यांच्या नावे मिळकती नाहीत, त्या व्यक्तींच्या •> पान २ वर

## देशमुख हत्या चौकशीसाठी एसआयटी

**बीड :** बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाने संपूर्ण राज्यात संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी मागणी सर्व स्तरातून केली जात आहे. यादरम्यान महाराष्ट्र सरकारने मोठा निर्णय घेत सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या तपासासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा सध्या सीआयडीकडून तपास सुरू असून आतापर्यंत दीडशेहून अधिक जाणांची या प्रकरणात चौकशी करण्यात आली आहे. या प्रकरणात दोन कोटींची खंडणी आणि हत्या या दोन्हींच्या संबंधाच्या अनुषंगाने तपास केला जात आहे.

## पवार एकत्र येणार?

**मुंबई :** आता नव्या वर्षाच्या पहिल्या दिवशी अजित पवारांच्या मातोश्री आशाताई पवार यांनी विठूरायाला दोन्ही पवार एकत्र येऊ दे, असं साकडं घातलं. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे नेते तथा खासदार प्रफुल पटेल यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, आम्ही शरद पवारांना सदैव दैवत मानत आलेलो आहोत. आम्ही राजकीय वेगळा मार्ग स्वीकारला असला तरीही आम्हाला शरद पवारांबद्दल सदैव आदर राहिलेला आहे आणि जर शरद पवार व अजित पवार एकत्र आले तर आम्हाला आनंदच वाटेल, असं खासदार प्रफुल पटेल यांनी म्हटलं आहे. शरद पवार यांना विनंती करू की आता तुम्ही एकत्र या, असं नरहरी झिरवळ म्हणाले आहेत.

# 11 हजार हेक्टर जमीन संकटात

**पाली भुतवलीच्या मानेवर सरकारी भूत**



**कालव्यांची लांबी**

| एकूण | उजवा कालवा | डावा कालवा | मुख्य कालवा |
|---|---|---|---|
| 15 किलोमीटर | 4 किलोमीटर | 10 किलोमीटर | 1 किलोमीटर |

**कालव्याचे काम रखडले, 1100 हेक्टर जमीन कोरडीठाक**

**ओलिताखाली येणारी गावे:** भुतीवली, आसल, आसलपाडा, वडवली, माणगाव, बेकरे, एकसळ, आंबिवली, चिंचवली, गारपोली, डिकसळ, वावे, बार्डी, उमरोली, आषणे, कोषाणे आणि सावरगाव

| नेरळ | प्रतिनिधी |

**कर्जत तालुक्यातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी आणि जमीन ओलिताखाली आणण्यासाठी बांधलेले पाली भुतीवली धरण स्थानिक शेतकऱ्यांच्या कोणत्याही फायद्याचे ठरलेले नाही. धरणाचे पाणी शेतीसाठी सोडण्यासाठी बांधण्यात येणारे १५ किलोमीटर लांबीचे कालवे बांधून झालेले नाहीत. दरम्यान, कालवे बांधण्यासाठी आवश्यक असलेल्या जमिनीचे अधिग्रहण करण्यात पाटबंधारे विभाग उदासीन असल्याचे दिसून येते. त्यामुळे शेतकऱ्यांची मागणी असून देखील कालवे बांधले नसल्याने ११०० हेक्टर जमीन मागील २० वर्षात ओलिताखाली येऊ शकली नाही.**

कर्जत तालुक्यातील पाली भुतीवली येथील लघुपाटबंधारे प्रकल्पाच्या कामाला १९९८ मध्ये सुरुवात झाली आणि धरणाच्या मुख्य जलाशयात २००४ मध्ये पाणी साठा झाला. कोणत्याही धरणाची निर्मिती होत असताना धरणाच्या एकूण कालव्यांच्या २५ टक्के कालव्यांची कामे मुख्य बांधाचे काम पूर्ण होत असताना पूर्ण करण्याचे बंधनकारक असते. त्याचे कारण धरणातील पाणी कालव्यांच्या माध्यमातून जमीन ओलिताखाली आणण्यासाठी उपयोगात आणले जाते. मात्र पाली भुतीवली धरणात २००४ मध्ये पाणी साठा होत असताना कालव्यांची कामे बांधण्यात आली नव्हती. २००४ मध्ये धरणाचे पाणी शेतीसाठी सोडण्यात यावे, यासाठी किमान साडेचार किलोमीटर लांबीचे कालवे बांधून पूर्ण व्हायला हवे होते. मात्र आज २० वर्षातदेखील पाली भुतिवली धरणाचे पाच किलोमीटर लांबीचे कालवे बांधून पूर्ण झालेले नाहीत.

पालीभुतीवलीधरणपाणीटंचाई दूर करण्यासाठी, शेतीसाठी, जमीन ओलिताखाली आणण्यासाठी बांधण्यात आले. मात्र पाटबंधारे खात्याने कालवे बांधण्यासाठी त्या-त्या भागातील कालव्यांच्या मार्गातील शेतकऱ्यांच्या जमिनीचे अधिग्रहण करण्याची कार्यवाही केली नाही. धरणातील पाणी मुख्य विहिरीमधून कालव्यात सोडताना मुख्य कालवा एक किलोमीटर लांबीचा खोदण्यात येणार होता. त्यानंतर उजवा आणि डावा असे अन्य कालवे खोदण्याचे नियोजन धरणाचे काम सुरू होत असताना पाटबंधारे विभागाने केले होते. त्यात उजवा कालवा हा चार किलोमीटर लांबीचा तर डावा कालवा हा १० किलोमीटर लांबीचा बांधण्यात येणार होता.

### कालव्यांच्या मार्गात बांधकामे

- पाली भुतीवली धरणाचे पाणी ज्या कालव्यातून सोडले जाणार आहे. त्या मार्गाचे ड्रोन सर्वेक्षण करण्यात आले होते. त्याचवेळी मार्गदेखील निश्चित करण्यात आला होता. मात्र त्यानंतर देखील कालव्यांच्या मार्गावर बांधकामे करण्यात आली आहेत. त्यामुळे कालव्यांच्या बांधकाम करण्यावर बंधने येऊ शकतात. परिणामी, १९९८ मध्ये कालवे प्रस्तावित असताना कालव्यांच्या मार्गावर बांधकामांना परवानगी देणाऱ्या संस्थांवर शासन कारवाई करणार का?

> **आम्ही शेतकरी गेल्या २० वर्षापासून उन्हाळी शेती करण्यासाठी पाण्याची वाट पाहत आहोत. भातशेती करून येथील शेतकरी सधन होईल म्हणून आम्ही प्रकल्पग्रस्त संघर्ष करीत आहोत. शेतीसाठी पाणी मिळाले पाहिजे, यासाठी आता तरुण शेतकऱ्यांनी पुन्हा एकदा चळवळ सुरू केली आहे आणि तरुणांच्या प्रयत्नांना नक्कीच यश मिळेल.**
>
> **– आत्माराम पवार,** शेतकरी

> **कालव्यांच्या काही जमीनींपैकी काही ठिकाणी वन जमीन अंतर्गत भाग येत असल्याने वन विभागाच्या परवानगीसाठी प्रस्ताव केले आहेत. तर खासगी जमिनीचे हस्तांतरण करण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरू आहेत.**
>
> **– एस.डी.शिंदे,** उपअभियंता, पाटबंधारे विभाग

## मंत्री भरत गोगावले पदभारापासून दूर

### कार्यकर्त्यांना धाकधूक, नागरिकांमध्ये चर्चांना उधाण

| रायगड | खास प्रतिनिधी |



राज्यात महायुतीला प्रचंड बहुमत मिळाल्यानंतर मंत्रिमंडळ विस्ताराला विलंब झाला होता. खातेवाटपझाल्यानंतरही अद्यापही काही मंत्र्यांनी आपल्या खात्याचा पदभार स्विकारलेला नाही. त्यामध्ये रायगड जिल्ह्यातील रोजगार हमी योजना फलोत्पादन मंत्री आ. भरत गोगावले यांचाही समावेश आहे. परिणामी, गोगावलेंच्या कार्यकर्त्यांची धागधूग वाढली असून आता नवा ट्विस्ट आला तर पुन्हा टीकेला सामोरे जावे लागेल, अशी भिती त्यांच्यामध्ये असल्याचे चित्र दिसून येत आहे.

गेली काही दिवस काही मंत्री सुट्ट्यांचा आनंद उपभोगत आहेत. काही परदेशवारीला गेले असल्याने पदभार स्विकारण्यास विलंब होत असल्याचे बोलले जाते. याबाबत रोजगार हमी मंत्री आमदार भरत गोगावले यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी २ किंवा ३ जानेवारी रोजी कॅबीनेटची बैठक होईल. त्यानंतर मंत्री आपापल्या खात्याचा पदभार स्विकारतील, असे सुतोवाच केले. रायगड जिल्ह्याचा मीच पालकमंत्री होणार याचा देखील त्यांनी पुनरुच्चार केला. विविध मंत्र्यांनी आपापल्या खात्याचा पदभार न घेतल्याने राज्यातील जनतेचा विकास वाऱ्यावरच असल्याचे दिसून येते.

शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये (अजित पवार) पालकमंत्रिपदावरून वाद सुरू असल्याची जोरदार चर्चा आहे. यावरून काही जिल्ह्यामध्ये संघर्ष तीव्र होण्याची शक्यता आहे. शिवसेना, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस या तिन्ही पक्षांना महाराष्ट्रात आपली पकड प्रस्थापित करायची आहे आणि अशा स्थितीत तिन्ही पक्षांच्या बड्या नेत्यांना प्रत्येक खात्यात आणि जिल्ह्यात मंत्री केले आहे. त्यामुळे सर्वच पक्षांना पालकमंत्रिपद हवे आहे. रायगड जिल्ह्यातदेखील पालकमंत्री पदावरुन आमदार भरत गोगावले आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार आदिती तटकरे यांच्यामध्ये चढाओढ सुरु आहे.प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर महायुती सरकारमध्ये मंत्र्यांना शपथविधी झाल्यानंतर खातेवाटप करण्यात आले. मात्र, आता खातेवाटप झाल्यानंतर मंत्र्यांना दालने देण्यात आली असली, •> पान २ वर

## नववर्षाचे नशीले सेलिब्रेशन भोवले

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

नववर्षाच्या स्वागतासाठी हडपसर पुणे येथून आलेल्या तरुणांना गांजाचे सेवन करताना श्रीवर्धन पोलीसांनी रंगेहाथ पकडले. श्रीवर्धन येथे नव वर्षाच्या स्वागतासाठी हजारो पर्यटकांनी हजेरी लावली होती. परंतु पुणे, हडपसर येथून आलेले तरुण श्रीवर्धन समुद्रकिनारी असलेल्या सुशोभीकरण केलेल्या धुपप्रतिबंधक बंधाऱ्यावरती गांजा घेत असल्याची बातमी श्रीवर्धन पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी त्या ठिकाणी पाहणी केली असता गांजा पिणारे तरुण आढळून आले.

सनी चव्हाण (२७), साहिल सुतार (२१), सोमनाथ बनसोडे (२३), आशिष राजगिरे (१९) आणि शिवा राठोड (१९) अशी सर्व आरोपींची नावे आहेत. हे सर्वजण हडपसर •> पान २ वर

**आठवड्यातील दुसरी घटना, पर्यटकांची सुरक्षा ऐरणीवर**

## काशीदमध्ये पर्यटकाचा मृत्यू

| आगरदांडा | प्रतिनिधी |

मुरुड व काशीद समुद्र किनारी थर्टी फर्स्ट साजरा करण्यासाठी हजारोंच्या संख्येने पर्यटक दाखल झाले होते. पुणे येथील जैनवाडी जनता वसाहतीमधील पर्यटक सहस्त्रबुद्धे हे आपल्या मित्रांबरोबर याठिकाणी आले होते. मंगळवारी दुपारी ३ वाजुन ३० मिनिटांच्या दरम्यान प्रतिक प्रकाश सहस्त्रबुद्धे (वय ३१) हा समुद्राच्या पाण्यात पोहण्यास गेला असता त्याला पाण्याचा अंदाज आला नाही आणि तो खोल समुद्रात खेचला गेला. परिणामी, पाण्यात बुडून त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही आठवड्यातील दुसरी घटना असल्याने पुन्हा एकदा पर्यटकांचा सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

पुणे येथुन थर्टी फर्स्ट साजरा करण्यासाठी भाडोत्री रिक्षा घेऊन प्रतिक प्रकाश सहस्त्रबुद्धे, गणेश नितिन सहस्त्रबुद्धे, रिक्षा चालक-शदाब अविद मलीक, राकेश राजु पवार हे चौघे मित्र फिरण्यास आले होते. दुपारच्या दरम्यान चौघे मित्र समुद्राच्या पाण्यात पोहण्यास उतरले होते. पोहुन झाल्यानंतर स्पोर्ट बाईकवर फिरु, असा बेत ठरला. त्याकरिता आपल्या गाडीतुन पैसे आणण्याकरिता ते बाहेर आले आणि प्रतिक सहस्त्रबुद्धे हा पाण्यात पोहत राहिला. तिघांना वाटलं की, प्रतिकही पाण्यातुन बाहेर आला असेल आणि कुठेतरी फिरत असेल. दिड तासानंतर प्रतिक सहस्त्रबुद्धे हा पाण्यात तरंगताना सुरक्षा रक्षकांना दिसला. ताबडतोब घटनास्थळी असलेले पोलीस व सुरक्षा रक्षकांनी समुद्राच्या पाण्यात उतरून प्रतिक सहस्त्रबुद्धे याला बाहेर काढले. परंतु प्रतिक हा प्रतिसाद देत नसल्याने त्यास पोलिसांनी ताबडतोब मुरुड ग्रामीण •> पान २ वर

## नववर्षाच्या पहिल्याच दिवशी उपोषणाचा एल्गार



● रिलायन्य विरोधात उपोषणाला बसलेले प्रकल्पग्रस्त.



● पोलिसांविरोधात उपोषणाला बसलेले पिडीत दाम्पत्य

### जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ग्रामस्थांचा हक्कासाठी लढा

| अलिबाग | प्रतिनिधी |

सर्वत्र नव वर्षाचं जल्लोषात स्वागत होत असतानाच प्रकल्पग्रस्त मात्र प्रलंबित मागण्यांसाठी तसेच न्याय हक्कासाठी रस्त्यावर उतरले असल्याचं चित्र जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बुधवारी (दि.१) दिसून आलं. नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी पोलिसांच्या संशयास्पद भूमिकेविरोधात पिडीत महिला व रिलायन्य कंपनीने केलेल्या अन्यायाविरोधात प्रकल्पग्रस्त उपोषणाला बसले होते.

पोयनाड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हाशिवरे दुरक्षेत्रातील पोलीस हवालदार अमोल घरत यांनी तक्रार घेण्यास टाळाटाळ केल्याप्रकरणी पिडीत महिलेने आवाज उठविला आहे. पोलिसांच्या या भूमिकेविरोधात महिलेने व तिच्या पतीने उपोषण सुरू केले आहे. पोलीस हवालदार अमोल घरत असे या पोलीस कर्मचाऱ्याचे नाव आहे. ते हाशिवरे येथील पोलीस दुरक्षेत्रामध्ये कार्यरत आहेत. १३ ऑक्टोबर २०२३ रोजी पिडीत महिला त्यांच्या घराबाहेर सुकलेले कपडे काढत होत्या. त्यावेळी आरोपींनी विनयभंग करण्याबरोबरच तिला मारहाण केली. याप्रकरणी हाशिवरे येथील पोलीस दुरक्षेत्रामध्ये जाऊन पिडीत महिलेने तक्रार केली. पोलिसांनी तक्रार दाखल केली. परंतु काही आरोपींविरोधात त्यांनी तक्रार घेतली नाही. याबाबत महिलेने अनेकवेळा पोलीस हवालदार घरत यांच्या ही बाब निदर्शनास आणून दिली. मात्र त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप •> पान २ वर

> **रुग्णालयात उपचारादरम्यान दिलेल्या जबाबात महिलेने एकच आरोपीचे नाव सांगितले होते. त्यानंतर आपसात विषय मिटविण्याचा प्रयत्न केला जाईल, असे सांगितले होते. परंतु तो प्रश्न सुटला नसल्याने त्यांनी पुन्हा पोलीस ठाण्यात येऊन अन्य आरोपींविरोधात तक्रार करण्याची मागणी केली आहे. तपासात त्यांचा काहीही संबंध नसल्याचे दिसून आले आहे. तसेच याप्रकरणात पोलीस हवालदार घरत यांचा काहीही संबंध नाही.**
>
> **– संतोष दराडे,** सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोयनाड

## रिलायन्सविरोधात प्रकल्पग्रस्त आक्रमक

रोहा तालुक्यातील नागोठणे येथील आयपीसीएल, रिलायन्स कंपनीसाठी परिसरातील असंख्य शेतकऱ्यांनी जमीनी दिल्या. परंतु अनेक प्रकल्पग्रस्त कायम नोकरीपासून वंचित आहेत. कायम नोकरी मिळावी, यासाठी अनेक वेळा जिल्हा प्रशासनाकडे बैठका झाल्या. फक्त प्रशासनाकडून आश्वासने देण्यात आली. प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही झाली नाही. प्रकल्पग्रस्तांची न्यायाची निर्णायक संयुक्त बैठक गेल्या अनेक महिन्यांपासून प्रलंबित आहे. ही बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी अनेक वेळा प्रशासनाकडे मागणी केली. परंतु त्याबाबत दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या प्रकल्पग्रस्तांनी आमरण उपोषण करण्याचा निर्धार केला आहे. पुष्पा भोईर, दत्तात्रेय कुथे, रोशन जांबेकर, सुमीत शिर्के योगेश पाटील यांनी बुधवारपासून उपोषण सुरु केले आहे. या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी राकेश जवके, संजय कुथे, सुरेश कोकाटे, मनोहर माळी, स्मिता दाभाडे आदींसह असंख्य महिला, ग्रामस्थ, प्रकल्पग्रस्त व तरुणांनी सहभाग घेतला आहे. संस्थेचे अध्यक्ष गंगाराम मिनमीने यांच्या नेतृत्वाखाली हा लढा पुकारण्यात आला आहे.

**नवी मुंबई वाहतूक पोलिसांची धडक कारवाई**

**वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या दोन हजार ३५७ वाहन चालकांवर उगारला कायद्याचा बडगा**

## पोलिसांनी उतरवली मद्यपींची झिंग

| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |

नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी घराबाहेर पडून मद्यपान करून वाहन चालवणाऱ्या २६६ वाहन चालकांची झिंग वाहतूक पोलिसांनी उतरवली आहे. तसेच ३१ डिसेंबर रोजी नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिसरात बंदोबस्तावेळी करण्यात आलेल्या कारवाईत वाहतुकीचे नियम न पाळणाऱ्या २ हजार ३५७ वाहन चालकांवर मोटर वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यात आल्याची माहिती वाहतूक विभागाच्या उपयुक्तांकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या पत्रकात देण्यात आली आहे.

जगभरात नवीन वर्षाच्या स्वागताला मोठ्या प्रमाणात जल्लोष साजरा केला जातो. हा जल्लोष साजरा करण्यासाठी अनेकजण मद्यपान करतात आणि वाहन चालवतात. मद्यपान करून वाहन चालवली जात असल्याने अनेक ठिकाणी अपघात होतात. ज्यात अनेकांना गंभीर दुखापत होते, तर कित्येक जणांना आपला जीव गमवावा लागतो. याला आळा घालण्यासाठी वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन होऊ नये आणि अपघात कमी व्हावे, यासाठी वाहतूक पोलिसांनी विशेष पथके तैनात केली होती. मंगळवारी (ता.३१) देखील नव वर्षाच्या स्वागतासाठी मद्यपानकरून वाहन चालवली जाण्याची शक्यता लक्षात घेता वाहतूक विभागाकडून महामार्ग तसेच शहराच्या विविध भागात नाकाबंदी करण्यात आली होती.

सायंकाळी आठ ते पहाटे पाच दरम्यान नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिसरातील पोलीस ठाण्याच्या हद्दीतील परिसरात करण्यात आलेल्या नाकाबंदी दरम्यान दुचाकी आणि चारचाकी अशा जवळपास २६६ वाहन चालकांनी मद्यपान केल्याचे आढळून आले. अशा वाहन चालकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्त, पोलीस सह आयुक्त, पोलीस उपआयुक्त, वाहतुक विभाग, सहायक पोलीस आयुक्त, वाहतुक विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली. यापुढेही वाहतुकीच्या नियमांची पायमल्ली करुन बेजबाबदारपणे वाहन चालविणाऱ्या वाहन चालकांवर वेळोवेळी वाहतुक विभागाकडून कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे वाहन चालकांनी वाहतुकीचे नियमांचे पालन करावे व वाहतुक सुरळीत ठेवण्यात नवी मुंबई वाहतुक विभागास सहकार्य करावे, असे आवाहनही प्रसिध्दी पत्रकात केले आहे.

## पर्यटक निघाले परतीच्या मार्गावर



● (छायाचित्र : समीर मालोदे)

### प्रवाशांच्या सुखकर प्रवासासाठी पोलिसांनी कसली कंबर

| अलिबाग | प्रतिनिधी |

फटाक्यांची आतषबाजी, जल्लोष करीत हॅप्पी न्यू इयर बोलत, नवीन संकल्प करीत प्रत्येकाने आपआपल्या परीने २०२५ या नववर्षाचे जल्लोषात स्वागत केले. नवी आशा, नवे स्वप्न घेत बुधवारी सकाळी पर्यटक त्यांच्या परतीच्या मार्गावर निघाले. पर्यटकांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी नाक्या-नाक्यावर पोलिस तैनात केले होते.

सरत्या वर्षाला निरोप दिल्यानंतर पर्यटक पहाटेपासून त्यांच्या परतीच्या मार्गावर निघाले. मुंबई-गोवा, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग, जिल्हा मार्ग, अलिबाग-मुरुड अलिबाग-पेण मार्गावर वाहतूक कोंडी निर्माण होऊ नये यासाठी जिल्हा वाहतूक शाखेचे ९२ पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते. एकाच वेळी पर्यटक बाहेर पडल्याने वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. प्रवाशांच्या सुरक्षेबरोबरच त्यांना त्यांच्या निश्चित स्थळी पोहचता यावे, यासाठी वाहतूक पोलिसांनी कंबर कसली. सकाळपासून सुरु झालेल्या वाहनांच्या वर्दळीतून कुठेही वाहतूक कोंडी झाली नसल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. एकाच ठिकाणी वाहने उभी न राहता ती सुरळीत •> पान २ वर

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणात ११७ जणांची नियुक्ती

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत पनवेल तालुक्यातील ७१ ग्रामपंचायतपैकी ६९ ग्रामपंचायतमध्ये ६९ जणांची आणि पंचायत समितीत वेगवेगळ्या विभागांमध्ये ४८ अशा ११७ जणांची नियुक्ती करण्यात आली आहे. ग्रामपंचायत, पशु विभाग, पाणी पुरवठा विभाग, शिक्षण, पनवेल पंचायत समिती, आरोग्य केंद्र या ठिकाणी कार्यरत आहेत.

या योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना ६ हजार रुपये, आयटीआय व पदविकाधारक विद्यार्थ्यांना ८ हजार तर पदवीधर, पदव्युत्तर विद्यार्थ्यांना १० हजार रुपये विद्यावेतन दरमहा डीबीटी पद्धतीने देण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थी महिन्यातून १० दिवस अथवा त्यापेक्षा जास्त दिवस गैरहजर असला तर, सबंधित प्रशिक्षणार्थीस त्या महिन्याचे विद्यावेतन देण्यात येणार नाही. यापैकी ६९ जण ग्रामपंचायतमध्ये, ६ जण पशु विभागात, ५ जण प्राथमिक आरोग्य केंद्रात, ९ जण पंचायत समितीत, १३ जण बांधकाम विभागात, दोन जण पाणीपुरवठा विभागात इतर आरोग्य विभाग आणि आयसीडीएसमध्ये कार्यरत आहेत.

प्रत्येक युवक-युवतींना शिक्षणानुरूप रोजगाराच्या संधी मिळाव्यात यासाठी युवक-युवती आणि त्यांचे पालक जागरूक असतात. राज्य शासन देखील त्यांच्या रोजगार निर्मितीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करीत असते. युवा वर्गाचे शिक्षण पूर्ण झाल्यांनतर वेळेत योग्य मार्गदर्शन आणि व्यवसाय करणाऱ्यांसाठी भांडवल उपलब्धता शासन विविध योजनांच्या माध्यमातून करून देत आहे. रोजगार इच्छुक युवक-युवती आणि रोजगार देणाऱ्या विविध आस्थापना यांच्यामध्ये संवाद आणि समन्वय साधून उद्योग क्षेत्राला आवश्यक असणारे कुशल मनुष्यबळ आणि युवा वर्गाला रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' सुरू केली आहे.

या योजनेत बारावी उत्तीर्ण, आय.टी.आय., पदविका, पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या युवकांना प्रशिक्षणाअंती अधिकाधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याबरोबरच विद्यावेतन देखील मिळत आहे.

## दोन बांगलादेशी नागरिकांवर कारवाई

**नवीन पनवेल :** खारघर पोलिसांनी दोन बांगलादेशी नागरिकांवर कारवाई करत त्यांना ताब्यात घेतले. रेहान नूर शेख (वय २८) आणि तारीफुल आरिफ शेख (वय १९) अशी दोघांची नावे आहेत.

३० डिसेंबर रोजी खारघर पोलिस शोध मोहीम राबवत असताना खारघर हिरानंदानी येथे बांगलादेशी नागरिक असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार टॅक्सी स्टँड जवळ दोन बांगलादेशी नागरिक सापडून आले ते नोडाईल, बांगलादेशी येथील असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्याकडे बनावट कागदपत्र सापडले.



## क्रांतिज्योत फाऊंडेशनचा सामाजिक उपक्रम

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करून त्यांची कोठडीत रवानगी होऊ नये यासाठी पनवेल शहरातील सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या क्रांतिज्योत महिला विकास फाऊंडेशनतर्फे या ही वर्षी ३१ डिंसेबर रोजी क्रांतीज्योत महिला विकास फांउडेशनतर्फे पनवेल येथील आदई सर्कल सुखापूर नवीन पनवेल या ठिकाणी सामाजिक उपक्रम राबवण्यात आला.

नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी अनेक हौशींकडून जल्लोष केला जातो. यात पार्टी करून मद्यपान केले जाते. यातून काही जण नशेत वाहन चालवितात. परिणामी अपघात होतात. तसेच भर रस्त्यात किंवा वर्दळीच्या ठिकाणी काही अतिउत्साही असलेल्यांकडून वादाचे प्रकार होऊन काही गुन्हे घडतात. त्यासाठी पोलिसांकडून ३१ डिसेंबरला सायंकाळपासूनच मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. शासन नियमांचे पालन करीत वाहतुकीचे नियम पाळणाऱ्यांना, हेल्मेट घातलेले व सीट बेल्ट लावले आहेत त्यांना गुलाब पुष्प देऊन वाहतुक नियमांचे पालन करा, वाहने सावकाश चालवा असा जाणीवपुर्वक संदेश क्रांतीज्योत महिला विकास फाऊंडेशनतर्फे देण्यात आला. जेणेकरून वाहन चालवताना अपघात होऊन दुर्घटना होणार नाही, जीवितहानी टळेल. तसेच आपले पोलीस बांधव-भगिनी थर्टी फस्टच्या दिवशी पहाटेपर्यंत ड्युटी करतात, त्यांच्याही भावनांचा आदर करून त्यांच्या सन्मानप्रीत्यर्थ त्यांनाही फाऊंडेशनच्यावतीने गुलाबपुष्प देण्यात आले. फाऊंडेशनमधील सर्व महिलांनी हा उपक्रम यशस्वीरित्या पार पाडला. तसेच या स्तुत्य उपक्रमाचे सर्वच पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचारी यांनी कौतुक केले. सह परिमंडळ ०२, पनवेलचे सहायक पोलीस आयुक्त अशोक राजपुत यांनी कार्यक्रमास भेट देत कौतुक केले. आमचा सन्मान करणारी क्रांतिज्योत महिला विकास फाऊंडेशन ही एकमेव सामाजिक संस्था असल्याचे ते म्हणाले.

## न्हावे मराठी शाळेत पर्यावरण जागरुकता कार्यशाळा

**। रोहा । वार्ताहर ।**

तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेत दिपक फाऊंडेशन प्रकल्पांअर्गत पर्यावरण जागरुकता कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी मुरुड गटातील साळाव, मराठी शाळेतील उपक्रमशील शिक्षिका रेश्मा धुमाळ यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण जागरुकतेबाबत मार्गदर्शन करताना पर्यावरण म्हणजे काय? पर्यावरणाचे घटक, पर्यावरणाचे प्रदूषण, प्रदूषणावर उपाय योजना आदीबाबत सविस्तर माहिती दिली.

बेस्ट फॉर वेस्ट यामध्ये रिकाम्या बॉटलपासून पेनस्टँड व फुलदाणी तयार करणे व प्लास्टिक स्टीक डब्यापासून कटलरी स्टँड तयार करणे हे पर्यावरण पुरक उपक्रम घेण्यात आले. या कार्यशाळेत इयत्ता पहिली ते सातवीच्या १०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता. इयत्ता पहिली ते तिसरीच्या मुलांनी पेनस्टँड, चौथी व पाचवीच्या विद्यार्थ्यांनी फुलदाणी तर सहावी, सातवी व आठवीच्या विद्यार्थ्यांनी रिकाम्या डब्यापासून कटलरी स्टँड तयार केले. आशा प्रकारे विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूंपासून सुंदर व आकर्षक वस्तू तयार केल्या. विद्यार्थी या कार्यशाळेत भारावून गेले होते. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता. या कार्यशाळेला दिपक फाऊंडेशनच्या सुपरवायझर रोहिणी भगत, अक्षता खांडेकर, समिया धनसे व केंद्रप्रमुख दीपक पाबरेकर आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पारस काव्य कला ही गुणीजनांचा सन्मान करणारी संस्था

### ज्येष्ठ कवी पुंडलिक म्हात्रे यांचे गौरवोद्गार

**। चिरनेर । वार्ताहर ।**

पारस काव्य कला ही गुणीजनांचा सन्मान करणारी महाराष्ट्रातील एकमेव संस्था असून, काव्य, कला, लेखनाला प्रोत्साहन देण्याबरोबर, ज्या निसर्गात आपण जन्माला आलो त्याचे रक्षण करणे हाच शुद्ध विचार घेऊन या संस्थेचा जन्म झाला आहे, असे सांगून एक कविता इतिहास घडवू शकते. त्यामुळे अशा गुणीजणांच्या कर्तुत्वाला प्रोत्साहन देऊन त्यांच्या कर्तुत्वाला कडक सलाम करण्यासाठी हा सन्मान सोहळा असल्याचे गौरउद्गार आगरी कवितांचे बादशाहा पुंडलिक म्हात्रे यांनी काढले.

पारस काव्य कला जनजागृती संस्था नवी मुंबईच्यावतीने, सानपाडा येथील डॉ. बाबासाहेब



आंबेडकर समता भवन येथे शनिवारी (दि. २८) रोजी आयोजित करण्यात आलेल्या १४ राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी पारस काव्य कला जनजागृती संस्थेच्यावतीने देण्यात येणारा यंदाचा जागतिक कीर्तीचा कवी पुरस्कारही त्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी संस्थापक अध्यक्ष मंगेश चांदीवडे विश्वभूषण पुरस्काराचे मानकरी संजय बर्वे, प्रा. सुनील चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते विजय शिरढोणकर, सामाजिक कार्यकर्ते नेवरेकर, कवी शंकर गोपाळे, खजिनदार शोभा चांदिवडे, सचिव दामोदर बेडेकर, ईशा चांदिवडे तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

यावेळी जवळजवळ ७५ गुणीजनांना राज्यस्तरीय पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. तसेच प्रकल्पग्रस्तांच्या व्यथा व रडते धरणी माता या विषयांवर राज्यस्तरीय खुल्या काव्य लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या काव्य स्पर्धेत कवी शंकर गोपाळे (प्रथम), कवी पुंडलिक म्हात्रे (द्वितीय), कवयित्री मनीषा कडव (तृतीय) हे कवी काव्य लेखन स्पर्धेतील मानकरी ठरले. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांचे स्वागत संस्थापक अध्यक्ष मंगेश चांदिवडे व खजिनदार शोभा चांदिवडे यांनी केले. सूत्रसंचालन शंकर गोपाळे यांनी, तर आभार अध्यक्ष मंगेश चांदिवडे यांनी व्यक्त केले.

## १०० दिवसीय क्षयरोग मोहिम कार्यक्रम

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

२०२५ पर्यंत भारत देश क्षयरोग मुक्त करण्याचे ध्येय ठेवलेले आहे. जे की शाश्वत विकास ध्येयाच्या अपेक्षित कालावधीपेक्षा ५ वर्ष अगोदर आहे. त्या अनुषंगाने रायगड जिल्हयात ०७ डिसेंबर २०२४ पासून १०० दिवसीय क्षयरोग मोहिम राबविण्यात येत आहे.

(दि.३१ डिसेंबर) रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय, कामोठे, पनवेल येथील अधिष्ठाता डॉ.जी. एस. नरशेट्टी व डॉ. प्रसाद वाईंगणकर यांच्या मार्गदर्शनाखाली १०० दिवसीय क्षयरोग मोहिम राबविण्यात आली, अशी माहिती जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.सचिन जाधव यांनी दिली.

या अंतर्गत जनजागृतीसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर हॉस्पिटल व खोपोली बस स्टॅण्ड येथे एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय येथील डॉक्टर्स व नर्सिंगच्या विद्यार्थिनींनी क्षयरोगावर पथनाटय सादर केले. यास जनतेने चांगला प्रतिसाद दिला. जनवैद्यक विभागच्या डॉ. सुनीला संजीव व विक्रांत दिनकर (एमएसडब्ल्यू), शितल कजरे (पीएचएन) यांच्या निर्देशनाखाली करण्यात आले. यासाठी वैद्यकीय अधिकारी डॉ. वानखेडे व योगेश म्हसे (टिबी हेल्थ व्हिजीटर्स) यांचे सहकार्य लाभले. १०० दिवसीय क्षयरोग मोहिमेवर एमजीएम वैद्यकीय महाविद्यालयामधील डॉ. सुनीला संजीव, डॉ. सौम्या (टाटा हॉस्पिटल) यांनी माहिती दिली व मार्गदर्शन केले.

जास्तीत जास्त क्षयरुग्ण वेळेत शोधून उपचाराखाली आणणे, क्षयरोगाचा मृत्यू दर कमी करणे, क्षयरोगाचा प्रसार कमी करून नवीन क्षयरुग्ण टाळणे. या मोहिमे अंतर्गत क्षयरोगाबाबत जास्तीत जास्त जनजागृती करावयाची आहे. त्या करीता विविध उपक्रम करण्यात येत असल्याचे डॉ.सचिन जाधव यांनी सांगितले.

## दुचाकीची ट्रॅक्टरला पाठून ठोकर

### दुचाकीस्वाराचा मृत्य, १ जखमी

**। माणगांव । वार्ताहर ।**

पुणे-दिघी महामार्गावर दुचाकीची ट्रॅक्टरला पाठून ठोकर लागून दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला असून एक जण जखमी झाला. सदरची घटना ३१ डिसेंबर रोजी घडली.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सविस्तर वृत्त असे की, ३१ डिसेंबर रोजी ८.४० वा. च्या सुमारास मयत दुर्गेश काशीनाथ हंबीर हा त्याच्या ताब्यातील स्कुटीने निजामपुर ते माणगांव मार्गावर जात होता. महेंद्र सिंग यांची दुचाकी निजामपुर माणगांव रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रॅक्टरला पाठी मागून ठोकली. या अपघातात दुचाकीस्वार दुर्गेश हंबीर याचा मृत्यू झाला.

या अपघातामध्ये निकेश किशोर बांगारे याला किरकोळ व गंभीर दुखापती होऊन तो जखमी झाला आहे. या अपघाताची नोंद माणगांव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास पोलीस निरिक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरिक्षक काळे करीत आहेत.

## जंजिरा किल्ला पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी

**। आगरदांडा । वार्ताहर ।**

मुरुड हे पर्यटनाचे क्षेत्र आहे. सुट्टी साजरी करण्यासाठी नविन वर्षाच्या पहिल्याच दिवशी शेकडोंच्या संख्येने विविध जिल्हातुन पर्यटक मुरुडमध्ये दाखल झाले आहेत. विशेष करुन राजपुरी येथील ऐतिहासिक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी पर्यटकांनी तुफान गर्दी केली आहे. त्यामुळे शहरांसह पंचक्रोशी भागातील लॉजिंग, हॉटेल, स्टॉलधारक, घरगुती खानावळ यांचे व्यवसाय चांगलेच तेजीत आले आहेत.

आज मुंबई, पुणे, सातारा, पनवेल, नाशिक, वाई आदिंसह



राज्याच्या कानोकोपऱ्यातून पर्यटक मुरुडमध्ये दाखल झाले आहेत. सकाळच्या दरम्यान किल्ला पाहण्यासाठी राजपुरी जेट्टीवर पर्यटकांची गर्दी वाढली होती. मेरीटाईम बोर्डाचे कर्मचारी किल्ल्यात जाणाऱ्या प्रत्येक बोटीवर लक्ष ठेवत आहेत. प्रत्येक बोटीतील पर्यटक सेफ्टी जॅकेट परिधान करतात की नाही याची खात्री केली जात आहे.

पान १ वरून

### थकबाकी न भरणाऱ्यांना दिलासा

थकीत बिलामुळे कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडित झालेल्या (पीडी) ग्राहकांसाठी १ सप्टेंबरपासून अभय योजना सुरू करण्यात आली. या योजनेचा कालावधी ३० नोव्हेंबर रोजी संपल्या नंतर ३१ डिसेंबर पर्यंत एक महिन्याची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु राज्यातील ग्राहकांचा वाढता प्रतिसाद लक्ष्यात घेऊन ही योजना ३१ मार्च २०२५ पर्यंत चालू ठेवण्याचा निर्णय घेतल्यामुळे या योजनेत अजूनही सहभागी होऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांना दिलासा मिळणार आहे. मात्र ३१ मार्च २०२५ नंतर या योजनेला मुदत वाढ न देण्याचा निर्णय महावितरणने घेतला असुन थकबाकी न भरणाऱ्या ग्राहकांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

राज्यातील ९३८४८ वीज ग्राहकांनी आतापर्यंत योजनेचा लाभ घेतला असून त्यांच्याकडून १३० कोटी रुपयांचा भरणा झाला असून त्यांना ५७ कोटी ३६ लाख रुपयांचे व्याज व २ कोटी १२ लाख रुपयांचा विलंब आकार माफ झाला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार कोणत्याही जागेच्या मालक किंवा खरेदीदार किंवा ताबेदार यांनी वीजबिलाची थकबाकी रक्कम भरणे बंधनकारक आहे. रक्कम न भरल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते. त्यामुळे वीज ग्राहकांनी सवलतीचा लाभ घेऊन चिंतामुक्त व्हावे, असे आवाहन महावितरणने केले आहे.

अभय योजनेत मूळ बिलाच्या ३० टक्के रक्कम भरून उर्वरित ७० टक्के रक्कम सहा हप्त्यात भरण्याची सवलत ग्राहकांना देण्यात आली आहे. जे घरगुती, व्यावसायिक व इतर लघुदाब ग्राहक एकरकमी थकीत बिल भरतील त्यांना दहा टक्के तर उच्चदाब औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांना पाच टक्के सवलत आहे. भिवंडी, मालेगाव, मुंब्रा, शीळ व कळवा या महावितरणच्या फ्रँचायझी क्षेत्रातील वीज ग्राहकांनाही ही योजना लागू आहे.

### मुलानं जन्मदात्यांनाच संपवलं

लिलाधर हे खापरखेडे येथे महाजेनकोमध्ये टेक्निशियन म्हणून काम करतात तर अरुणा विनोबा भावे नगर येथील एका खासगी शाळेत प्राथमिक शिक्षिका होत्या. आरोपी उत्कर्ष हा ६ वर्षांपासून अभियांत्रिकीचे शिक्षण घेत होता. मात्र वारंवार नापास होत असल्याने उत्कर्षच्या कानशिलात लगावली होती. तर दोघंही त्याला अभ्यास सोडून शेती कर असे टोमणे मारत होते. पण उत्कर्ष अभियांत्रिकी पूर्ण करण्याच्या त्याच्या निर्णयावर ठाम होता. आई-वडिलांच्या सततच्या टोमण्यांमुळे तो चिडला आणि रागाच्या भरात त्याने आपल्या आई-वडिलांची हत्या करण्याचा निर्णय घेतला.

उत्कर्षने २६ डिसेंबरला सकाळी त्याची लहान बहीण सेजल हिला कॉलेजला सोडले. सेजल वर्धा रोडवर असलेल्या महाविद्यालयात बीएएमएसचे शिक्षण घेते. तिला कॉलेजमध्ये सोडल्यानंतर उत्कर्ष त्याच्या घरी पोहोचला. तिथे १ वाजण्याच्या सुमारास त्याने सर्वप्रथम त्याची आई अरुणा हिची गळा आवळून हत्या केली. त्यानंतर आरोपी उत्कर्ष आपल्या वडिलांची घरी येण्याची वाट पाहू लागला. सायंकाळी वडील आपल्या ड्युटीवरून घरी पोहोचल्यावर त्याने लगेचच वडिलांवर धारदार चाकूने वार करून त्यांची हत्या केली. या हत्येच्या घटनेनंतर आरोपीने घराला कुलूप लावून वडिलांची गाडी आणि मोबाईल फोन घेऊन कोराडी येथे राहणाऱ्या त्याच्या काकाकडे गेला. तेथून त्याने आपल्या बहिणीला फोन केला आणि त्यांचे आई-वडील काही दिवस मेडिटेशनसाठी बेंगळुरूला गेले असून तेथे त्यांना मोबाइल बंद ठेवावे लागणार असल्याची खोटी माहिती दिली.

हत्येचे रहस्य उघड होऊ नये म्हणून त्याने आपल्या बहिणीला वडिलांच्या गाडीतून कॉलेजमध्ये नेऊन सोडण्यास सुरुवात केली. मात्र, दिखावा करण्यासाठी उत्कर्ष मंगळवारी रात्री त्यांच्या घरी आला आणि त्याने जोरात दरवाजा ठोठावण्याचा बहाणा केला. त्यानंतर तो पुन्हा काकांकडे गेला. हा प्रकार उघडकीस येणार म्हणून त्याने वडिलांच्या मोबाइलवर सुसाईड नोट टाईप केली. त्याचा स्क्रिन शॉट घेत तो फोटो वडिलांच्या मोबाइलचा स्किन सेव्हर म्हणून त्याने ठेवला. आमच्या आत्महत्येला कुणीही जबाबदार नसून, त्यासाठी मुलांना त्रास देऊ नका. आमच्या मृतदेहांची उत्तरीय तपासणीसुद्धा करू नका. आम्हाला थेट स्मशानात न्या, असे त्याने या नोटमध्ये लिहून ठेवले होते. दोघांचे मृतदेह कुजल्याने त्यांचा वास येऊ लागल्याने शेजाऱ्यांनी ही माहिती पोलिसांना दिली.

तपासादरम्यानच हत्या झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यामुळे पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी केली असता, त्याने आपल्या आई-वडिलांची हत्या केल्याची कबुली दिली. आपण आईचा गळा दाबून व वडिलांवर चाकूने हल्ला करीत त्यांची हत्या केल्याचे त्याने मान्य केले. आपण इतके चिडलो होतो की वडिलांवर चाकूने नेमके किती वार केले हे आपल्याला आठवत नसल्याचे त्याने पोलिसांना सांगितले आहे. पोलिसांनी उत्कर्षला अटक केली असून अधिक तपास करत आहेत.

### मंत्री भरत गोगावले पदभारापासून दूर

तरी अजूनही १८ मंत्र्यांनी पदाची सूत्रे हाती घेतली नसल्याची माहिती समोर आली आहे.

त्यामुळे हे मंत्री नाराज आहेत की काय, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व मंत्री दत्तात्रय भरणे हे परदेशवारीला गेले आहेत. नाराज असल्यानेच भरणे यांच्याकडून पदभार स्वीकारण्यास विलंब करण्यात येत आहे, अशी चर्चा होत आहे. अशीच चर्चा अन्य काही मंत्र्याबाबतही होत आहे. पदभार न स्वीकारलेले मंत्री आशिष शेलार, अतुल सावे, नरहरी झिरवाळ, भरत गोगावले, गुलाबराव पाटील, दादा भुसे, जयकुमार रावल, माणिकराव कोकाटे, मकरंद पाटील, योगेश कदम, पंकज भोयर, बाबासाहेब पाटील, दत्तात्रय भरणे, प्रकाश आबिटकर, माधुरी मिसाळ, आशिष जयस्वाल, मेघना बोर्डीकर यांचा समावेश आहे.

### काशीदमध्ये पर्यटकाचा मृत्यू

रुग्णालयात नेले. परंतु प्रतिक सहस्रबुद्धे हा आधीच मयत झाला आहे, असे डॉक्टरांनी सांगितले. ही माहिती मिळताच मुरुड पोलीस निरीक्षक नामदेव बंडगर, सहाय्यक पोलीस निरीक्षक देशमुख व पोलीस हवालदार हरि मेंगाळ घटनास्थळी दाखल झाले. या संदर्भात मुरुड पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेचा अधिक तपास मुरुड ठाण्याचे पोलीस हवालदार हरि मेंगाळ हे करीत आहेत.

### नववर्षाचे नशीले सेलिब्रेशन भोवले

येथील मांजरी बुद्रुक या ठिकाणचे रहिवासी आहेत. या घटनेची पोलीस हवालदार प्रशांत देशमुख यांनी दिली. श्रीवर्धन पोलिसांनी केलेल्या या धडक कारवाईमुळे व्यसनाधीनता करण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना चांगलाच चाप बसणार आहे. त्या पर्यटकांकडे गांजा हा अमली पदार्थ कोठून आला व त्यांनी कसा प्राप्त केला, याबाबत देखील पोलीस चौकशी सुरू आहे.

याप्रकरणी श्रीवर्धन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक यु.बी. रिकामे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार जे. जी. गमाले हे अधिक तपास करीत आहेत.

### पर्यटक निघाले परतीच्या मार्गावर

सुरु असल्याचे सांगण्यात आले.

नव्या वर्षाचे स्वागत झाल्यावर पर्यटक त्यांच्या परतीच्या मार्गावर निघाले. पर्यटकांना त्यांच्या निश्चित स्थळी वेळेवर पोहचता यावे, यासाठी अलिबाग एसटी बस आगारातून नियमित बसेस बरोबरच अलिबाग - पनवेल विना थांबा ज्यादा बसेस सोडण्याचे नियोजन करण्यात आले. स्थानकात विना थांबाचे तिकीट घेण्यासाठी पर्यटकांची रांग दिसून आली. काही पर्यटकांनी जलमार्गाचा आधार घेत त्यांच्या निश्चित स्थळी लवकर पोहचण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे मांडवा बंदरावर पर्यटकांची गर्दी झाली होती. त्यामुळे पीएनपी, अंजठा, मालदार आदी जलसेवेचा आधार घेत मुंबईकडे प्रस्थान केले. यावेळी सकाळपासून मांडवा बंदरावर पर्यटकांची रांग दिसून आली.

### नववर्षाच्या पहिल्याच दिवशी उपोषणाची एल्गार

पिडीत महिलेने केला आहे. आपल्या न्याय हक्कासाठी पोलीस ठाण्याचा उंबरडा झिजवला. परंतु त्यांना न्याय मिळाला नाही. त्यामुळे त्यांनी अखेर अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे. पिडीत महिलेसोबत त्यांचे पतीदेखील उपोषणाला बसले आहेत.

### जमीन विक्री प्रकरणी गुन्हा दाखल

नावे मिळकती ओढण्यात आल्या. तसेच पात्र क्षेत्रापेक्षा वाढीव क्षेत्राचे वाटप करून जमिनींची विक्री करण्यात आली. यासाठी तत्कालीन तहसीलदार कविता जाधव, तलाठी सदानंद कुडाळकर, एस.एस. सातांबेकर, राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष नाना भौड यांच्यावर गैर कायदेशीर आदेश व अहवालाच्या आधारे अपात्र व्यक्तींना जमीनी वाटप केल्याच्या आरोपाखाली व शेतकरी सुरेश मालू जाधव, गोविंद गणपत विचारे, भागोजी पांडुरंग नाडकर यांची अंदाजे रक्कम ६७,१८,४०० रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी तळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश गवई हे करीत आहेत.

## थर्टी फर्स्टला केले दूधाचे वाटप



**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

थर्टी फर्स्ट म्हटलं की आपल्या बऱ्याचदा हातात दारूचा ग्लास व डीजेच्या तालावर डोलणारी तरुणाई व नागरिक दिसतात. पण यावर्षी पालीसह पेण व जिल्ह्यातील विविध ठिकाणी मंगळवारी (ता.३१) नववर्षाच्या पूर्वसंध्येला दूध वाटप करून प्रबोधन करण्यात आले. त्यामुळे शेकडो लोक दारू ऐवजी दूध प्यायले.

पुणे येथील आयुष्य व्यसनमुक्ती केंद्राचे अध्यक्ष अंकुश आपटे यांनी व्यसनमुक्तीचा सामाजिक संदेश घेऊन संकल्प व्यसनमुक्तीचा, महायज्ञ दुधाचा या कार्यक्रमाचे पालीत आयोजन करून तब्बल २०० लिटर दुधाचे मोफत वाटप केले. यावेळी दारू सोडा, दूध प्या हा सामाजिक संदेश सर्वसामान्य नागरिकांना दिला. या उपक्रमाला पालीतील तरुण मित्र, वृद्धांचा व स्त्रियांचा भरभरून पाठिंबा मिळाला. अनेक वृद्ध महिला व पुरुषांनी डोक्यावर हात ठेवून अंकुश आपटे यांना शुभेच्छा आणि आशीर्वाद दिला.

या कार्यक्रमासाठी शेकाप नेते सुरेश खैरे, आगरी समाजाचे नेते महेश खंडागळे, अस्मिता घरत, शिक्षक विभागातून राजन पाटील, आदी मान्यवरांनी या उपक्रमामागील व्यसनमुक्तीचा संदेश पाहून अंकुश आपटे यांचं कौतुक केले व त्यांच्या कार्याला शुभेच्छा दिल्या.

पेण येथे व्यसनाला बदनाम करू या हा उपक्रम अनिसमार्फत राबवण्यात आला. अंनिस पेण शाखेतर्फे द दारूचा नव्हे, द दुधाचा हा उपक्रम नगर पालिका इमारती समोर घेण्यात आला. दारूचा प्याला हातात घेऊ नका, त्या ऐवजी दूध प्या असा संदेश महाराष्ट्र अंनिसतर्फे देण्यात आला. याप्रसंगी एका कार्यकर्त्याने दारू सोडवण्या विषयी स्वरचित कवितेचे वाचन केले. तर पूर्वी दारू पिणाऱ्या पण आता व्यसन मुक्त झालेल्या निवृत्त पोलीस शिपायाने आपले अनुभव सांगितले. अंनिस शाखेतर्फे संकल्प व संदेश गायकवाड, मीना मोरे, गीता भानुशाली, प्रा. सतीश पोरे, जगदीश डांगर, एन. जे. पाटील, मोहिनी गोरे, चंद्रहास पाटील, सूर्यकांत पाटील, सावनी गोडबोले यांच्यासह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## सहा महिने उलटून गेले तरी पेण शहराला

# सीसीटीव्हीची प्रतिक्षा कायम



**। पेण । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण तथा तिसऱ्या मुंबईचे प्रवेशद्वार म्हणून पेणकडे पाहिले जात आहे. परंतु, दिवसेंदिवस पेणमध्ये शहरीकरण वाढत असल्याने नकळत इतर अवैध बाबी देखील वाढत आहेत. त्यामुळे शांतता व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीस यंत्रणा कर्मचाऱ्यांच्या (मनुष्यबळ) अभावी अपुरी पडत आहे. त्यासाठी पेण शहरात जिल्हा नियोजन म्हणून सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तरतुद करून ठेवली आहे. त्याची निविदा देखील ठेकेदाराला दिली आहे. या गोष्टीला जवळपास ६ महिने उलटून गेले आहेत; मात्र, आजतागायत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम सुरू झालेले नाही.

पेण शहरात वाढत असणाऱ्या चोऱ्यांमुळे सीसीटीव्ही कॅमेरांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पेणच्या

### ■ चोऱ्यांमुळे सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

शेजारी असलेल्या अलिबाग शहरामध्ये तेथील नगरपालिकेने पुर्ण शहर सीसीटीव्ही कॅमेराच्या एका नजरेत आणले आहे. मात्र, पेण शहरामध्ये असे होताना दिसत नाही. त्यातच गेली दोन ते तीन वर्ष पेण शहरात प्रशासक राजवट असल्याने ठेकेदारांवर वचक ठेवण्यासाठी लोकप्रतिनिधी काहीही करू शकत नाहीत. तर, दुसरीकडे प्रशासकाला ठेकेदाराला जुमानत नसल्याचे चित्र निदर्शनास येत आहे.

पोलिसांना मनुष्यबळाच्या अभावी सगळीकडे लक्ष ठेवणे शक्य होत नाही. त्यामुळे पोलीसांचा तीसरा डोळा म्हणून सीसीटीव्ही कॅमेरे असणे गरजेचे आहे. जेणेकरून पेण शहरात कायदा व सुव्यवस्था अबादित ठेवण्यात पोलिसांना मदत होईल.

याबाबत पोलीस निरिक्षक संदीप बागूल यांच्याशी संपर्क करून विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, पेण शहरात १४५ सीसीटीव्ही कॅमेरे नगरपालिकेच्या माध्यमातून देण्यात येणार होते. मात्र, आम्ही सर्व शहराचा सर्वेक्षण करून १५८ कॅमेऱ्यांची गरज असल्याचे कळविले आहे. एवढयाला काम पुर्ण होणे गरजेचे होते. परंतु, काम का थांबले आहे, याबाबत आमचे कर्मचारी नगरपालिकेशी संपर्क करून विचारणा करत आहेत. वारंवार नगरपालिकेकडून लवकरच सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जातील असे, आश्वासन दिले जात आहे.

### पोलिसही हतबल

**पेण शहरातील अवैध बाबी कमी व्हाव्यात यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची तरतुद पालिकेच्यावतीने करण्यात आलेली आहे; परंतु, अद्याप हे कॅमेरे बसविण्यासाची सुरवात झालेली नाही. अशातच गुन्हेगारीला आला घालण्यासाठी मनुष्यबळाची कमतरता असल्यामुळे पोलीस देखील हतबल झालेले निदर्शनास येत आहे.**

### मुख्याधीकारी यांचे पुन्हा आश्वासन

**कृषीवलच्या प्रतिनिधींनी पेण नगरपालिकेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी जिवन पाटील यांच्याशी संपर्क करून विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, आम्ही कामाची वर्क ऑर्डर दिलेली आहे. ठेकेदाराने काम देखील सुरू केले आहे. मात्र, मध्येच काम का थांबले आहे, याबाबत ठेकेदाराशी विचारणा करून त्याला तातडीने काम सुरू करण्यास सांगून युध्दपातळीवर पेण शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे बसवून घेण्यात येतील. असे २६ ऑक्टोंबर रोजी सांगण्यात आले होते. तसेच, पुन्हा २७ डिसेंबर रोजी सांगण्यात आले आहे.**

# मुरूडमधील क्षय रुग्णांना कोरडा आहाराचे वाटप



**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

प्रधानमंत्री नीक्षय पोषण योजने अंतर्गत मुरुड तालुक्यातील क्षयरोग मुक्त ग्रामपंचायतीमध्ये येणाऱ्या क्षय रुग्णांना कोरडा आहाराचे वाटप तहसीलदार रोहन शिंदे, पोलीस निरीक्षक नामदेव बंडगर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. पायल राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. हा पोषण आहार महानगर गॅस लिमिटेड यांच्या मार्फत पुरविण्यात आला होता.

या पोषण आहार वाटप प्रसंगी उपस्थित रुग्णांना मार्गदर्शन करताना तालुका आरोग्य अधिकारी डॉ. पायल राठोड यांनी निक्षय मित्राबद्दल माहिती दिली व निक्षय मित्रामार्फत पुरविण्यात येणाऱ्या आहाराचा रुग्णांना त्यांची रोगप्रतिकार शक्ती वाढून क्षयरोगावर लवकरात लवकर कशी मात करता येते. डॉक्टरांच्या सल्ल्याने नियमित औषधे घेतल्यास १००% क्षयरोग बरा होतो, याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी तहसीलदार रोहन शिंदे यांनी क्षयरोग मुक्त ग्रामपंचायत अभियानामध्ये पात्र ग्रामपंचायतीचे कौतुक केले व उर्वरित ग्रामपंचायती ही क्षयरोग मुक्त करून २०२५ पर्यंत मुरुड तालुका क्षयरोग मुक्त करण्याचे आव्हान केले. यावेळी, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकिय अधिकारी, वरीष्ठ औषधोपचार पर्यवेक्षक संकेत घरत, गणेश शिंदे आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक राजेंद्रचुनेकर, मुख्याध्यापक, एनजीओ सदस्य उपस्थित होते.

### क्षयरोगावर मात

**निक्षय मित्रामार्फत पुरविण्यात येणाऱ्या कोरडा आहाराने क्षय रूग्णांची रोगप्रमिकार शक्ती वाढून क्षयरोगावर पुर्णतः मात करता येते. तसेच, डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार औषधोपचार घेतल्यास १०० % बरा होतो.**


# रंजना पाटील यांचे निधन

**। अलिबाग । वार्ताहर ।**



अलिबाग तालुक्यातील कावाडे येथील रंजना रघुनाथ पाटील (७०) यांचे निधन झाले आहे. रंजना या खंडाळेचे माजी सरपंच संतोष गुरव यांच्या थारेल्या भगिनी होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुलं, तीन मुली, सुना, जावई व नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी गुरूवारी (दि.९) व तेरावे रविवारी (दि.१२) राहत्या घरीच होणार असल्याचे पाटील कुटुंबियांकडून सांगण्यात आले आहे.

# अंजुमनमध्ये सामूहिक वाचनाचा कार्यक्रम



**। मुरुड-जंजिरा । वार्ताहर ।**

नववर्षाच्या सुरुवातीलाच वाचनसंस्कृतीला चालना देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या माध्यमातून 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा व्यापक उपक्रम दि. १ ते १५ जानेवारी या कालावधीत राबविण्यात येत आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी, तसेच भावी उत्कृष्ट लेखक निर्माण करता यावे यासाठी अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स या माहाविद्यालयात कोंकण विभागाचे सहसंचालक डॉ. विजय नारखेडे, महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. साजिद शेख व ग्रंथालय समिती यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहेत. बुधवारी (दि.१) विद्यार्थ्यांसाठी सामुहिक वाचन तसेच वाचनाचे महत्व या कार्ग्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

हा स्तुत्य उपक्रम विद्यार्थ्यांना वाचनातून नवी दिशा देणारा ठरणार आहे, असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. साजिद शेख यांनी केले. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी ग्रंथालय समिती प्रमुख अलताफ फकीर, डॉ. फिरोज शेख, जावेद खान व ग्रंथपाल अंजुम दाखवे यांनी विशेष प्रयत्न केले.

# कुणाल खरात सीए उत्तीर्ण



**। पनवेल । वार्ताहर ।**

लहानपणापासूनच एखादी जिद्द आपल्याला आपल्या ध्येयापर्यंत कशी पोहोचवू शकते, याचे द्योतक उदाहरणं नवीन पनवेल येथील कुणाल प्रमिला सिद्धार्थ खरात याने समोर ठेवले आहे. कुणाल याने आपल्या जिद्दीच्या जोरावर चार्टर्ड अकाउंटंट्सच्या (सीए) नुकत्याच झालेल्या अंतिम परीक्षेत उत्तीर्ण होत यश संपादन केले आहे. त्याच्या या यशानंतर परिसरातील नागरिकांनी कुणाल याला भेटून त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. कुणाल याला लहानपणापासूनच सीए बनण्याची इच्छा होती. तशी इच्छा त्याने आपल्या घरातील सर्व सदस्यांना सांगितली होती. घरातील संस्कार आणि कुणालची जिद्द त्याला सीएच्या पदापर्यंत जाण्यासाठी कारणीभूत ठरली आहे.

# तळा ते शिर्डी पदयात्रा रवाना



**। तळा । वार्ताहर ।**

तळा शहरातून ग्रामदेवी चंडिकामातेचे दर्शन घेऊन श्री क्षेत्र शिर्डीसाठी पायी पदयात्रा रवाना झाली आहे. या पायी पदयात्रेचे हे सतरावे वर्ष असून दरवर्षी जानेवारीच्या एक तारखेला पदयात्रा आयोजित करण्यात येते. यावेळी, साईबाबांची पालखी खांद्यावर घेऊन 'ओम साई जय साई'च्या जयघोषात पालखी शिर्डीकडे मार्गस्थ झाली आहे. तसेच, दि.१४ ते १६ जानेवारी रोजी तळा तालुक्यात साईबाबांची झोळी दर्शन कार्यक्रम व १७ जानेवारी रोजी साई संत चरित्राचा अखंड पारायण, साई पालखी मिरवणूक व भजन आणि दि.१८ जानेवारी रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# गेट वे ते नेरळ असा प्रवास

## १२ वर्षीय हिरेनची सायकल स्वारी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जतमधील १२ वर्षीय हिरेन राम हिसालके हा हुतात्मा भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील यांच्या बलिदान दिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी गेट वे ते नेरळ अशी सायकलस्वारी करणार आहे. क्रांतिवीरांच्या जीवनावरील 'आझाद दस्ता' धडा शैक्षणिक अभ्यासक्रमात घ्यावा; तसेच, हुतात्म्यांच्या घराला राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करावे, या मागणीसाठी तो ९४ किमी सायकलवरून प्रवास करणार आहे. हिरेन हा गुरूवारी (दि.२) मुंबईमधील गेट वे ऑफ इंडिया येथून पहाटे प्रवास सुरू करणार असून सकाळी साडेदहा वाजेपर्यंत नेरळ येथील हुतात्मा चौकात



पोहचणार आहे.

नेरळ गावातील वाल्मिकीनगर भागात राहणाऱ्या हिरेनने आतापर्यंत राष्ट्रीय सणाच्या निमित्ताने सायकलवरून फिरून अभिवादन केले आहे. आता हा सायकलपटू हुतात्मा भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील यांच्या स्मृतिदिनी मुंबई ते नेरळ असा सायकल प्रवास करणार आहे.

### सायकलिंगची सुरुवात

**हिरेन हिसालके हा गुरूवारी (दि.२) पहाटे साडेपाच वाजता गेट वे ऑफ इंडिया येथील छ. शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला अभिवादन करुन त्यानंतर हुतात्मा चौकातील हुतात्म्यांना अभिवादन करत मुंबई फोर्ट, शिवडी, वडाळा, चेंबूर, मानखुर्द, वाशी, खारघर, कळंबोली, पनवेल, चौक, कर्जत असा प्रवास करत नेरळमधील हुतात्मा चौकात प्रवासाची सांगता करणार आहे.**

## पालीतील व्यावसायिक व दुकानदार सुखावले | नूतन वर्षानिमित्त पर्यटकांत वाढ

# अष्टविनायक तीर्थक्षेत्रात भक्तांची गर्दी





**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

नवीन वर्षांच्या पहिल्या दिवशी अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी पालीत पर्यटकांनी तुफान गर्दी केली होती. ३१ डिसेंबर रोजी पालीत पर्यटकांची मोठी रेलचेल होती. शाळा व महाविद्यालयांना नाताळच्या सुट्ट्या असल्यामुळे पालीत पर्यटकांची मोठी वर्दळ वाढली आहे. त्यामुळे येथील हॉटेल व्यावसायिक व दुकानदारांचा व्यवसाय तेजीत आला आहे. मात्र, भाविकांच्या व इतर वाहनांमूळे पालीत वाहतुककोंडी वाढत आहे.

बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रभरातून पर्यटन दाखल होत आहेत. यामुळे येथे चांगली आर्थिक उलाढाल होत असून येथील स्थानिक व्यावसायिक सुखावले आहेत. सुट्टयांमुळे मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजले आहेत.

> भाविकांच्या येणाऱ्या गर्दीचा अंदाज घेऊन योग्य व्यवस्थापन व नियोजन करण्यात आले आहे. बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्यावतीने भाविकांच्या सोयीसाठी शुद्ध थंड पाणी व इतर व्यवस्था करण्यात आली आहे. नाममात्र दरात प्रसादालयामध्ये प्रसाद (भोजन) उपलब्ध आहे.
>
> – वैभव आपटे, उपाध्यक्ष
> पाली बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्ट




●नववर्षात शेतकऱ्याला चांगले दिवस येवो, अशी विनवणी शेतकरी सरत्या वर्षाच्या अस्ताला जाणाऱ्या सूर्याला करीत होता.



● सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे स्वागत करण्यासाठी ग्रामीण भागातील लोकांनी एकत्र येत आनंदोत्सव साजरा करत पोपटीवर ताव मारण्यात आला.

# शेकाप मसाला दूध वाटप उपक्रम



**। पनवेल । वार्ताहर ।**

शेतकरी कामगार पक्षाचे माजी नगरसेवक गोपाळ भगत यांच्यावतीने ३१ डिसेंबर रोजी कळंबोली येथे सरत्या वर्षाला निरोप देताना मसाला दूध वाटपाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शेकडो नागरिकांना दुधाचे वाटप करण्यात आले. ३१ डिसेंबरच्या दिवशी अनेक जण मद्यपान करून वाहन चालवत असतात. त्यामुळे त्यांच्या जीवाला धोका निर्माण होतो. या ३१ डिसेंबरच्या दिवशी नागरिकांनी नियमांचे उल्लंघन करू नये आणि कधीही मद्य पिऊन वाहन चालवू नये, असे आवाहन वारंवार करण्यात येते. यादरम्यान, ३१ डिसेंबरच्या दिवशी शेतकरी कामगार पक्षाचे माजी नगरसेवक गोपाळ भगत यांच्यावतीने मसाला दुधाचे वाटप करण्यात आले. यावेळी अनेक नागरिकांना मसाला दुधाचे वाटप करण्यात आले.




● नवीन वर्षाची चांगली सुरुवात करण्यासाठी पनवेलमधील प्रतिसाई मंदिरात साईंचे आशीर्वाद घेण्याकरता बुधवारी (दि.१) सकाळपासूनच सर्व सामान्य नागरिकांनी गर्दी केली होती.



● सरत्या वर्षाला निरोप देऊन जल्लोषात नवीन वर्षाचे स्वागत करून बुधवारी (दि.१) सकाळी खांदा वसाहतीतील पुरातन खांदेश्वर मंदिरात दर्शनासाठी सकाळपासूनच भक्तांनी मोठमोठ्या रांगा लागल्या होत्या.

# नववर्षानिमित्त गणेश भक्तांची गर्दी

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चिरनेर महागणपती तीर्थक्षेत्रात नववर्षा निमित्ताने बुधवारी (दि.१) गणेशभक्तांनी प्राचीन श्री महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला. पहाटेपासूनच श्रींच्या दर्शनाला सुरुवात झाली होती. यावेळी नववर्षानिमित्ताने श्री महागणपतीच्या दर्शनासाठी गणेश भक्तांची दिवसभर रीघ लागली होती. नारळ हाराबरोबर गणेश भक्तांनी श्री महागणपतीला पेढे, लाडू व पुरणपोळीचा नैवेद्य दाखविला. उरण तालुक्याबरोबर पनवेल, नवी मुंबई, मुंबई, ठाणे, कल्याण, येथील गणेश भक्तांनी श्री महागणपतीचे मनोभावे दर्शन घेतले. दरम्यान हार,



नारळ, गावठी भाज्या, मातीची भांडी तसेच हॉटेल व्यवसायिकांचा धंदा तेजित असल्याचे दुकानदार प्रणोती पाटील हिने सांगितले.

# इस्त्रोची नवी भरारी

भारतीय अवकाश संशोधन संस्था, इस्त्रोने आणखी एक भरारी घेतली आहे. स्पेस डॉकिंग एक्स्परिमेंट नावाच्या मोहिमेचे सरत्या वर्षाच्या शेवटी यशस्वी प्रक्षेपण करण्यात आले. एकमेकांपासून दूर असलेल्या दोन उपग्रहांना जवळ आणून परस्परांशी जोडण्याचा प्रयत्न करणारी ही मोहिम आहे. इस्त्रोच्या पीएसएलव्ही या अंतराळ प्रक्षेपकाने सोमवारी दोन उपग्रह पृथ्वीच्या नजीकच्या अंतरिक्षात सोडले. पीएसएलव्ही हे संपूर्णपणे भारताने विकसित केलेले हुकुमी वाहन झाले आहे. त्याद्वारे अगदी ठरल्याबरहुकुम उपग्रह प्रक्षेपण चालू असते. मुंबईहून पुण्याला एशियाडने जावे इतक्या सहजपणे हे प्रक्षेपण होत असते व अमेरिकेसह अनेक प्रगत देशांनी या व्यवस्थेचा लाभ घेतला आहे. तर, या प्रक्षेपकामार्फत चेसर आणि टार्गेट असे दोन उपग्रह सोमवारी अंतराळात सोडण्यात आले. आरंभी ते एकत्रच होते. जसजसे वर गेले तसतसे ते एकमेकांपासून दूर होऊन एकमेकांपासून वीस किलोमीटर अंतरावर ते स्थिर होतील. यात सुमारे चार दिवस जातील. एकदा तसे झाले की प्रत्यक्ष डॉकिंग किंवा उपग्रह जोडणीची मोहिम सुरू होईल. इस्त्रोचे शास्त्रज्ञ पृथ्वीवरून हा सर्व प्रयोग नियंत्रित करतील. त्यानुसार हे दोन्ही उपग्रह क्रमाक्रमाने एकमेकांच्या जवळ आणले जातील. ते एकमेकांपासून पाच किलोमीटरच्या टप्प्यात आले की या दोन्ही उपग्रहांमधील रेडिओ फ्रीक्वेन्सी सुरू केली जाईल. त्यामुळे दोन माणसांनी मोबाईल फोनवर बोलून भेटण्याची वेळ ठरवावी तसे हे उपग्रह एकमेकांशी बोलून एकत्र येण्याचा कार्यक्रम ठरवू शकतील. या दोन्ही उपग्रह जुळ्या भावांप्रमाणे असल्याने त्यांची अंतरिक्षात फिरण्याची गती व इतर अनेक गोष्टी एकमेकांसारख्याच असतील. त्यामुळे या संभाषणात अडचण येणार नाही. एकदा परस्परांची उंची तसेच अवकाशातील नेमकी जागा त्यांना एकमेकांना कळली की तेथील स्थितीनुसार ते एकत्र येण्याची कारवाई सुरू करतील. यासाठी या दोन्ही उपग्रहांवर अनेक सेन्सर्स बसवण्यात आले असून बंगळुरुच्या एका कंपनीने ते तयार केलेले आहेत. त्यांची अवकाशात प्रथमच चाचणी होणार आहे. परस्परांपासून केवळ दीड किलोमीटरच्या अंतरात आले की, त्यांचे हे सेन्सर्स काम करू लागतील.

## ३५ वर्षांपूर्वीची कल्पना

पेनाचे टोपण लावावे किंवा बाटलीचे झाकण बसवावे त्याप्रमाणे हे दोन्ही उपग्रह एकत्र येणार आहेत. त्यासाठी चेसर नावाचा उपग्रह टार्गेट या उपग्रहाकडे धाडला जाईल. एका मिनिटाला साठ सेंटीमीटर या गतीने चेसर पुढे जाईल. त्यानंतर ते एकदुसऱ्याच्या पकडीत घट्ट बसतील व दोन उपग्रहांचा मिळून एक उपग्रह होईल. हे सर्व वाचायला सोपे असले तरी एका मायक्रोसेकंदाची वा मायक्रोमिलीमीटरची चूकही गडबड करू शकते. हे सर्व पृथ्वीपासून सुमारे ४५० किलोमीटर उंचीवर अंतराळात घडेल. ते येथे राहून नियंत्रित करणे यात प्रचंड विविध तंत्रज्ञाने गुंतलेली असतील. अर्थात, आपल्या अवकाश संस्थेने चंद्रावर ज्या अचूकपणे चांद्रयान उतरवले ते पाहता या मोहिमेतही त्यांना यश येईल अशी आशा करायला हरकत नाही. एकदा दोन्ही उपग्रह एकत्र झाले की, त्यांच्यापैकी एकाच्या कंट्रोल सिस्टीमद्वारे त्यांचे संचलन सुरू होईल. या उपग्रहांचे वजन प्रत्येकी २२० किलो आहे. म्हणजे त्यानंतर हा ४४० किलो वजनाचा एकच उपग्रह होईल. त्याच्या नव्या वजन व आकारानुसार त्याच्या गती व काम करण्याच्या पध्दतीत फरक पडेल. अवकाशामध्ये संशोधन, पाहणी, फोटो काढणे इत्यादी जी काही कामे करायची असतील ती हा दोन्हींचा मिळून बनलेला एक उपग्रह आरामात पार पाडू शकेल. अशा प्रकारचे तंत्रज्ञान अमेरिका, रशिया व चीन या तीनच देशांकडे आहे. आता या मोजक्यांच्या यादीत भारत दाखल झाला आहे. या मोहिमेची कल्पना पहिल्यांदा १९८९ मध्ये करण्यात आली होती. त्यामुळे शास्त्रीय संशोधन वा तंत्रज्ञान विकासाचे कार्यक्रम हे कसे अखंडपणे चालू असतात हे लक्षात यावे. कोण्या एका नरेंद्र मोदींच्या मदतीने वा प्रेरणेने असल्या गोष्टी घडत नसतात. पंतप्रधान कोणी राजीव असोत, वाजपेयी, मनमोहन किंवा मोदी, आपले शास्त्रज्ञ अविरत कष्ट करतात व त्यामुळेच आपल्या देशाला अभिमानाने मान उंचावता येऊ शकते.

## अभिमानास्पद

आगामी काळात भारताच्या दोन महत्वाकांक्षी अवकाश मोहिमा आहेत. एक म्हणजे आणखी चांद्रयान चार. यामध्ये चंद्राच्या माती इत्यादींचे नमुने घेऊन यान परत येईल अशी कल्पना आहे. दुसरे म्हणजे अवकाशामध्ये भारताची स्वतःची प्रयोगशाळा स्थापन करणे. या दोन्ही प्रयोगांसाठी कालच्या या प्रयोगातील यश महत्वाचे ठरणार आहे. चांद्रयान-४ मध्ये एकूण पाच वेगवेगळी उपकरणे असतील व ती वेगवेगळ्या वेळी अवकाशात प्रक्षेपित केली जातील. ती नंतर अवकाशात एकमेकाजवळ आणून चंद्राजवळ त्यांची अचूक जुळणी करणे व त्यांना चंद्रावर उतरवणे हे अर्थातच मोठे आव्हान असेल. आज पृथ्वीवरील कारखान्यांमध्ये मोटार इत्यादींचे सुटे भाग रोबोद्वारे तयार करून नंतर एका ठिकाणी त्यापासून मोटार बनवली जाते. पण अवकाशात, शेकडो मैलांवर हे सर्व साधणे हे सोपे राहणार नाही. अंतराळ प्रयोगशाळा प्रकल्पाचेही पाच भाग असतील. त्यात असंख्य उपकरणे असू शकतील. ती सर्व एकाच वेळी प्रक्षेपित करणे व्यवहार्य नसेल. त्याऐवजी ती वेगवेगळ्या वेळी व ठिकाणी प्रक्षेपित करून नंतर अंतराळात नेऊन त्यांना एकत्र करणे वा जोडणे अधिक उपयुक्त असेल. हवामान, दळणवळण इत्यादींमधील संशोधनाच्या दृष्टीने तर ही प्रयोगशाळा महत्वाची आहेच. पण भावी काळात विश्वव्यापी महायुध्द झालेच तर ते अंतराळातून होईल असे म्हटले जाते. त्यादृष्टीनेही ती अत्यंत कळीची आहे. १९६९ मध्ये अमेरिकेने चंद्रावर स्वारी केली तेव्हा भारतात इस्त्रोची स्थापना झाली. पण आता त्याच भारताने संशोधनात इतकी भरारी घेतली आहे की आता अमेरिकेच्या मोबाईल यंत्रणेसाठी लागणारे उपग्रह इस्त्रोमार्फत सोडले जात असतात. इस्रोला अमेरिकी उपग्रह सोडल्यामुळे सुमारे दीड हजार कोटींचे उत्पन्न मिळाले आहे. तर युरोपीय युनियनकडून अडीच हजार कोटी मिळाले आहेत. २०२४ मध्ये इस्त्रोने १५ अंतराळ मोहिमा राबवल्या. त्यापूर्वी २०२३ मध्ये चांद्रयान-३ तसेच सूर्याच्या दिशेने पाठवलेल्या आदित्य- वन यांच्या यशस्वी मोहिमा घेण्यात आल्या. आता शुक्रावर यान पाठवणे हा संशोधनाचा पुढचा टप्पा आहे. इस्त्रोचे हे यश प्रत्येक भारतीयासाठी गौरवास्पद आहे.

विचार

# ‘जात’कारणाचा उत्तररंग

**नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांमध्ये जातीपातीच्या राजकारणाची धुळवड आपण अनुभवली. यातून उमललेले ‘कमळ’ पुढील पाच वर्षे मुख्यमंत्रीपद भूषवणार असल्याचे स्पष्ट असताना येत्या काळात जातकारणाचा उत्तररंग कसा असेल, हे पाहणे रंजक ठरणार आहे. जातीय अस्मिता कमालीच्या उंचावलेल्या असल्यामुळे या पातळीवर सम तोल साधताना नेत्यांची मुत्सद्देगिरी पणाला लागेल, यात शंका नाही.**

**जयदेव डोळे**

नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूक प्रचारामध्ये जातीचा मुद्दा नोंद घेण्याइतका डोकावून गेला. जरांगे पाटील यांच्या निमित्ताने या निवडणुकीत मराठा जात आरक्षणाच्या मागणीसाठी वेगळ्या हेतूने मतदान करेल अशी अटकळ होती. परंतु, मराठा जातीचे राजकीय शहाणपण राजकीय पक्षांमध्ये एकवटलेले असते, हेही आपण समजून घ्यायला हवे. ते एखाद्या व्यक्तीच्या चळवळीमध्ये वा आंदोलनामध्ये ते कधीच एकवटलेले नसते. याचे कारण म्हणजे मराठा ही महाराष्ट्रातील सत्ताधारी जात राहिली आहे. राज्यातील राजकीय वास्तव असे आहे की, सर्वच राजकीय पक्षांच्या नेतृत्वस्थानी आणि कार्यकर्त्यांमध्ये मराठा जातीचीच बहुसंख्या असते. म्हणूनच एका व्यक्तीमुळे आपल्या सत्तास्थानांना हादरे बसत असतील तर राजकीय शहाणपण नेहमीच तडजोड, तह, समझोता वा माघार यातच असते, हे त्यांना माहिती आहे. त्यामुळेच जरांगे पाटलांना मतदानाच्या काही दिवस आधीच माघार घ्यावी लागली. त्यांना उमेदवारही उभे करता आले नाहीत. परिणामत: महाराष्ट्रात अस्तित्वात असणाऱ्या दोन राष्ट्रीय आणि चार प्रादेशिक राजकीय पक्षांमध्येच मराठा जातीचे मतदान वाटले गेले. भारतीय जनता पक्षालाही मराठा जातीच्या मतदारांनी मतदान केले. त्यातूनच दिसून येणारी बाब म्हणजे भाजपाच्या आमदारांमध्ये मराठा जातीचीच बहुसंख्या आहे.

अशा सगळ्या परिस्थितीत मराठा जातीला सत्तेवरील आपला अधिकार सोडायचा नसताना ओबीसी जातींना एकवटायची संधी मिळाली आणि ती ‘बटेंगे तो कटेंगे’ तसेच ‘एक है तो सेफ हैं’ची घोषणा बलिष्ट झाली. कारण खरे तर या दोन्ही घोषणा मुस्लिमांविरोधात नव्हत्याच. आपल्या



देशाचे पंतप्रधान स्वत:ला ओबीसी म्हणवतात आणि भाजपाला आपला डीएनए ओबीसी जातीचा आहे, असे म्हटल्याचेही ऐकलेले आहे. त्यामुळे आता ओबीसींनी मराठा जातीकडून सत्ता हस्तगत करावी, असा संदेश योगी आणि मोदी यांनी त्यांच्या वेगवेगळ्या घोषणांमधून दिला. अर्थातच यातून ओबीसी आणि मराठा यांच्यातील संबंध ताणले गेले. पण एकंदरच निवडणूक निकालांनंतर सत्तेत सर्वांनाच प्रतिनिधित्व मिळाल्याचे लक्षात आल्यानंतर आता ग्रामीण भागात उत्पन्न झालेला जातीय तणाव निवळलेला दिसत आहे. सत्तेसाठी सगळे भांडण असताना सत्तेचे वाटप आणि पुनर्वाटप योग्य प्रमाणात होण्याची काळजी नवे सत्ताधारी घेतीलच. त्यामुळे यापुढे जातीपातीतील तणाव उफाळून येणार नाही, असे आपण ढोबळमानाने म्हणू शकतो.

आता प्रश्न देवेंद्रजी फडणवीस यांच्या जातीचा... दहा वर्षांपूर्वी सत्ता हस्तगत केली, तेव्हा त्यांच्यामागे आमदारांचे बहुमत नव्हते. तेव्हा एकनाथ खडसे यांचे नाव अग्रस्थानी होते. म्हणजेच तेव्हा ओबीसींना सत्ता अपेक्षित होती. पण फडणवीसांनी ती हस्तगत केली आणि नंतर आपल्याला आडवे येण्याची शक्यता असणारे नेते पटावरुन हळूहळू वगळायला सुरूवात केली. मग त्यात मराठा आणि ओबीसी असे दोन्ही जातीचे नेते होते. त्यामुळे फडणवीसांमुळे महाराष्ट्रात ब्राह्मण विरुद्ध अन्य जाती असा संघर्ष उद्‌भवला. एखाद्याला तिकीट मिळू द्यायचे नाही, एखाद्याला मंत्रिमंडळातून वगळायचे, एखाद्यावर चौकशी लावायची तर एखाद्यावर गुन्हेगारीचे दावे उभे करायचे यासारखे अनेक प्रकार राज्याने २०१९ नंतर पाहिले. थोडक्यात, ब्राह्मण जातीचे असणारे फडणवीस अतिशय कुटील, घातकी आणि सुडाने वागणारा नेता असल्याचे चित्र निर्माण झाले आणि जरांगे पाटलांच्या तोंडून वारंवार तेच व्यक्त होत राहिले. शेवटी भाजपाचे राजकीय तत्त्वज्ञान राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ठरवतो आणि त्यांना आरक्षण मंजूर नाही. आरक्षणामुळे हिंदुत्वाचे स्वप्न भंग पावते, असा त्यांचा विचार आहे. हिंदुत्वापुढे जाती, वंश, वर्ण, भाषा, प्रदेश असे भेद उभे राहिले तर हिंदुत्व उघडे पडते, हा विचारही यामागे आहे. या दोन्ही अर्थाने भाजपा आणि संघाला आरक्षण नको आहे.

पुढे फडणवीस आरक्षणाच्या मुद्द्यात अपयशी ठरले आणि त्यांनी त्याचे खापर उद्धव ठाकरे यांच्यावर फोडले खरे, पण मराठा जातीला सामाजिकदृष्ट्या मागास ठरवण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा येऊ घातलेला निकाल आता कसा असेल हे सांगता येत नाही. एकदा त्यांनी या जातीला मागास ठरवलेले नाही म्हणजेच आरक्षणाचे निकष तुम्हाला लागू पडत नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी मराठा समाजाला सांगितले आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर फडणवीस यांचे राजकीय कौशल्य पणाला लागणार आहे. मात्र त्याच वेळी ब्राह्मणांच्या नेतृत्वाखालील हिंदुत्ववादी मराठी समाज अतिशय वेगळ्या, विचित्र आणि अतिरेकी मागण्या करु लागला आहे. त्यामुळे आता त्यांना त्याकडेही लक्ष पुरवावे लागणार आहे. या वर्गाचा दबाव झुगारुन देणे फडणवीस यांना अवघड जाईल, असे वाटते. या मागण्यांचा परामर्श घेतला तर ब्राह्मण जातीला आरक्षण द्या, परशुराम महामंडळ स्थापन करा, वेगवेगळ्या धार्मिक स्थळांना देण्यात येणारी सरकारी अनुदाने बंद करुन पूर्वीप्रमाणे मंदिरे खासगी लोकांच्या ताब्यात द्या असे असंख्य स्वरुपाचे प्रतिगामी मुद्दे समोर येतात. यामुळे ते अधिक वेगाने पुढे येऊ लागतील, कारण आपलाच माणूस मुख्यमंत्री झाल्यामुळे वाटा मोकळ्या झाल्याचा विचार एका वर्गामध्ये जोर धरु लागेल. त्यामुळे असा सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक पेच फडणवीसांपुढे येऊ शकतो. यातून ते कसे तरुन निघतात हे बघणे महत्त्वाचे ठरणार आहे. फडणवीस यांच्या मागील मुख्यमंत्रीपदाच्या कालखंडात या वा अशा स्वरुपाच्या मागण्या न उफाळण्यामागे काही कारणे आहेत. त्यातील एक म्हणजे तेव्हा संघाचे शताब्दी वर्ष दूर होते. मात्र आता संघाची शताब्दी सुरू झाली आहे. अशा काळात वेळ दवडता कामा नये, शक्य ते प्राप्त करुन घ्या... हा विचार बळावण्याची दाट शक्यता आहे. त्यातच संघ फडणवीस यांच्या मागे ठामपणे उभा आहेच. तेव्हा फडणवीस, संघ आणि एकंदर हिंदुत्ववादी मतदार हे तिघे एकत्र आले तर दोन मराठा उपमुख्यमंत्री आपली सामाजिक वारशाची परंपरा कशी पुढे नेतील हेदेखील आता बघावे लागेल. कारण यातील एक बाळासाहेब ठाकरे यांना मानतो तर दुसरा फुले-शाहू-आंबेडकर यांना मानतो. असे असताना ते आपली परंपरा कशी जपतील, हा तिढा कसा सोडवतील हे येता काळच दाखवून देईल.

**जातगणनेचा प्रश्न बिकट होतोय...**
**डॉ. भालचंद्र कानगो, ज्येष्ठ अभ्यासक**

महाराष्ट्रातील निवडणुकीनंतर काही गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. १९३० ते १९८० या कालखंडादरम्यान कॉंग्रेसने मनुवादविरोधी, ब्राह्मणवादविरोधी बहुजनांना एकत्रित करुन मराठ्यांचे राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. दुसरीकडे, भाजपाने सातत्याने हे मराठ्यांचे राज्य असल्याचे लोकांच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न केला. परंतु, यशवंतराव चव्हाण यांच्या सर्वसमावेशक धोरणांमुळे त्याला म्हणावे तसे यश मिळाले नाही. त्यानंतर मंडल आयोग लागू झाल्यानंतर मात्र बीजेपीने ओबीसींच्या अस्मितेचे राजकारण तीव्रतेने पुढे करुन मराठा विरुद्ध ओबीसी असे ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. तो या निवडणुकीमध्येही तीव्रतेने जाणवला. १९८९ मधील शिवसेनेचे नगरसेवक, आमदार यातून बहुतेक बिगरमराठा असल्याचे दिसते. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा प्रश्न घेऊन त्याकाळी मराठवाड्यामध्ये मराठा विरुद्ध दलित यामध्ये संघर्ष पेटवण्याचे काम शिवसेनेने केले. अर्थातच ते भाजपाच्या पथ्यावर पडले. पण त्यामुळे गरीब मराठा कॉंग्रेसविरोधी झाला. आधीच मराठवाड्यामध्ये निजामाचे राज्य होते. तेथे मुस्लिमांची संख्या मोठी होती. त्याचाही फायदा घेत मराठवाड्यात अँटी मुस्लिम राजकारण करण्याचा प्रयत्न सातत्याने होत राहिलेला दिसला. औरंगाबाद महापालिकेच्या निवडणुकीमध्ये बाळ ठाकरे यांनी हा प्रयोग यशस्वी करुन दाखवला. या सगळ्यात भाजपाने देशात मुस्लिमविरोधी आणि राज्यात मराठाविरोधी राजकारणाचे रसायन चांगल्या पद्धतीने वापरले आणि शिवसेनेचा उपयोग करुन घेत आपला पाया भक्कम केला. पुढे शिवसेनेची गरज कमी होत गेल्यानंतर त्यांनी फणा उगारायला सुरूवात केली. आताही बऱ्याचशा लोकांना त्यांची ‘बटेंगे तो कटेंगे’ ही घोषणा हिंदू-मुस्लिम संबंधातली वाटली. पण प्रत्यक्षात ती ओबीसींना एकत्र आणणे आणि हिंदू म्हणून लोकांना एकत्र करण्याची मानसिकता निर्देशित करत होती. महाविकास आघाडीने सामाजिक न्यायावर भर देणारी भूमिका घेतली होती. पण ती भाजपाच्या पचनी पडणारी नव्हती. कारण यात दोन अडचणी आहेत. एक म्हणजे यामुळे राखीव जागा मिळवणाऱ्या प्रमुख जातींची अडचण निर्माण होते. मायावती, प्रकाश आंबेडकर यांचा उपवर्गीकरणाला विरोध आहे. भाजपाने मात्र या निवडणुकीमध्ये छोट्या जातींना मोठ्या प्रमाणावर संघटित केले आणि मोठी आश्वासने दिली. त्यामुळेच आता सरकार किती दिवस जाती जनगणनेचा आग्रह टाळू शकेल, हा प्रश्न आहे.

चर्चा आजची

# वैज्ञानिक विचाराकडे पाऊल

**प्रमोद जाधव**

विज्ञान प्रदर्शनाचा क्रेझ दिवसेंदिवस वाढत आहे. त्याचा प्रचार व प्रसार शाळांमध्ये प्रचंड वाढला आहे. या विज्ञान प्रदर्शनातून अनेक विद्यार्थ्यांनी गगन भरारी घेऊन विद्यार्थ्यांनी शाळा, महाविद्यालय, तालुका जिल्ह्याहयाचे नाव लौकिक केले आहे. जिल्ह्यात सध्या विज्ञान प्रदर्शनाचा हंगाम सुरु झाला आहे. तालुका स्तरावर प्रदर्शन भरविण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. विद्यार्थीदेखील या प्रदर्शनात सहभाग घेत आहे. त्यामुळे शालेय दशेपासूनच वैज्ञानिक विचाराकडे पाऊल पडत असल्याचे चित्र आहे.

डिसेंबर महिना उजाडल्यानंतर चाहूल लागते ती शाळा, महाविद्यालयातील वेगवेगळ्या सांस्कृतिक, क्रीडा उपक्रमांची. शाळा, महाविद्यालयात स्नेहसंमेलन वार्षिक क्रीडा स्पर्धा चांगल्या व्हाव्यात यासाठी शाळेतील शिक्षक, विद्यार्थी प्रचंड मेहनत घेतात. त्यामुळे आपल्या सुप्त गुणांना वाव देण्याचा एक प्रयत्न केला जातो. त्यानंतर जानेवारी महिना उजाडल्यावर ओढ लागते ती विज्ञान प्रदर्शनाची. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाबरोबरच प्रश्न विचारण्याची व त्यावर उत्तर शोधण्याची सवय निर्माण व्हावी हा उद्देश समोर ठेवून गेल्या अनेक वर्षापासून विज्ञान प्रदर्शनाची परंपरा शाळांनी जपली आहे.

विद्यार्थ्यांनी ज्या प्रकल्पावर काम केले आहे ते यशस्वीरित्या प्रदर्शित केल्याने त्यांच्यात कर्तृत्वाची भावना निर्माण होते. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होते. आव्हानात्मक कार्य करण्यास तसेच पुढील शोध घेण्यास विज्ञान प्रदर्शन विद्यार्थ्यांसाठी एक वरदान ठरत असते. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये विज्ञान प्रदर्शने महत्त्वाची भूमिका बजावत असतात.वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी एक हक्काचे व्यासपिठ यातून उपलब्ध होते. विज्ञान प्रदर्शन फक्त शिक्षण नसून बौद्धिक व विचार करण्याची क्षमता वाढविण्याचे एक चांगले असे उपक्रम आहे.

विज्ञान प्रदर्शनामुळे समस्या ओळखून त्यावर उपाय करण्यासाठी कौशल्य विकसीत करण्याची संधी मिळते. त्यामुळे विज्ञान प्रदर्शन विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व वैयक्तिक वाढीसाठी चालना देणारे साधन असल्याचे बोलले जात आहे.

कालपासून नव्या वर्षाची सुरुवात झाली आहे. २०२५ या नव्या वर्षाचे आगमन झाले आहे. जानेवारी महिना सुरु झाला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील वेगवेगळ्या शाळांमध्ये तालुका स्तरावर विज्ञान प्रदर्शन भरविण्याची लगबग सुरु झाली आहे. पाचवीपासून दहावी, व बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांकडून वेगवेगळे प्रयोग करून घेऊन त्याची मांडणी करणे. तो प्रयोग कशा पद्धतीने तयार केला याची माहिती घेण्याचे काम वेगवेगळ्या शाळांमध्ये करण्यावर भर दिला जात आहे. तालुका स्तरावरून जिल्हा स्तरावर विज्ञान प्रदर्शन भरविले जाते. आपल्या प्रयोगाची मांडणी व सादरीकरण चांगले व्हावे यासाठी शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी तयारी करू लागले आहेत. शाळा, महाविद्यालयातील शिक्षकदेखील या कामाला लागले आहेत.

भौतिकशास्त्र, जीवशास्त्र, रसायन शास्त्र या विषयांबरोबरच भुगोल या विषयांना अनुसरून टाकावू वस्तूपासून बनवलेले टिकावू वस्तू, पाणी वाचवा पाणी अडवा असा वेगवेगळ्या प्रकारचे प्रयोग करण्यासाठी पालक, विद्यार्थी तसेच शिक्षकदेखील कामाला लागले आहेत. प्रयोग तयार करण्यासाठी लागणारे साहित्य खरेदीसाठी पालकांसह विद्यार्थ्यांची बाजारात लगबग सुरु आहे. अलिबाग तालूका विज्ञान प्रदर्शन शुक्रवारी आवास येथील बाबासाहेब नाजरे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या संकुलामध्ये होणार आहे. त्याची तयारी अंतिम टप्प्यात आहे. तालुक्यातील वेगवेगळ्या शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थिनी तयार केलेल्या प्रयोगाची मांडणी करण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्या ठिकाणी सजावट करण्यात आली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील तालुक्यातील शाळांमध्ये विज्ञान प्रदर्शनाचा हंगाम सुरु झाला आहे. या उपक्रमांतून वैज्ञानिक विचाराकडे पाऊल पडत असल्याचे चित्र आहे.

याच विज्ञान प्रदर्शनातून रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेसह अन्य शाळेतील वियार्थ्यांनी उपग्रह निर्मितीमध्ये सहभाग घेऊन जिल्ह्याचे नाव लौकिक केले आहे.

उपग्रह निर्मितीसाठी राष्ट्रीय मोहिमेमध्ये या विद्यार्थ्यांची निवड झाली. तामीळनाडू राज्यातील पट्टीतुलम येथे त्यांनी सहभाग नोंदविला. रायगड जिल्ह्यातील आठ विद्यार्थी सहभागी झाले होते. जिल्हा परिषद शाळेतील तीन विद्यार्थ्यांचा समावेश होता. उपग्रह निर्मितीसाठी विविध भाग त्यांचा अभ्यास करून त्यांचे कार्य तेथील शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाखाली समजून घेतले. विद्यार्थ्यांनी सुट्टे भाग एकत्र करून लहान - लहान उपग्रह तयार केले. त्या उपग्रहाद्वारे अवकाशातील विविध प्रकारची माहिती मिळविण्यासाठी यश आले. या मोहिमांमुळे विद्यार्थ्यांना विज्ञानांची गोडी लागत आहे. जिल्हा परिषद शाळेतील राज्य आदर्श शिक्षक तथा तंत्रस्नेही शिक्षक संदीप वारगे यांच्या प्रोत्साहनामुळे विद्यार्थ्यांना विज्ञानात भरारी घेण्याची संधी मिळाली आहे. त्यामुळे विज्ञान प्रदर्शन शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाला चालना देणारे एक उपक्रम आहे.

लोकसंसद

## मोबाईलला दूर ठेवण्याचा संकल्प करूया!

दरवर्षी नव्या वर्षाचे स्वागत करताना प्रत्येकाच्या मनात नव्या आशा, आकांक्षाचे, नव्या अपेक्षांचे नव्याने धुमारे फुटतात आणि येणाऱ्या वर्षी कुठले नवीन संकल्प करावे अशा विचारांना अनेकांच्या मनात बहर येतो. तरुणाईचे, महिलांचे, विद्यार्थ्यांचे, ज्येष्ठ नागरिकांचे एकूणच प्रत्येकाचेच नव्या वर्षातील वेगवेगवेगळे संकल्प! कोणी व्यायाम आणि डाएट करण्याचा, नियमित मॉर्निंग वॉक करण्याचा, वजन घटविण्याचा संकल्प करतो, एखादे नवीन वाद्य शिकण्याचा संकल्प करतो तर ज्येष्ठ नागरिक देश, विदेशात कुठे भ्रमंती करायची त्याची योजना आखतात. व्यक्ती तितक्या प्रकृती त्याप्रमाणे व्यक्ती तितके संकल्प! मात्र एक संकल्प कोणीच करत नाही, तो म्हणजे मोबाईलला दूर ठेवण्याचा. बंगळुरूच्या ‘इनमोबी’ या भारतीय बहुराष्ट्रीय तंत्रज्ञान कंपनीने अलीकडेच प्रकाशित केलेल्या अहवालानुसार स्मार्ट फोन बाळगणारा प्रत्येक भारतीय सरासरी साडेचार तास फोनवर व्यतीत करतो. म्हणजे वर्षाचे १६४२.५ तास किंवा ६८.४४ दिवस म्हणजेच चक्क दोन महिने २५ दिवस! मोबाईलला अशा प्रकारे चिकटून राहण्याच्या व्यसनामुळे किती मोठ्या प्रमाणात मानसिक स्वास्थ्य बिघडते याचाही उहापोह अनेक मानसिक स्वास्थ्य अहवालातून समोर आला आहे.

**– प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

## रेवडी संस्कृती जोमाने फोफावणार !

मध्यप्रदेश आणि महाराष्ट्रात लाडकी बहिण योजना मते मिळवण्यासाठी कमालीची यशस्वी ठरली. दिल्लीतील आप सरकारने तर मोफत योजनांचा सपाटाच लावला होता. इतर राज्यातही याचीच री ओढली गेली. आता तर दिल्लीत पुन्हा सत्तेत आल्यास पुजारी आणि ग्रंथींना दरमहा १८ हजार रुपये देणार असल्याचे आपने जाहीर केले आहे. पंतप्रधानांनी मागे म्हटल्याप्रमाणे रेवडी संस्कृतीच निवडणुकीत जम धरु पाहतेय. या रेवडी संस्कृतीचा परिघ वाढत गेल्यास समाजातील बहुतांश घटक सरकारी मोफत योजनांवरच अवलंबून राहण्याची साधार भीती वाटते. या मोफत योजनांमुळे सरकारी तिजोऱ्यांवर येणारा संभाव्य ताणही कमी नसणार. पण लक्षात कोण घेतो? **– दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

दिनविशेष

# सर्वोच्च नागरी पुरस्कार ‘भारतरत्न’

भारताचा सर्वोच्च नागरी पुरस्कार म्हणजे भारतरत्न पुरस्कार. भारतरत्न पुरस्कारासाठी नामनिर्देशिताची निवड हि त्याच्या पद, व्यवसाय, लिंग, जातीवरून न ठरवता साहित्य, कला, समाजसेवा, विज्ञान, शिक्षण, क्रीडा, उद्योग या क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना दिला जातो. यात वंश, व्यवसाय, स्थिती किंवा लिंग याची भेदभाव ना करता दिला जातो. तसेच भारतरत्न पुरस्कार हा फक्त भारतीय रहिवासींना न देता भारताबाहेरील व्यक्तीलाही दिला जातो.

२ जानेवारी १९५४ रोजी तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी या सन्मानाची स्थापना केली होती. भारतरत्न पुरस्काराचे स्वरूप सूर्याची प्रतिकृती आणि देवनागरी लिपीमध्ये भारतरत्न लिहिलेले ब्राँझ धातूपासून




बनवलेल्या पिंपळाच्या पानाचा आकार असलेले स्मृतिचिन्ह राष्ट्रपतींनी स्वाक्षरी केलेली सनद आणि गळ्यात घालण्याचे पदक अशा स्वरुपात दिले जाते. सुरुवातीला हा सन्मान मरणोत्तर देण्याची प्रथा नव्हती, परंतु १९५५ मध्ये हे पुरस्कार मरणोत्तरदेखील देण्याचे निश्चित करण्यात आले. प्रत्येक वर्षी जास्तीत जास्त तीन भारतरत्न पुरस्कार विजेत्याना दिले जाते. भारतरत्न पुरस्कार समारंभ सोहळा नवी दिल्लीमधील राष्ट्रपती भवनामध्ये आयोजित केले जाते व हे पुरस्कार राष्ट्रपतींकडून त्या विजयी नामांकिताना दिले जाते. प्रथम भारतरत्न पुरस्कार हे भारतीय स्वातंत्र्य कार्यकर्ते चक्रवर्ती राजगोपालाचारी, भारताचे पहिले उपराष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आणि भौतिकशास्त्रज्ञ डॉ. चंद्रशेखर वेंकट रामन यांना मिळाले. भारतातील तिसऱ्या पंतप्रधान इंदिरा गांधी या पहिल्या महिला होत्या, ज्यांना १९७१ मध्ये भारतरत्न देऊन सन्मानित करण्यात आले. त्यानंतर संपूर्ण आयुष्यभर समाजसेवा करणाऱ्या मदर तेरेसा यांना १९८० मध्ये भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सचिन तेंडुलकर हा सर्वात तरुण भारतरत्न पुरस्कार प्राप्तकर्ता असून २०१४ मध्ये भारतरत्न देऊन सन्मानित करण्यात आले.

**महाराष्ट्र पोलीस दलाची स्थापना**

महाराष्ट्र पोलीस हे भारताच्या महाराष्ट्र राज्याची कायदा व सुव्यवस्था राखणारी संस्था आहे. महाराष्ट्र पोलीस दलाची स्थापना २ जानेवारी १९६१ साली करण्यात आली.

देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी महाराष्ट्र पोलीस दलाला ध्वज प्रदान केला. या दिवसापासून २ जानेवारी हा पोलीस स्थापना दिवस म्हणून साजरा केला जातो. महाराष्ट्र पोलीस हे देशातील सर्वांत मोठ्या पोलीस दलांपैकी एक असून त्यात १२ पोलीस आयुक्तालये व ३४ जिल्हा पोलीसदले आहेत. महाराष्ट्र पोलिसांचे मनुष्यबळ सुमारे १,८०,००० आहे.

‘सद्रक्षणाय खलनिग्रहणाय’ हे महाराष्ट्र पोलिसांचे ब्रीदवाक्य आहे. याचा अर्थ महाराष्ट्र पोलीस सज्जनांचे रक्षण करण्यास आणि दुर्जनांवर नियंत्रण ठेवून त्यांचा नायनाट करण्यास कटीबद्ध आहेत. पोलीस महासंचालक हे महाराष्ट्र पोलीसांचे प्रमुख असून मुंबई येथे महाराष्ट्र पोलिसांचे मुख्यालय आहे. महाराष्ट्र पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी हे संघ लोकसेवा आयोग आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत निवडले जातात. शिपाई व तस्सम पदांसाठी वेळोवेळी पोलीस भरती प्रक्रिया राबविल्या जातात.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२ जानेवारी

१) श्रीम. मंगला चिंतामण ल्हासे अलिबाग, २-१-१९४४

२) श्रीम. हेमांगी चंद्रकांत म्हात्रे पिंपळभाट, अलिबाग, २-१-१९५१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

# धान्याअभावी उपासमार

## राज्यभरात डिसेंबरचे धान्य वितरण रखडले; ई-पॉसमधील तांत्रिक अडचणींचा फटका

। पुणे । प्रतिनिधी ।

उशिरा झालेला धान्यपुरवठा तसेच ई-पॉस मशीनमधील तांत्रिक अडचणींमुळे डिसेंबरचे धान्य वितरण रखडले आहे. परिणामी, राज्यातील अनेक जिल्ह्यांतील सुमारे २४ लाख शिधापत्रिकाधारकांना धान्य मिळालेले नाही. धान्याअभावी लाभार्थींची उपासमार झाली आहे. त्यामुळेच उर्वरित धान्यवितरण करण्यासाठी संपूर्ण जानेवारी महिन्याची मुभा देण्यात यावी, अशी मागणी राज्य स्वस्त धान्य दुकानदार महासंघाने राज्य सरकारकडे केली.



बीड जिल्हा धान्य वितरणामध्ये राज्यात सर्वांत मागे आहे. भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर ग्रामीण, गोंदिया, वर्धा, फ परिमंडळ ठाणे, ग परिमंडळ कांदिवली, कोल्हापूर, सातारा व सोलापूर शहर या जिल्ह्यांत ९० टक्क्यांपेक्षा अधिक वितरण पूर्ण झाले असले तरी अन्य जिल्ह्यांची धान्य वितरणाची टक्केवारी चिंताजनक आहे.

नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, पुणे शहर व ग्रामीण या जिल्ह्यांमध्ये क्षेत्रीय पुरवठा कार्यालयांचा नियोजन शून्य कारभार आणि वाहतूक व्यवस्थेतील तांत्रिक त्रुटी या कारणांमुळे मागील काही महिन्यांपासून अन्नधान्य निर्धारित वेळेत पोहोचण्यास विलंब होत आहे, असा आरोप महासंघाचे अध्यक्ष डी.एन. पाटील यांनी केला आहे. या जिल्ह्यातील काही दुकानांमध्ये डिसेंबरचे धान्य अजूनही पोहोचलेले नाही. परिणामी, धान्य वितरण मोठ्या प्रमाणावर प्रलंबित आहे. मागील काही महिन्यांपासून राज्यातील अनेक दुकानांपर्यंत महिन्याचे धान्य महिन्याच्या २५ तारखेनंतर पोहोचत आहे, असेही त्यांचे म्हणणे आहे.

### ३३५ दुकानांचे धान्य वितरण शून्य

डिसेंबरच्या आकडेवारीनुसार राज्यातील एकूण ६ लाख ८३ हजार ७७६ एपीएल शेतकरी शिधापत्रिकांपैकी (३.९७ टक्के) राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेतील पात्र १ कोटी ६५ लाख ८१ हजार शिधापत्रिकांपैकी आतापर्यंत केवळ १ कोटी ४१ लाख ७१ हजार ५८२ शिधापत्रिकांचे धान्य वितरण पूर्ण झाले आहे. म्हणजेच राज्यामध्ये अजूनही २४ लाख ९ हजार ४१८ शिधापत्रिकांचे धान्य वितरण प्रलंबित आहे. राज्यात अजूनही ३३५ दुकानांचे धान्य वितरण शून्य टक्के आहे. ७६८ दुकानांचे धान्य वितरण ३० टक्क्यांपेक्षा कमी आहे, तसेच २ हजार १२० दुकानांचे धान्य वितरण ६० टक्क्यांपेक्षा कमी झाले आहे.

# २१ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या

। मुंबई । प्रतिनिधी ।

महाराष्ट्रात नवे सरकार स्थापन झाल्यानंतर प्रशासनात फेरबदल सुरू झाले आहेत. काही अधिकाऱ्यांना पदोन्नतीदेखील देण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाने आज २१ सनदी अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीचे आदेश जारी केले, तर काही अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली आहे

सचिन प्रताप सिंह यांची शिक्षण आयुक्त, पुणे येथे नियुक्ती करण्यात आलीय. रुचेश जयवंशी यांना पदोन्नती देण्यात आली आहे. ते सध्या राष्ट्रीय ग्रामीण जीवनन्नोती अभियान, नवी मुंबई येथे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांना मंत्रालयात अल्पसंख्याक विकास विभागात सचिव पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. रवींद्र बिनवडे हे पुणे येथे नोंदणी महानिरीक्षक व नियंत्रक या पदावर काम करतील. रणजितसिंह देओल यांची प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय या पदावर, तर डॉ. अशोक करंजकर, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ या पदावर नियुक्ती झाली आहे.

सूरज मांढरे यांची आयुक्त कृषी, पुणे या पदावर नियुक्ती केली आहे. ते यापूर्वी क्रीडा व युवक सेवा विभागाचे सचिव म्हणून कार्यरत होते. प्रदीप पी. यांची मत्स्यव्यवसाय आयुक्त, मुंबई या पदावर नियुक्ती केली आहे. ते यापूर्वी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबईचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते. सोनिया सेठी यांना अपर मुख्य सचिव म्हणून तर माणिक गुरसाळ यांना पदोन्नती मिळाली आहे. निधी चौधरी तसेच विमला आर यांनादेखील पदोन्नती देण्यात आली आहे.

शीतल तेली-उगले, सोलापूर महापालिका आयुक्त पदावर पदोन्नती दिली आहे. महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक पणन महासंघ, मुंबईचे व्यवस्थापकीय संचालक ए.बी. धुळाज यांना पदोन्नती देण्यात आली आहे. डॉ. प्रशांत नारनवरे यांची सामान्य प्रशासन विभागाच्या सचिव व विशेष चौकशी अधिकारी म्हणून मंत्रालयात नियुक्ती करण्यात आली आहे.

# उद्या पाणीपुरवठा बंद

। डोंबिवली । प्रतिनिधी ।

नवीन वर्षाच्या दुसऱ्याच दिवशी गुरुवारी (दि.२) रोजी कल्याण डोंबिवलीचा पाणी पुरवठा बंद राहणार असल्याची माहिती केडीएमसी पाणी पुरवठा विभागातर्फे देण्यात आली आहे. विद्युत आणि यांत्रिक उपकरणांच्या दुरूस्तीसह वितरण वाहिनीवरील पाणीगळती थांबवण्याच्या कामासाठी कल्याण डोंबिवलीचा पाणीपुरवठा तब्बल १८ तास बंद राहणार आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या बारावे, मोहिली, नेतीवली आणि टिटवाळा जलशुद्धीकरण केंद्रात विद्युत तसेच यांत्रिकी उपकरणांची दुरूस्ती करणे आणि प्रभाग क्षेत्रातील वितरण वाहिनीवरची पाणी गळती थांबण्याचे काम यावेळी केले जाणार असल्याने गुरुवारी सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत (१८ तास) पाणी पुरवठा बंद राहणार आहे.

महापालिकेच्या बारावे, मोहिली, नेतीवली आणि टिटवाळा जलशुध्दीकरण केंद्रामधून महानगरपालिका क्षेत्रातील कल्याण पूर्व, कल्याण पश्चिम, मांडा-टिटवाळा, वडवली, आंबिवली, शहाड, अटाळी आणि डोंबिवली पूर्व तसेच पश्चिमेमध्ये यादिवशी पाणी नसणार आहे. त्यामुळे या परिसरातील नागरीकांनी पाण्याचा साठा करून महानगरपालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन केडीएमसी पाणीपुरवठा विभागातर्फे करण्यात आले आहे.

# फरार आरोपींना अटक करा, अन्यथा रस्त्यावर उतरणार

। बीड । प्रतिनिधी ।

बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येतील मुख्य आरोपी अद्यापही मोकाटच आहेत. वाल्मीक कराड याला सीबीआयने ताब्यात घेतले असून, कोर्टाने १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, मुख्य आरोपींना अटक करण्याच्या मागणीसाठी बुधवारी (दि. १) मस्साजोग येथील ग्रामस्थांनी जलसमाधी आंदोलन केले. तर दुसरीकडे मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी फरार आरोपींना अटक करण्याची मागणी केली, अन्यथा रस्त्यावर उतरणार असल्याचा इशारा दिला.

### मनोज जरांगेंचा सरकारला इशारा

मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी माध्यमांसोबत संवाद साधला. यावेळी त्यांनी राज्य सरकारला इशारा दिला. जरांगे पाटील म्हणाले, सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील अजूनही मुख्य आरोपी फरार आहेत. सर्व आरोपींना अटक होऊन न्याय मिळावा, अशी आमची इच्छा आहे. वाल्मीक कराड याला अटक झाली आहे. आता मोठे मासे सापडतील, आरोपींना अटक न झाल्यास आम्ही रस्त्यावर उतरणार, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला.



या प्रकरणात पोलीस कुणालाही सोडणार नाहीत. यावेळी धनंजय मुंडे यांच्याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला, यावर बोलताना जरांगे म्हणाले, चौकशी सुरु आहे. संबंध आहे की नाही हे सिद्ध होईलच. यामध्ये जे जे येतील त्यांना सुट्टी दिली तर महाराष्ट्र बंद पाडणार, असंही जरांगे पाटील म्हणाले.

### २५ जानेवारीपासून उपोषण

मराठा आरक्षणावर बोलताना जरांगे म्हणाले, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री हे मराठा आरक्षणाविषयी येणाऱ्या २५ तारखेपर्यंत काय निर्णय घेतात याकडे आमचे लक्ष लागले आहे. २५ जानेवारीपासून आम्ही आमरण उपोषण करणार आहे. याआधीही सरकारमध्ये हेच लोक होते, आथा फक्त खांदे बदलले आहेत, असंही जरांगे पाटील म्हणाले.

# प्रजासत्ताक दिनाची शालेय सुट्टी रद्द

। मुंबई । प्रतिनिधी ।

२६ जानेवारी हा दिवस महाराष्ट्रासह संपूर्ण देशात प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी देशात सकाळी शाळेत झेंडावंदन झाल्यानंतर विद्यार्थ्यांना सुट्टी दिली जाते. मात्र, येथून पुढे शालेय विद्यार्थ्यांना ही सुट्टी मिळणार नाही. महाराष्ट्र सरकारने ही सुट्टी रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

विद्यार्थ्यांना सुट्टी देण्याऐवजी शाळा प्रशासनाने शाळेत देशभक्ती पर कार्यक्रमांचे आयोजन करावे आणि विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण करावी, असे निर्देश शालेय शिक्षण विभागाने दिले आहेत. त्यामुळे यावर्षीपासून महाराष्ट्रात शालेय विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाची सुट्टी मिळणार नाही. शालेय शिक्षण विभागाने मंगळवारी एक परिपत्रक जारी करून सर्व सरकारी आणि खासगी शाळांना दिवसभर देशभक्ती थीमसह विविध स्पर्धा आणि कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे निर्देश दिले आहेत. या दिवशी आपल्या विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्राचा इतिहास, आपली महान संस्कृती आणि देशाचे भविष्य याबद्दल राष्ट्रीय अभिमानाची भावना निर्माण केली पाहिजे. त्यामुळे २६ जानेवारी २०२५ पासून प्रजासत्ताक दिन सर्व माध्यमांच्या सर्व सरकारी आणि खासगी शाळांमध्ये विविध कार्यक्रमांसह साजरा केला जाईल, असे परिपत्रकात नमूद केले आहे.

### शिक्षणाधिकाऱ्यांना निर्देश

या दिवशी कोणते कार्यक्रम घ्यावेत, यासाठी आठ स्पर्धा आणि कार्यक्रमांची यादी देण्यात आली आहे. त्यामध्ये ध्वजारोहणानंतर प्रभातफेरी, वक्तृत्व स्पर्धा, कविता स्पर्धा, नृत्य, चित्रकला, निबंध आणि क्रीडा स्पर्धा आणि प्रदर्शन यांचा समावेश करण्यात आला आहे. हे सगळे कार्यक्रम देशभक्तीपर थीमवरच असावेत, असं पत्रकात म्हटलं आहे. जिल्हा शिक्षणाधिकारी आणि शिक्षण निरीक्षकांना निर्देशाची अंमलबजावणी करावी लागणार आहे.

# विधानाची मूल्ये जगण्याचा आधार बनावी : मार्टिन मकवाना

। पुणे । प्रतिनिधी ।

देशात 'हर घर संविधान' मोहीम निघते, हे चांगले आहे. मात्र या संविधानाची माहिती घराघरात करून देणे व त्यातील तरतुदींवर कृतीशील राज्यकारभार चालणे महत्वाचे आहे.देशातील अनेक ठिकाणी संविधानविरोधी वक्तव्ये करून देशात तणाव निर्माण करण्याचे काम केले जात आहे. मात्र, संविधान हा जीवन जगण्याचा मार्ग असून संविधानाची मूल्ये जगणाचा आधार बनली पाहिजेत, असे प्रतिपादन अहमदाबाद येथील संविधान अभ्यासक मार्टिन मकवाना यांनी केले.

डॉ. नरेंद्र दाभोलकर स्थापित महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या ३५ वर्षपूर्तीनिमित्त संविधान जागर परिषदेचे उद्घाटन आळंदी येथील मुंबई मराठा फ्रुट मार्केटमध्ये करण्यात आली होती. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र अंनिसचे राज्य अध्यक्ष अविनाश पाटील होते. मंचावर बेंगलुरु येथील खलील अन्सारी, अभिनेता निखिल चव्हाण, अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे, राज्य प्रधान सचिव संजय बनसोडे, नंदकिशोर तळाशिलकर, निंबाळकर आदी उपस्थित होते.

# २५ वर्षांत १५ गुन्ह्यांची नोंद

## वाल्मिक कराडची कुंडलीच समोर

। बीड । प्रतिनिधी ।

राज्यभर गाजत असलेल्या बीडच्या खंडणी आणि मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुखच्या हत्या प्रकरणातील संशयित आरोपी वाल्मिक कराड याने मंगळवार दि.३१ डिसेंबर रोजी सीआयडीसमोर शरणागती पत्करली होती. त्यानंतर केजमधील कोर्टाने वाल्मिक कराडला १५ दिवसांची सीआयडी कोठडी सुनावली आहे. वाल्मिक कराडची सीआयडी कोठडीत चौकशी सुरू आहे. तर, दुसरीकडे त्याचे कारनामे समोर येऊ लागले आहेत. आता वाल्मिक कराडबाबत धक्कादायक माहितीसमोर आली आहे. वाल्मिक कराडविरोधात मागील २५ वर्षांत १५ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे.

मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील मास्टरमाईंड वाल्मिक कराड असल्याचा आरोप करण्यात आले आहेत. राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांच्यासह इतर नेत्यांसोबत असलेल्या जवळीकीने कराड चर्चेत आला आहे. बीडचा बाहुबली म्हणून ओळखला जाणारा वाल्मिक कराडचे अनेक कारनाम्यांची चर्चा आता सुरू झाली आहे.

खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड याच्यावर वर्ष १९९९ ते २०२४ या मागील २५ वर्षात परळी शहर पोलीस ठाण्यासह, बर्दापूर पोलीस ठाणे, अंबाजोगाई शहर आणि केज पोलीस ठाणे अशा एकूण चार पोलीस ठाण्यात एकूण १५ गुन्हे दाखल झालेले आहेत. त्यात एकट्या परळी शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गर्दी व मारामारीचे ४ गुन्हे, खुनाचा प्रयत्न १ गुन्हा, रस्त्यात अडवल्याचे ३ गुन्हे तर जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी २ गुन्हे असे एकूण १० गुन्हे दाखल झालेले आहेत.

### वाल्मिक कराडवर कोणते गुन्हे दाखल?

- बर्दापूर पोलीस ठाण्यात २०१९ मध्ये फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला. अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूर पोलीस ठाण्यात फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
- खुनाच्या प्रयत्नाचे दोन गुन्हे वाल्मिक कराड याच्यावर आहेत. खुनाचा प्रयत्न केल्या प्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात २०२४ मध्ये १ गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तर २००६ मध्ये खुनाचा प्रयत्न केल्या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला आहे.
- खुनाचा प्रयत्न करणे यात गोळीबार मारहाण प्रकरणात परळी शहर पोलीस ठाण्यात ४ जुलै २०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
- २ कोटी रुपयांच्या खंडणीची मागणी केल्याप्रकरणी वाल्मिक कराड यांच्यासह विष्णू चाटे, सुदर्शन घुले या तिघांविरुद्ध केज पोलिसांत बुधवार ११ डिसेंबर रोजी खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मुंबई हल्ल्यातील आरोपीला भारतात आणणार

। मुंबई । प्रतिनिधी ।

२६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्यातील पाकिस्तान वंशांचा कॅनडातील व्यापारी तहव्वुर राणा याला लवकरच भारताकडे सोपवण्यात येणार आहे. भारतीय कुटनीतीचा हे मोठे यश मानण्यात येत आहे. त्याला भारतात आणण्यासाठी आता कायदेशीर बाबींसोबतच राजकीय संबंधांचा वापर करण्यात येत आहे. अमेरिकन कोर्टाने राणाची याचिका फेटाळल्यानंतर त्याला मोठा झटका बसला होता. ऑगस्ट २०२४ मध्ये अमेरिकन न्यायालयाने प्रकरणात फैसला सुनावला होता. भारत-अमेरिका या दोन्ही देशांमधील प्रत्यार्पण संधी अंतर्गत त्याला भारताला सोपवण्यास न्यायालयाने मंजुरी दिली होती. त्यातंर्गतच आता राणाला लवकरच भारतात आणण्याच्या हालचालींना वेग आला आहे.



### राणावरील आरोप काय?

मुंबई हल्ल्यात तहव्वुर राणा याचा हात असल्याचे मुंबई पोलिसांनी सांगितले होते. दोषारोपपत्रातसुद्धा त्याचे नाव आहे. तो पाकिस्तानच्या इंटर सर्व्हिसेज इंटेलिजेंस आणि दहशतवादी संघटना लष्कर-ए-तयब्बाचा सक्रिय सदस्य असल्याचा त्याच्यावर आरोप आहे. मुंबई हल्ल्यातील मास्टरमाईंड डेव्हिड कोलमॅन हेडली याला राणा याने या हल्ल्यासाठी मदत केल्याचे तपासात समोर आले होते. त्याने हल्ल्यापूर्वी मुंबईतील काही ठिकाणांची रेकी केली होती, असा आरोप आहे.

# बीड गावकऱ्यांचे जलसमाधी आंदोलन

**बीड :** मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणी सीआयडी तपास वेगाने सुरु आहे. या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड स्वत:हून पुण्याच्या सीआयडी कार्यालयात शरण आला आहे. एकीकडे याप्रकरणाचा पोलीस तपास वेगाने सुरु असताना, दुसरीकडे बुधवारी (दि.१) बीडमधील मस्साजोगमधील गावकऱ्यांनी जलसमाधी आंदोलन करण्यात आले. यावेळी एका आंदोलक महिलेची प्रकृती बिघडल्याची घटना घडली आहे. तिला रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

# पोल्ट्री व्यवसाय धोक्यात

## केंद्र आणि राज्य सरकारने लक्ष देण्याची मागणी

। मुंबई । प्रतिनिधी ।

पोल्ट्री क्षेत्राशी संबंधित अंडी आणि चिकन व्यवसायावर दोन मोठे धोके निर्माण झाले आहेत. यावर लवकर तोडगा निघाला नाही तर देशाला अन्नसुरक्षेची हमी देणारे हे क्षेत्र मागे पडेल. सध्या एक मुद्दा कोंबड्यांना जिवंत ठेवण्याशी संबंधित आहे आणि दुसरा मुद्दा पोल्ट्री फार्मर्सच्या जीवनाशी संबंधित आहे. देशात लाखो पोल्ट्री फार्मर्स आहेत. दोघांनाही प्रत्येक परिस्थितीत आनंदी राहणे या क्षेत्रासाठी खूप महत्त्वाचे आहे. अन्यथा पोल्ट्रीचा झपाट्याने वाढणारा आलेख कधीही खाली येऊ शकतो.

पोल्ट्री इंडिया आणि इंडियन पोल्ट्री इक्विपमेंट मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे अध्यक्ष उदयसिंह बायस म्हणाले की, मक्याचा प्रश्न नवीन नाही. गेल्या दीड वर्षांपासून आम्ही या समस्येशी झगडत आहोत. सरकार लवकरच काही पावले उचलेल, अशी आशा होती. या विचारसरणीमुळे कुक्कुटपालन करणारेही अत्यल्प नफ्यात काम करत होते. मात्र, आता अंडी आणि कोंबडीवर नफा मिळवणे अवघड झाले आहे. कोंबड्यांना खाद्य देणेही महाग झाले आहे. मक्याचे भाव सातत्याने वाढत आहेत. अनेक प्रमुख कारणांमुळे मक्याचा तुटवडाही जाणवत आहे.

> पोल्ट्री क्षेत्र वाचवायचे असेल तर राज्य आणि केंद्र सरकारला मिळून लवकरात लवकर हस्तक्षेप करावा लागेल. अन्यथा, पोल्ट्री फार्मर्सना सध्याच्या समस्येला तोंड देणे कठीण होत आहे.
> – उदयसिंह बायस, अध्यक्ष

### चुकीच्या अफवांचा फटका

उदय सिंह पुढे म्हणतात की, पोल्ट्री क्षेत्राला केवळ बाजाराच्या समस्यांचा सामना करावा लागत नाही, काही लोक सोशल मीडियावर पोल्ट्रीशी संबंधित अफवा पसरवत असतात. आता कोंबड्यांना अंड्यासाठी स्टेरॉईड्स दिले जात असल्याचा अपप्रचार केला जात आहे. हे पूर्णपणे चुकीचे आहे. जर पोल्ट्री फार्मर्सने कोंबड्यांना स्टिरॉइड्स देण्यास सुरुवात केली तर खर्चात लक्षणीय वाढ होईल. मग बाजारात अंडी सात-आठ रुपयांपेक्षा जास्त विकली जातील. त्याचबरोबर चिकनचे भावही गगनाला भिडू लागतील. त्याचप्रमाणे अधिक अंडी आणि कोंबडी मिळण्यासाठी अँटिबायोटिक्स दिल्याच्या अफवाही पसरवल्या जातात.

## जानेवारीच्या बिलात घसघशीत सूट | गो-ग्रीन सेवेचा पर्याय निवडणाऱ्या ग्राहकांना सवलत

# महावितरणकडून ग्राहकांना नवीन वर्षाची भेट

। मुंबई । प्रतिनिधी ।

नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच महावितरण कंपनीने त्यांच्या ग्राहकांना नवीन वर्षाची भेट म्हणून गो-ग्रीन सुविधा निवडणाऱ्या ग्राहकांना वीज बिलावर १२० रुपये सूट देण्याची घोषणा केली आहे. 'कागद वाचवा, पर्यावरण वाचवा' या संकल्पनेंतर्गत महावितरणकडून गो-ग्रीन सुविधा राबविण्यात येत असल्याचे सांगण्यात आले आहे. या योजनेंतर्गत महावितरणच्या ग्राहकांना त्यांच्या मासिक वीज बिलावर १० रुपयांची सूट दिली जाते. अशातच आता पुढील बारा महिन्यांसाठी पहिल्याच वीज बिलात १२० रुपयांची सूट देण्यात आलीये.

महावितरणच्या ग्राहकांनी जर गो-ग्रीन सुविधेचा पर्याय निवडला तर त्यांना छापील कागदी वीज बिलांऐवजी ईमेलद्वारे वीज बिल पाठवण्यात येणार आहे. महावितरणने हा निर्णय गो-ग्रीन ग्राहकांसाठी घेतला आहे.

३ कोटी एलटी ग्राहकांपैकी आतापर्यंत केवळ ४ लाख ६२ हजार म्हणजेच १.१५ टक्के ग्राहकांनी महावितरणच्या गो-ग्रीन सुविधेचा पर्याय निवडला आहे. सध्या या सुविधेचा ग्राहकांनी जास्तीत जास्त फायदा घ्यावा यासाठी किंवा गो-ग्रीन सुविधेचे प्रमाण अधिक होण्यासाठी महावितरणने गो-ग्रीन पर्याय निवडणाऱ्या ग्राहकांना वर्षाच्या सुरुवातीलाच वीज बिलामध्ये १२० रुपयांची सूट देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सर्व वीज ग्राहकांना महावितरणकडून गो-ग्रीन सुविधेचा पर्याय निवडण्यासाठी एसएमएस पाठविण्यात येणार आहेत.



> जर ग्राहकांची मागणी कायम राहिल्यास पुढील वर्षीदेखील वीज बिलांवर १० रुपये मासिक सवलत देण्यात येईल. त्यामुळे या योजनेचा जास्तीत जास्त ग्राहकांनी लाभ घ्यावा. त्यासोबतच अधिक माहितीसाठी ग्राहकांनी www.mahadiscom.in वर लॉग इन करावे.
> – महावितरण

# शेतकऱ्याचा आत्मदहनाचा प्रयत्न

। धाराशिव । प्रतिनिधी ।

दुभती गाय चोरीला जाऊन पाच महिने झाले, तरी तीचा शोध लागत नसल्याने संतप्त पशुपालक शेतकऱ्याने बुधवारी (दि.१) लोहारा पोलिस ठाण्यासमोर अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी वेळीच रोखल्यामुळे अनर्थ टळला. दरम्यान, पोलिसांनी या पशुपालक शेतकऱ्यावर प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे.

माकणी येथील नागनाथ गणपती शिंदे शेती करतात. सरकारचे चुकीचे धोरण आणि निसर्गाच्या अवकृपेमुळे शेतीव्यवसाय अडचणीत आला आहे. शेती व्यवसायावर घरप्रपंच चालवणे मुश्किल झाल्यामुळे शिंदे यांनी शेतीला जोडधंदा म्हणून ४ गायी घेऊन दुग्ध व्यवसाय सुरू केला. यातून घरखर्चाला हातभार लागत होता. परंतु, गेल्या पाच महिन्यापूर्वी शेतातील शेडमध्ये बांधलेली दुभती गाय चोरीला गेली. याबाबत पोलिसांत रितसर तक्रार दिली. मात्र, पोलिसांनी गायीचा शोध घेतला नसल्याने पशुपालक शेतकरी शिंदे यांनी पोलीस ठाण्यासमोर बेमुदत उपोषण करून पोलीस प्रशासनाचे लक्षवेधून घेतले होते. तरीही पोलिसांनी गायीच्या तपासाकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे संतप्त झालेल्या पशुपालक शेतकरी शिंदे यांनी आत्मदहनाचा इशारा दिला होता.

# निवडक



## पाच शाळांना साहित्य वाटप

**नवीन पनवेल :** ग्रुप ग्रामपंचायत दूंदरेची मासिक सभा सरपंच सुभाष भोपी यांच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायत दूंदरे कार्यालयात पार पडली. या सभे मध्ये दुंदरे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील गावातील नागरिकांचे विविध विविध प्रश्नांवर चर्चा करून मंजुरी देण्यात आली. ग्रामपंचायत सभेनंतर दुंदरे हद्दीतील रिटघर, दूंदरे, दूंदरेपाडा, चिंचवली, शिवनसई, जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षकांना, शाळेला आवश्यक असणारे साहित्य खुर्च्या, टेबल कपाट देण्यात आले. सरपंच, उपसरपंच, सदस्य, शिक्षक कमिटीच्या उपस्थितीत दूंदरे ३ टेबल, ५ खुर्च्या, १ कपाट, १ ग्रंथालय तर रिटघर शाळेला ३० खुर्च्या, १ कपाट, १ ग्रंथालय कपाट, दूंदरे पाडा, चिंचवली, शिवणसई या प्रत्येक शाळेला २ टेबल ५ खुर्च्या १ ग्रंथालय कपाट, शाळांना सुपूर्द करण्यात आले. यावेळी शिक्षकांनी आपले मनोगत मांडत ग्रामपंचायत दुंदरेचे सरपंच सुभाष भोपी व कमिटीचे आभार मानले. या कार्यक्रमाला सरपंच सुभाष पुंडलिक भोपी, उपसरपंच शितल कैलास भोपी तसेच सदस्य महेश महादू पाटील, कमला लहू वाघमारे, शांताराम शंकर चौधरी, प्रलय तुकाराम भोपी, करमेलकर सुप्रिया हनुमान, ललिता संतोष चौधरी, राणी विलास सिनारे, जयदास मारुती चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते.



## ‘ज्येष्ठांचा आदर राखला जाईल’

**रोहा :** तालुक्यातील ज्येष्ठ नागरिक संघटना निरनिराळे स्तुत्य उपक्रम संघटनेचे अध्यक्ष पी.बी. सरफळे रावसाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली गेली अनेक वर्षे करीत आहे. या संघटनेच्या सदस्यांना समाजात मानाचे स्थान असून, त्यांच्या वयाचा विचार करता निरनिराळ्या ठिकाणी सौजन्यशिलतेची वागणूक मिळेल. बँका, रुग्णालये तसेच प्रवासात त्यांना प्राधान्य मिळवून देण्यासाठी आमच्या पोलीस दलातर्फे नेहमीच प्रयत्न राहील. ज्येष्ठ नागरिक हा समाजातील मोठा घटक आहे, असे रोहा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक देविदास मुपडे यांनी सांगितले. ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष पी. बी. सरफळे रावसाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. देविदास मुपडे यांच्या कार्यालयात सदिच्छा भेट दिली. यावेळी संघटनेचे सचिव सुरेश मोरे, खजिनदार प्रकाश पाटील, प्रमुख सदस्य अंनत पाटणकर, शरद गुडेकर, सुधाकर गडकरी, प्रकाश पाटील, नंदकुमार भादेकर, भारत करंबे, चंद्रकांत गावडे, सुरेश मेथा, प्रदीप साखळकर, अरुण देशमुख आणि चिमण सोळंकी आदी सदस्य उपस्थित होते. या भेटीदरम्यान अध्यक्ष पी. बी. सरफळे रावसाहेब यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या पोलीस निरीक्षक यांच्याकडे विशद केल्या.



## विविध कार्यक्रमांचे आयोजन

**नवीन पनवेल :** शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शेतकरी कामगार पक्ष कामोठे कार्यकर्ते त्यांच्याकडून नेत्र तपासणी शिबीर, वृक्षारोपण कार्यक्रम, वह्या वाटपाचे आयोजन २८ डिसेंबर रोजी करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. यावेळी माजी आ. बाळाराम पाटील, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण घरत, पनवेल विधानसभा अध्यक्ष काशिनाथ पाटील, पनवेल जिल्हा चिटणीस गणेश कडू, माजी नगरसेवक प्रमोद भगत आदी उपस्थित होते.



## सांकशी गडावर शिवकालीन मूर्ती

**माणगाव :** रायगड जिल्ह्याच्या पेण तालुक्याच्या सुमारे १० किमी अंतरावर असलेल्या सांकशी गडावर शिवभक्तांना पाण्याचे टाके साफसफाई करताना शिवकालीन तीन शिल्प मूर्ती सापडल्या आहेत. या गड संवर्धन मोहिमेत पेण, पनवेलसह आजूबाजूच्या परिसरातूनदेखील अनेक धारकरी, सेवेकरी उपस्थित होते. रविवार, दि.२९ डिसेंबर रोजी मोहीम राबवण्यात आली. पाण्याचे टाके साफ करताना महादेवाची पिंड, भग्न अवस्थेतील नंदी महाराज आणि हातात धनुष्य बाण घेतलेली गड देवतेची मूर्ती अशा ३ पुरातन मूर्त्या टाक्यातील गाळ काढताना श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या धारकऱ्यांना सापडल्या. आजपर्यंत गडावर ४६ संवर्धन मोहिमा श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या माध्यमातून राबविण्यात आल्या.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- अलिबागमध्ये नामांकित टू व्हीलर शोरुममध्ये अनुभवी मॅकेनिक पाहिजे व शोरुममध्ये काम करायला बाई पाहिजे. (संपर्क : ७५१७७०१८५८/९८२२०६३१६६)
- मेडिकल अेजन्सीज पिंपळभाट येथे कामासाठी मुले व मुली १० वी ते १२ शिक्षण असलेल्या अलिबाग जवळील राहणाऱ्या स्टॉफची जागा खाली आहे. व Driver ची जागा खाली आहे. मो. ९६२३३६६७७८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# डोंगर पोखरुन अवैध उत्खनन जोरात

**• ग्रामस्थांच्या तक्रारीला केराची टोपली • सहा वाड्यांतील ग्रामस्थ भयभीत**

| म्हसळा | वार्ताहर |

**दिघी-पुणे राष्ट्रीय मार्गावरील माणगाव ते म्हसळा दिघी हा ६० किमी अंतराच्या रस्त्याचे बांधकाम विकासक ठेकेदाराकडून सुरु आहे. रस्त्याच्या बांधकामाला लागणाऱ्या दगड खाणीसाठी सन २०१८ मध्ये ग्रामस्थांचा विरोध डावलून घोणसे सरपंचाच्या मध्यस्थीने हमरस्त्याचे काणसेवाडीलगतच मोठे डोंगर खोदून खडी दगड उत्खनन करण्यास परवानगी घेतली होती. दिघी-पुणे राष्ट्रीय मार्गाचे काम वर्षभरापूर्वी पूर्ण झाले आहे.**



सहा वर्षे झाली तरी एकाच परवानगीवर दगड खाणीचे उत्खनन सुरूच आहे. येथे पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास झाला असून, शासनाचा किती महसूल बुडाला याचा काही मोजमाप नसले तरी डोंगर पोखरून मोठ्या प्रमाणावर होत असलेले अवैध उत्खनन हे महसूल विभाग आणि ग्रामपंचायतीच्या डोळ्यादेखत छुप्या मार्गाने अर्थसहाय्याचे जोरावर मनमानी पद्धतीने आणि राजरोसपणे सुरू असल्याची लेखी तक्रार ग्रामस्थांचे वतीने योगेश महागावकर यांनी केली आहे.

मागील सहा वर्षे घोणसे ग्रामपंचायत हद्दीतील काणसेवाडी लगत राष्ट्रीय मार्गाला लागूनच मोठ्या प्रमाणात दगड खानीचे उत्खनन सुरू आहे. माणगाव ते दिघी हा ६० किमी अंतराचा काँक्रिट रस्ता पूर्ण झाला तरी दगड खाण संपलेली नाही. इतका मोठा घबाड या खानीतून उत्खनन होत आहे. संपूर्ण डोंगर पोखरून दगड खान खोलवर खोदण्यात आली असल्याचे निदर्शनास येत आहे. यामुळे पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास झाला आणि तो सातत्याने सुरू आहे. ग्रामसभेत खाणकाम बंद करण्याचा ठराव संमत करण्यात आला असूनदेखील मागल्या दाराने सरपंच यांचा हात असल्याची ग्रामस्थांमध्ये चर्चा सुरू आहे. यातून मागील सात वर्षांत ग्रामपंचायतीला आणि म्हसळा महसूल विभागाला उत्खननातून किती महसूल मिळाला याचा शासनाने तपास करणे गरजेचे आहे. अनधिकृत दगड खाण उत्खनन करण्यास कोणाचे छुपे हात आहेत ते शोधून काढणे आवश्यक आहे.

> “उत्खनन होत असलेल्या दगड खाणीत ४० फूट खोल बोर मारून जिलेटीनच्या कांडीने ब्लास्ट करून मोठ्या प्रमाणात उत्खनन करण्यात येत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे. ब्लास्ट कधी आणि कसे झाले याची तारीख, वार, वेळेची नोंद तक्रार अर्जात नमूद केली आहे.”
>
> – योगेश महागावकर, तक्रारकर्ते

### घरांना तडे, प्रशासनाचे दुर्लक्ष

**खाणीत ब्लास्ट उत्खनन होत असल्याने काणसेवाडीसह देवघर आणि घोणसे गावाच्या सहा वाडीत हादरे बसून घरांच्या भिंतीना मोठ्या प्रमाणात तडे गेले आहेत. देवघर आणि घोणसे ग्रामपंचायत हद्दीतील बहुतांश गावे ही डोंगर माथ्यावर वसलेली आहेत. खाणीत ब्लास्ट करून उत्खनन करण्यात येत असल्याने जमिनीला हादरे बसून येथील गावांची ऐन पावसाळ्यात मालीन दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तशी भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.**

## अग्निशमन वाहन शोभेचे बाहुले

**वाहनचालक पद मंजूर नसल्याने धूळखात**

| तळा | वार्ताहर |

तळा नगरपंचायतीच्या ताफ्यात दाखल झालेले अग्निशमन वाहन शोभेची वस्तू बनली असून, या वाहनाला वाहनचालक पद मंजूर करण्यात आले नसल्याने गेल्या दहा महिन्यांपासून ते धूळखात पडले आहे.



तळा हा दुर्गम व डोंगराळ भागात वसलेला तालुका असल्याने या ठिकाणी बऱ्याचदा वणवे लागण्याचे प्रमाण अधिक असते. काहीवेळा आगीचे प्रमाण वाढल्यास आग आटोक्यात आणण्यासाठी रोहा व माणगाव येथून अग्निशमन दलाच्या वाहनाला पाचारण करावे लागते.अंतर लांब असल्याने अग्निशमन दलाचे वाहन येईपर्यंत मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले असते. त्यामुळे तळा नगरपंचायतीच्या ताफ्यात स्वतंत्र अग्निशमन वाहन असावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून केली जात होती. त्यानुसार अग्निशमन सेवा बळकटीकरण योजनेंतर्गत जवळपास नव्वद लाख रुपयांचे अग्निशमन वाहन दहा महिन्यांपूर्वी तळा नगरपंचायतीच्या ताफ्यात दाखल झाले. मात्र, हे वाहन हाताळण्यासाठी वाहन चालक पद मंजूर करण्यात आले नसल्याने या वाहनाचा काहीही उपयोग होताना दिसत नाही.

सध्या सर्वत्र गवत सुकून मोठे झाले असल्याने नागरिकांकडून ते जाळले जात आहे. अशातच अनवधानाने आग पसरल्यास त्या ठिकाणी आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन वाहनाचा मोठा उपयोग होईल. परंतु, सद्यः स्थितीत हे वाहन हाताळण्यासाठी वाहनचालकच नसल्याने आपत्कालीन परिस्थितीत या अग्निशमन वाहनाचा कोणताही उपयोग होणार नसल्याचे सध्याचे चित्र दिसत आहे.

## बाळकृष्ण भगत यांचे निधन

| भाकरवड | वार्ताहर |



अलिबाग तालुक्यातील शहापूर ग्रामपंचायत हद्दीतील मोठे शहापूर गावचे बाळकृष्ण मारुती भगत यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी रविवार, दि २२ डिसेंबर २०२४ रोजी निधन झाले. निधनाची बातमी कळताच संपूर्ण पंचक्रोशीवर शोककळा पसरली आहे. स्व. बाळकृष्ण भगत यांनी अहोरात्र शेती केली आणि मंडप डेकोरेशनचा धंदा केला. ते वारकरी संप्रदायाचे सक्रिय सभासद होते. भगत यांच्या पार्थिव मोठे शहापूर गावाच्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पार्थिवावर एकता मंडळ मोठे शहापूर चे सदस्य प्रकाश थळे यांनी पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. तसेच निवृत्तीदास साधक मंडळ मोठे शहापूर, अमरनाथ भगत महाराज, होळी ग्रुप, तीन गाव सप्ताह समिती यांनी पार्थिवावर पुष्पहार अर्पण केला. बाळकृष्ण भगत यांच्या पश्चात पत्नी भीमाबाई, नितीन, निलेश, निकेश भगत, नातू, सुना, असा मोठा परिवार आहे. त्यांचे उत्तरकार्य तेरावे शुक्रवार दि. ३ जानेवारी रोजी राहत्या घरी होणार आहे, अशी माहिती कुटुंबियांनी दिली.

## साळाव जेएसडब्ल्यू वसाहतीत चोरट्यांचा डल्ला

| रेवदंडा | वार्ताहर |

मुरूड तालुक्यातील साळाव येथील जेएसडब्ल्यू कंपनी वसाहतीत अज्ञात चोरट्यांनी एकाच दिवशी पाच घरे फोडून त्यामधील रोख रक्कम व सोन्याची दागिने असा ऐवज लंपास केला. यामुळे पोलिसांसमोर नवे आव्हान उभे केले आहे.

याबाबत रेवदंडा पोलिस ठाणे येथे रहिवासी त्रेपन्न वर्षीय राजेंद्र वासुदेव रोटकर यांनी नोंदविलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, ते राहात असलेला खोलीचा लॅच लॉक तोडून बेडरूममधील ठेवलेल्या रूपये ९० हजार किमतीचे प्रत्येकी एक तोळाप्रमाणे ३ तोळ्याचे तीन सोन्याचे धातूचे हार, ७५ हजार किमतीचे दोन सोन्याच्या बांगड्या वजन अंदाजे सव्वा तोळे, ३० हजार रूपये किमतीचे दोन सोन्याच्या कानातील कुड्या वजन अंदाजे प्रत्येक अर्धा तोळा, १२ हजार रूपये किमतीच्या दोन सोन्याच्या धातूच्या लहान मुलींच्या कानातील कुड्या अंदाजे ०.५ ग्रॅम, दोन लाख रूपये, ५०० रूपये दराच्या भारतीय चलनातील ४०० नोटा, असे एकूण ५ लाख २८ हजार ५०० रूपये किमतीचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी चोरी व लबाडीचे हेतूने लंपास केला.

## अनुसया कचरे यांचे निधन

| खांब | वार्ताहर |



रोहा तालुक्यातील धानकान्हे गावच्या रहिवाशी असणाऱ्या अनुसया उमाजी कचरे यांचे रवि. दि.२९ डिसेंबर रोजी वयाच्या सुमारे ८५ व्या वर्षी राहत्या निवासस्थानी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुलगे, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार असून, त्यांचे दशक्रियाविधी मंगळवार, दि.७ जाने. रोजी तर अंतिम धार्मिक विधी गुरूवार दि.९ जाने. रोजी निवासस्थानी होणार आहे.

## ३ ते ६ जानेवारीदरम्यान लायन्स किहीम फेस्टिव्हलचे आयोजन

| अलिबाग | प्रतिनिधी |

लायन्स क्लब मांडवा विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात अग्रेसर आहे. याच सामाजिक दायित्वाच भाग म्हणून आणि विविध उद्योजक व ग्राहक वर्ग यांना एकत्र आणून त्यांच्यामध्ये सुसंवाद व्हावा या उद्देशाने ३ ते ६ जानेवारी या कालावधीत राजा शिवछत्रपती क्रीडांगण, किहीम येथे चार दिवसीय लायन्स किहीम फेस्टिव्हल आयोजित करण्यात आले आहे. या फेस्टिव्हलमध्ये विविध प्रकारचे १०० स्टॉल्स फेस्टिव्हलप्रेमींसाठी आकर्षणाचे केंद्र असणार आहेत.

लायन्स किहीम फेस्टिव्हलमधून संकलित होणार निधी सोगाव येथे बांधल्या जात असलेल्या अकरा गुंठे जागेतील सहा मजली ‘लायन्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल’साठी आणि चोंढी येथील लायन्स पॅथॉलॉजी लॅबसाठी वापरला जाणार आहे. या फेस्टिवलचे उद्घाटन शुक्रवार, ३ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता होणार आहे. तसेच सोमवार, ६ जानेवारी रोजी शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत समारोप होणार आहे.

या फेस्टिव्हलमध्ये खवय्यांसाठी मटण, चिकन, मच्छी, तसेच मोदक, पुरणपोळी आदींचे फूड स्टॉल्स असून इतर स्टाल्समध्ये विविध प्रकाची उत्पादने, साडी, ड्रेसमटेरियल, वेगवेळ्या प्रकारची भांडी आदी असणार आहे. या फेस्टिव्हलचे चेअरमन मोहन पाटील असून नियोजन समितीत लायन्स हेल्थ फाऊंडेशनचे उपाध्यक्ष नितीन अधिकारी, अमिष शिरगावकर, अरविंद घरत, धवल राऊत, हर्षद पाटील, सुबोध राऊत, अभिजीत गुरव, प्रदीप पाटील, विद्या अधिकारी, मृदुला राऊत, सारिका पाटील आणि लायन्स क्लब मांडवाचे अध्यक्ष जितेंद्र ठाकूर आदी पदाधिकारी, सदस्य आहेत.

## ‘तो’ जीवघेणा खड्डा ठरतोय अपघातांचा हॉटस्पॉट

| पाली | वार्ताहर |

पाली-खोपोली राज्य महामार्गावर (५४८ अ) दिवसागणिक अपघाताच्या संख्येत वाढ होत आहे. हा महामार्ग अनेक ठिकाणी अपघातांचा ‘हॉटस्पॉट’ बनला आहे. या मार्गावर शेमडी तुकसई हद्दीत रस्त्याच्या मधोमध भला मोठा खड्डा पडला असून, हा खड्डा अपघातला आमंत्रण देत आहे. या महामार्गाची जबाबदारी असलेले महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे अधिकारी मात्र या अपघाती क्षेत्राकडे अक्षम्य दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे.




ऐन सुट्टीच्या दिवसात रस्त्यावरून वाहनांची रेलचेल वाढल्याने खड्डा अचानक दिसून येत नाही मात्र या खड्ड्यात वाहने जोरात आपटली जात आहेत. तर मोटारसायकल खड्ड्यात आदळून मोटारसायकस्वार पडत आहेत. हा खड्डा चुकविण्याच्या नादात वाहनांचे अपघात होत आहेत. तर खड्ड्यात आदळून वाहनांचे टायर फुटत आहेत.

या महामार्गावरून प्रवास करताना अपघातात अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. कारगाव ते तुकसई शेमडी दरम्यान अपघाती क्षेत्र वाढली आहेत. निमुळता रस्ता, वळणावळणाचा रस्ता, चढ उताराचा रस्ता असल्यामुळे बेदरकारपणे वेगात आलेली वाहने दिसून येत नाहीत परिणामी अपघात होतात. दिवसागणिक या मार्गावर अपघात होत आहेत.नुकतेच काही दिवसांपूर्वी शेमडी गावच्या हद्दीत वळणावर दोन तरुण युवकांना आपला जीव गमवावा लागला आहे.

> “रात्रीच्या वेळी प्रवास करताना वळणावर समोरून आलेले वाहन दिसत नाही. दिशादर्शक फलकांचा अभाव असल्याकारणाने वाहनचालक बेदरकारपणे वाहन चालवितात. बरेच दिवसांपासून रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यामुळे खड्डा चुकविताना वाहने अंगावर येतात.”
>
> – मनोज साळुंखे, प्रवासी

## उघड्यावरील अन्नपदार्थ खाऊ नयेत : डॉ. गुणे

| उरण | वार्ताहर|



उरण तालुक्यातील दिघोडे गावातील एका टपरीवर उघड्यावरील शोरमा हा खाद्यपदार्थ खाल्याने अनेकांना पोटात मळमळणे-दुखणे, उलट्या, जुलाबसारखं वाटत असल्याने पनवेल येथील गुणे रुग्णालयात उपचाासाठी दाखल करण्यात आले आहे. तसेच मंगळवारी (दि.३१) एका शोरमाबाधित रुग्णाला रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले आहे. सध्या त्या रुग्णांची प्रकृती चांगली असली तरी नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्यांना संबंधित प्रशासन परवानगी देतेच कशी, असा सवाल डॉ. गिरीश गुणे यांनी उपस्थित करुन लहान मुलांनी, नागरिकांनी उघड्यावरील अन्नपदार्थ खाऊ नयेत, असे आवाहन केले आहे. घटनेचे वृत्त वाऱ्यासारख पसरताच नागरिकांमध्ये घबराटाचे वातावरण निर्माण झाले.तर शासकीय आरोग्य विभागाने तातडीने यावर ठोस उपाययोजना करण्यासाठी तसेच शोरमाबाधित रुग्णांना मोफत वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी गावागावात रुग्णांची तपासणी सुरू केल्याची माहिती तालुका आरोग्य विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.

**चारशे शेतकऱ्यांची भातविक्रीसाठी नोंदणी | मार्केटिंग फेडरेशनच्या माध्यमातून केंद्र सुरू**

# नेरळ येथे भाताची हमी भावाने खरेदी

| नेरळ | प्रतिनिधी |

**मार्केटिंग फेडरेशनचे माध्यमातून भाताची हमी भावाने खरेदी करण्यात येते. त्यासाठी नेरळ येथील केंद्रावर बुधवारपासून भाताची हमी भावाने खरेदी केली. नेरळ, कळंब भागातील ४०० शेतकऱ्यांनी आपल्या भाताची विक्री करण्यासाठी नोंदणी केली आहे.**




कर्जत तालुक्यात खरीप हंगामात सर्वाधिक पीक भाताचे घेतले जाते. यावर्षी सरत्या पावसामुळे भाताचे पीक शेतकऱ्यांच्या हातातून गेले आहे. पावसामुळे भाताच्या पिकावर आणि उत्पन्नावर मोठे परिणाम झाले आहेत. तरीदेखील शेतकऱ्यांनी भाताचे पीक गोळा करून साठवून ठेवले आहे. कर्जत तालुक्यात भाताची सर्वाधिक शेती केली जात असल्याने भाताचे पीक प्रत्येक शेतकऱ्यांच्या घरात जमा होते. त्यामुळे कर्जत तालुक्यातील नेरळ सर्वसाधारण गटातील शेतकऱ्यांसाठी आणि कशेळे आदिवासी भागासाठी जी भाताची खरेदी केंद्र सुरु होणे आवश्यक आहेत, तशी मागणी शेतकऱ्यांनी कर्जत तहसीलदार यांच्याकडे केली होती. नेरळ खांडा येथील ११०० क्विंटल क्षमता असलेल्या गोदामात भाताचे हमी भाव केंद्र सुरू झाले. या केंद्राचे उद्घाटन नेरळ विविध विकास कार्यकारी सोसायटीचे अध्यक्ष राजेंद्र विरले यांचे हस्ते विक्रीसाठी आलेल्या भाताचे पूजन करून झाली. त्यानंतर ज्येष्ठ संचालक नारायण तरे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून भाताची खरेदी सुरू झाली. भाताची हमी भावाने विक्री करण्यासाठी आलेल्या पहिले शेतकरी कोल्हारे गावातील राहुल हजारे यांचे स्वागत संस्थेचे वतीने करण्यात आले. यावेळी उपसभापती रवींद्र झांजे, संचालक सावळाराम जाधव, शशिकांत मोहिते, नारायण तरे, यशवंत कराळे, विष्णू कालेकर, धोंडू आखाडे आदी उपस्थित होते.

**भाताचे दर..**
सर्वसाधारण.. प्रति क्विंटल २३००/-
उच्च दर्जा... प्रति क्विंटल २३२०/-

> “यावर्षी शासनाने २०२४-२५ पीक पाणी नोंद झालेली नाही. त्यात अनेक शेतकरी आधार लिंक नसलेले मोबाईल घेऊन येत असतात. त्यामुळे ऑनलाईन करण्यात अडचणी येत आहेत.”
>
> – विष्णू कालेकर, संचालक

# पंचायत समितीत मनसेचे ठिय्या आंदोलन

## जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांनी दिले भेटीचे पत्र



**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील पंचायत समितीच्या शिक्षण विभागातील गैरकारभारामुळे विद्यार्थी आणि पालकांची अक्षम्य हेळसांड होत असून, याप्रश्नी प्रभारी गटशिक्षण अधिकारी यांनी वेळोवेळी दुर्लक्ष केल्याप्रकरणी पोलादपूर पंचायत समितीच्या शिक्षण विभागामध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे उत्स्फूर्त ठिय्या आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनावेळी रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी पुनिता गुरव यांनी येत्या १७ जानेवारी रोजी संबंधित समस्या सोडविण्यासाठी उपस्थित राहण्यासाठी भेट देणार असल्याचे लेखी पत्र मनसे पदाधिकाऱ्यांना दिल्यामुळे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले असले तरी नव्या वर्षामध्ये विद्यार्थी व पालकांच्या समस्या सोडविण्यासाठी मनसैनिक सज्ज झाले आहेत, अशी माहिती तालुका अध्यक्ष दर्पण दरेकर आणि महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे तालुकाअध्यक्ष ओंकार मोहिरे यांनी दिली.

पोलादपूर तालुक्यातील २०२१ च्या साखर सुतारवाडीतील भूस्खलनावेळी मयत झालेल्या दोन विद्यार्थिनींच्या पालकांना कोणत्याही प्रकारचे सानुग्रह अनुदान देण्याबाबत शिक्षणविभागाने कार्यवाही न केल्याने तसेच अन्य एका विद्यार्थिनीला सातवी इयत्तेमध्ये असूनही शैक्षणिक नोंदीअभावी पुन्हा पाचवी इयत्तेमध्ये शिकण्यास सांगण्यात आल्याच्या दोन प्रमुख मुद्दयांसह अनेक शैक्षणिक समस्यांची जंत्री यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे तालुकाअध्यक्ष ओंकार मोहिरे यांनी तसेच मनविसेच्या पदाधिकाऱ्यांनी मांडली असता प्रभारी गटशिक्षणाधिकारी वसावे आणि शिक्षण विस्तार अधिकारी सुभाष साळुंखे यांनी रायगड जिल्हा परिषदेतून भोपळे व अन्य अधिकारी शिक्षण विभागातून येणार होते. मात्र, लोणेरे येथूनच ते काही महत्वाच्या कामासाठी पुन्हा जिल्हा परिषदेकडे रवाना झाल्याची माहिती दिल्याने मनसे आणि मनविसेचे कार्यकर्ते व पदाधिकारी आक्रमक झाले.

यावेळी जिल्हा मनसे सचिव अमोल पेणकर, पोलादपूर तालुका अध्यक्ष दर्पण दरेकर, शहरअध्यक्ष राकेश सलागरे, शहर उपाध्यक्ष प्रफुल्ल पांडे, मुश्ताक मुजावर, तुषार पवार, गणेश कासुर्डे, महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे तालुका अध्यक्ष ओंकार मोहिरे, शहर उपाध्यक्ष आदेश गायकवाड आदींनी ठिय्या दिला. नतंर प्रशासन जागे झाले.

### अलिबाग नगरपरिषद

**ई-निविदा सुचना सन २०२५-२६**

अलिबाग नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकडील संप हाऊस वरील पंप देखभाल दुरूस्ती करणे कामी ई निविदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर ई निविदा सुचना शासनाच्या https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०२/०१/२०२५ पासुन उपलब्ध होईल. सदर कामाच्या निविदा प्रक्रियेत कोणताही बदल/सुधारणा असल्यास वरील संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेंत येईल.

सही/-
**मुख्याधिकारी**
**अलिबाग नगरपरिषद**

## खालापूर येथे पोषण आहार वाटप



**। रसायनी । वार्ताहर ।**

प्रधानमंत्री निक्षय पोषण योजनेंतर्गत खालापूर तालुक्यातील क्षयरोग मुक्त ग्रामपंचायतमध्ये येणारे क्षयरोग रुग्ण यांना कोरडा आहार (फूड बास्केट) याचे वाटप खालापूर तहसीलदार अभय शिवाजीराव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.

पूरक पोषण आहार रोगापासून व्यक्तीला दूर ठेवण्यास मदत करतो. त्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार क्षय रुग्णांसाठी निक्षय पोषण योजना आधार ठरत आहे. एप्रिल २०१८ पासून ही योजना केंद्र सरकारने कार्यान्वित केली आहे. प्रामुख्याने संसर्गातून हा आजार होता. बहुतांश वेळा प्रतिकार शक्तीची कमतरतेमुळे प्रामुख्याने व्यक्ती या आजाराला बळी पडतो. थुंकीचे नमुने, एक्सरे काढल्यानंतर तपासणी अंती क्षयरोगाचे रुग्ण निदर्शनास येतात. खाणपानात झालेला बदल पाहता नागरिकांची प्रतिकारशक्ती कमी झाल्याने हा आजार बळावतो, असे डॉ. अनिलकुमार शहा यांनी सांगितले. त्यादृष्टीने अशा बाधीत रुग्णांसाठी केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सुचनेनुसार १ एप्रिल २०१८ पासून उपचारावरील सर्व क्षय रुग्णांसाठी निक्षय पोषण आहार योजना अर्थात पोषण आहार भत्ता योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत नियमित उपचार घेणाऱ्या क्षय रुग्णांना उपचार कालावधीत यात ५०० रुपये दरमहा पोषण आहार भत्ता देण्यात येतो. आदिवासी भागा करीता हा भत्ता ७५० रुपये असल्याची माहिती मिळते. पोषण युक्त आहार या रुग्णांना मिळावा व त्यांचे आरोग्य सुधारावे हा सकारात्मक दृष्टीकोण समोर ठेवून महानगर गॅस यांच्या सहकार्याने, डॉ.अनिलकुमार यांनी राबविलेला उपक्रम स्तुत्य आहे, असे प्रतिपादन तहसीलदार अभय चव्हाण यांनी केले.

यावेळी खालापूर वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अनिलकुमार शहा, नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांच्या हस्ते पोषण आहार वाटप करण्यात आले. यावेळी पोलीस पाटिल संघटनेचे अध्यक्ष अनंत ठोंबरे पाटील, सूरज तडवी, महेंद्र पिंगळे, समाधान धनवे, हनुमंत गोवारी, स्वाती गावडे यांच्यासह आरोग्य कर्मचारी, रुग्ण उपस्थित होते.

## एकशे दहा लिटर डिझेलची चोरी

**नवीन पनवेल :** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या गाडीतून ११० लिटर डिझेलची चोरी केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. २२ डिसेंबर रोजी बाळकृष्ण पिंटूळे, एसटी चालक हे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची गाडी क्रमांक एम एच २० बी एल २२०८ घेऊन निघाले. २३ डिसेंबर रोजी रात्री एकच्या सुमारास गाडी शिरूर येथून मुंबईच्या दिशेने घेऊन निघाले. पहाटे चारच्या सुमारास लोणावळ्यावरून कळंबोलीकडे जाणाऱ्या द्रुतगती महामार्गावर जेएनपीटी मार्गाकडे जाणाऱ्या वळणावर गाडीच्या समोरील दोन्ही टायर जाम झाले. प्रवाशांना दुसऱ्या गाडीमध्ये बसून दिले. गाडी दुरुस्त केली. २४ डिसेंबर रोजी सकाळी आठच्या दरम्यान चेंबूर नाका येथे गाडी बंद पडली. यावेळी डिझेलच्या टाकीचे झाकण उघड्या अवस्थेत दिसले. अनोळखी इसमाने ११० लिटर डिझेलची चोरी केली.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे- नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील क्षेत्राचे वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. राजेश प्रकाश कलाणी यांचे कडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे- नागांव ता - अलिबाग, जि. रायगड.**

| भुमापन क्रं. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रु. पैसे) | प्रकार |
|---|---|---|---|
| ३५/२/१ | ००.२९.०० पो.ख. ००.०२.०० एकूण ००.३१.०० | ०२.९२ | वर्ग - १ |

वर वर्णीत मिळकतीत श्री. राजेश प्रकाश कलाणी यांचे नावे असणारे क्षेत्र ००.०३.४०. हे. आर आकार ००.४७ रु. पैसे. क्षेत्र या नोटीसीचा विषय आहे.

वर वर्णन केल्या प्रमाणे क्षेत्राची जमिन मिळकती ह्या त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्या बाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीं वर अथवा तिचे कोणत्याही भागावार कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरीहक्क या व अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत आल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा ) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखीस्वरूपात आणून द्यावीत, मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काच्या आहेत व त्यावर अन्य कुणाचा ही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०२/०१/२०२५

**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु. नागांव, ता. अलिबाग
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

### जाहीर नोटीस

आमचे आशील यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे:-

मौजे कावीर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. २१९, क्षेत्र ०.५८.८० (हे.आर.), पो. ख. ०.०५.१० (हे.आर.), एकूण क्षेत्र ०.६३.९० (हे. आर.), आकार १२.३७ (रु.पैसे) या मिळकतीपैकी विद्यमान मालक चंद्रकांत जानु शिरीषकर, रा. मुंबई यांच्या मालकी व हिश्यात असलेले ०.२१.३० हे. आर इतके क्षेत्र जाण्या येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह माझे आशीलांस विकत देण्याबाबत वाटाघाट केलेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझे आशिलांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, वारसा हक्क, वहीवाटीचे हक्क, कुळ हक्क वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन आमचे आशील विद्यमान मालकांबरोबर व्यवहार ठरवून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक -०२/०१/२०२५

**(ॲड. परेश एम. घरत)**
तळमजला, अशोका शॉपींग सेंटर,
एस. टी. स्टॅंड जवळ, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड,

दिनांक ०१/०१/२०२५

प्रति,
श्री. ----
संचालक, पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्या.
पेण, ता. पेण,जि.रायगड

**विषय :- संस्थेचे रिक्त संचालक पद भरणेबाबत.....**

पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्या. पेण,ता.पेण,जि.रायगड या संस्थेच्या रिक्त झालेल्या संचालक पदाची निवडणूक घेणेकरीता मा. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड- अलिबाग यांचे कार्यालयाकडील आदेश दिनांक ०७/१०/२०२४ नुसार अध्यासी अधिकारी म्हणुन माझी नियुक्ती करण्यात आलेली आहे.

उक्त आदेशानुसार रिक्त संचालक यांची निवड ही 'सर्वसाधारण' या प्रवर्गातून/मतदार संघातून पद रिक्त झालेले आहे. त्या प्रवर्गातील उमेवारांची निवड करण्यात येईल.

सभेचा विषय : पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्या.पेण या संस्थेच्या संचालक मंडळाच्या रिक्त झालेल्या 'संचालक'यांची निवड करणे.

**संचालक निवड करणेकरीता खालील प्रमाणे निवडणूक कार्यक्रम करणेत आलेला असून त्यानुसार कामकाज करणेत येईल.**

**निवडणूक प्रक्रिया राबविणेचे ठिकाण** : पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्या.पेण या संस्थेचे ''नारायण भिकाजी दाबके'' सभागृहात.

| | |
|---|---|
| १. नामनिर्देशन पत्र वाटप | दिनांक ०९/०१/२०२५ दुपारी १२-०० ते १२-३० वा. |
| २. नामनिर्देशनपत्र स्विकृती | दिनांक ०९/०१/२०२५ दुपारी १२-०० ते १२-४५ वा. |
| ३. नामनिर्देशनपत्र छाननी | दिनांक ०९/०१/२०२५ दुपारी १२-४६ ते १-१५ वा. |
| ४. वैध नामनिर्देशन पत्राची यादी प्रसिद्धीची वेळ | दिनांक ०९/०१/२०२५ दुपारी १-१६ ते १-२० वा. |
| ५. नामनिर्देशनपत्र माघार घेण्याची वेळ | दिनांक ०९/०१/२०२५ दुपारी १-२१ ते १-४५ वा. |
| ६. अंतीम उमेदवारांची यादी जाहीर करणे | दिनांक ०९/०१/२०२५ दुपारी १-४६ ते १-५० वा. |
| ७. मतदान | दिनांक ०९/०१/२०२५ दुपारी २-०० वा. ते ३-०० वा.पर्यंत |
| ८. मतमोजणी व निकाल | दिनांक ०९/०१/२०२५ मतमोजणी संपल्यानंतर लगेचच |

**टिप :** १. इच्छूक सभासदांनी नामनिर्देशन पत्रासोबत रिक्त पदासाठी पात्र असलेबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ क अ व नियम १९६१ व संस्थेचे मंजूर उपविधीनुसार संचालक होणेस अपात्र नाही असे घोषणापत्र अध्यासी अधिकारी यांचेकडे नामनिर्देशनपत्रासोबत सादर करावे. (परिशिष्ट २ व परिशिष्ट ३ )
२. नामनिर्देशन पत्राला समिती सदस्यांपैकी एका सदस्याने सूचन करावे व एका सदस्याने अनुमोदन करावे.

ठिकाण : पेण
तारीख : ०१/०१/२०२५

सही/-
**(डॉ. स्मिता गायकवाड)**
**अध्यासी अधिकारी,**
**पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्या.पेण तथा**
**सहाय्यक निबंधक (प्रशासन),**
**सहकारी संस्था, रायगड-अलिबाग**

### SRM E –TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/EHV (O&M) /DIVN/MHD/Tech/E-Tender-43/2024-25 Dtd.02.01.2025 RFX No. 7000034756 | **Sub:-**Invitation SRM E-tender for Stub strengthening of towers of various 220 kV/100 kV Lines under EHV Lines S/Dn. Mahad under EHV (O&M) Dn. Mahad. | Rs.21,05,850/- (including GST + 1% Labour CESS). |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST.
Bid submission is from 02.01.2025 @ 00:00 hrs to 16.01.2025 @23:59 Hrs for above tender
for further details visit our website:-**https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.7373101089
Note:All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**-Sd/-**
**Executive Engineer, EHV(O&M) Dn. Mahad**

### E –TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000034761** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-40/ 2024-2025.** RFx e-tender for supply of manpower with two wheeler for ground patrolling of underground cable route of 220kV Ulwe-Waghivali I & II line for finding of any digging/ excavation/ construction activity by various utilities and providing & fixing of route marker at 50 meters on underground cable route of 220kV Ulwe-Waghivali I & II line under EHV O&M Division Panvel. **Tender amount Rs. 28,95,836/-, EMD amount Rs. 28,958/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **01.01.2025, 18:00 Hrs. to 16.01.2025, 10:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 16.01.2025 up to 10:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **16.01.2025 at 11:05 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**

### E –TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No :-7000034745** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-31/ 2024-2025.** RFx e-tender for work of providing & fixing of 1.1kV XLPE 3.5 core 120 sqmm XLPE power cable at 220/100/22kV Apta Substation under EHV (O&M) Division Panvel. **...2nd call** **Tender amount Rs. 5,17,945/-, EMD amount Rs. 5,179/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **01.01.2025, 18:00 Hrs. to 13.01.2025, 10:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 13.01.2025 up to 10:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **13.01.2025 at 11:05 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**

### दि पनवेल कॉ ऑप अर्बन बँक लि. पनवेल

**सर्व ग्राहकांसाठी जाहीर नोटीस**

बँकेतील आपल्या खात्यासाठी (KYC) कागदपत्रांबरोबर E-mail-Id, संपर्क क्रमांक, वारसदारांचे नामांकन अद्यावत करणे तसेच लॉकर वापरण्याबाबतच्या सुचना.

बँकेच्या सर्व खातेदारांना कळविण्यात येते की, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे तसेच Prevention of Money Landing Act 2002 (as amended)च्या तरतुदीप्रमाणे बँकेच्या मागणीनुसार special आणि KYC केसमध्ये अद्यायावत कागदपत्र आपणास सादर करणे बंधनकारक आहे.

१) लॉकरधारक :- आपण जर लॉकर सुविधा वापरत असाल तर नवा लॉकर भाडे करार केला आहे का याची बँकेत येवून खात्री करावी तसेच आपले लॉकर आपण वर्षभरात किमान दोन वेळा वापरावे.
२)Inoperative / Dormant खात्यासाठी :- आपले खाते आपण कोणत्याही कारणाने सलग २ वर्षे वापरले नसेल तर सदर खाते Inoperative / Dormant म्हणून गणले जाते. सदर खाते परत चालू करण्याकरीता ( कार्यान्वित ) आपण शाखेत असलेले निर्धारित फॉर्म भरून व आपले KYC ची कागदपत्रे सादर करून आपले व्यवहार नियमित चालू करावे. ३) Updation of E-mail-Id / Mobile No / Nominee :- सायबर फसवणुकीचा धोका टाळण्यासाठी तसेच आपल्या खात्याच्या सुरक्षीततेसाठी १) आपला ई मेल व मोबाईल नंबर नोंदवा. २) आपले खाते नामांकन फॉर्म भरून नोंदवा.
४)KYC / C-KYC :- रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार आपण खाते उघडताना आपली KYC कागदपत्रे बँकेस सादर करणे अनिवार्य आहे. त्यानुसार आपल्या खात्याची जोखीम वर्गीकरण केले जाते. आपल्या KYC कागदपत्रांची मुदत संपली असेल अथवा दि.३१.०३.२०२५ अखेर मुदत संपत असेल तर आपणास विनंती आहे कि, आपण KYC – C know your customer / OVD officially valid document च्या पूर्ततेकरीता नोटीस दिनांकापासून ३० दिवसाचे आत अद्यावत KYC कागदपत्रे आपल्या शाखेत सादर करावीत. वरील कालावधीत आपण कागदपत्रे सादर केली नाहीत तर बँकेस आपल्या खात्यावरील व्यवहार नाईलाजास्तव थांबवावे लागतील. जर आपल्या कागदपत्रांमध्ये काहीही बदल नसल्यास ( उदा. नॉमिनी / मोबाईल नंबर / घरचा पत्ता वगैरे ) तर C-KYC करण्यासाठी ''No Change Form'' भरून द्यावा. आपले खाते आमच्या बँकेसाठी बहुमूल्य आहे. ते खाते व्यवहारपूर्ण चालू राहावे यासाठी आपल्या सहकार्याच्या अपेक्षेसह आपण आपल्या शाखा व्यवस्थापकांशी संपर्क साधावा असे सूचित करण्यात येत आहे.

ठिकाण :- पनवेल
दिनांक :- ०१.०१.२०२५

**अजय कुलकर्णी**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि**

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे शिंगढोळ, तालुका - कर्जत, जि. - रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| रॉबर्ट अलमेड | २६ | २ | ०-१६-७० | ०-१२ |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तदंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली जमीन मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. २/१/२०२५

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. स्वप्निल बाबूराव देशमूख**
पत्ता मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं. २४,
डी विंग, मुद्रे बुद्रक, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९२७३२२४६८०/८८३०५६०९६२

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटिसद्वारे कळविण्यात येते की, मौजे नागझरी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिल यांनी मिळकतीचे विद्यमान मालक अनिता रोहीदास चव्हाण ह्यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले असून तसा साठेकरार देखील केलेला आहे.

मिळकतीचे वर्णन तलाठी सजा आंबेपुर हद्दीतील मौजे नागझरी, ता.अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्र. व उपविभाग क्र. ५७, क्षेत्र ०-९४-५० हे. आर. पो. ख. ०-१४-२० (शेती), एकुण १-०८-७० गुंठे आकार १७.१५ रू. पैसे या मिळकतीपैकी ०-२५-०० हे. आर. ही मिळकत सदर जाहिर नोटिसचा विषय आहे.

तरी वर नमुद मिळकतीबाबत अन्य कोणत्याही इसमाचा खरेदीखत नोंदणीकृत /अनोंदणीकृत पतसंस्थेचा, साठेकरार, कुळवहिवाट, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, गहाण, बयाणापावती तारण, भाडेपट्टा या अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी प्रथम दर्शनी लेखी पुराव्यासह आपल्या हरकती खालील पत्त्यावर सदर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात सादर कराव्यात. सदर मुदतीत अशा प्रकारच्या कोणत्याही हरकती न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण होईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची याद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि. ०१/०१/२०२५
दिपिका महेश चवरकर

**ॲड. दर्शन यशवंत बैकर**
जिल्हा न्यायालय अलिबाग
मो.नं. ९२७०९४७४८४

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड)**

ज.म.र.अर्ज ३४/२०२४

**जाहिर नोटीस**

प्रति,
श्रीम कुंदा जगन्नाथ फुंडे — अर्जदार
रा. फुंडे वाडी, पो. चिंचोटी
ता. अलिबाग, जि. रायगड

विरुद्ध

ग्रुप ग्रामपंचायत चिंचोटी,
ता. अलिबाग, जि. रायगड — सामनेवाला

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की,
१.अर्जदार यांचा जन्म दि. ०१/०१/१९६६ रोजी मौजे चिंचोटी, ता. अलिबाग, जि.रायगड येथे त्यांच्या राहत्या घरी झाला आहे.
जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत चिंचोटी कार्यालय यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता अलिबाग न्यायालयांत जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम ११ (२) व (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे.
३. मात्र यांची जन्म नोंद ग्रामपंचायत चिंचोटी येथे केलेली नसल्याने त्यांना जन्म दाखला मिळण्यासाठी जन्म नोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रुप ग्रामपंचायत चिंचोटी यांनी करणेकरीता न्यायालयीन आदेशाची आवश्यकता असल्याचे अर्जदार यांनी तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केलेला आहे.
सदर आदेश देण्यास कोणाचीही हरकत/तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि. २७/१/२०२५ रोजी पर्यंत मे. तहसिलदार अलिबाग तथा कार्यकारी दंडाधिकारी अलिबाग यांचे न्यायालयात हजर राहून आपली हरकत/तक्रार नोंदवावी. मागावून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. यांची कृपया नोंद घ्यावी.

आज दि. १९/१२/२०२४ रोजी माझ्या सही न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

ठिकाण : अलिबाग
तारिख : १९/१२/२०२४

सही/-
**(विक्रम पाटील)**
**तहसिलदार अलिबाग**

# निवडक



## राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन

**अहिल्यानगर :** महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघातर्फे वरिष्ठ गट राज्यस्तरीय गादी व माती अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा व महाराष्ट्र केसरी किताब लढत स्पर्धा २९ जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान वाडिया पार्क येथे आयोजित करण्यात आल्या आहेत. अहिल्यानगरमध्ये महाराष्ट्र केसरी व राज्यस्तरीय गादी व माती अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा घेण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाला देण्यात आला होता. या प्रस्तावावर निर्णय होऊन ही स्पर्धा अहिल्यानगर जिल्हा कुस्तीगीर संघास घेण्याचे पत्र देण्यात आले आहे, अशी माहिती सचिव डॉ. संतोष भुजबळ यांनी दिली. यावेळी महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष संदीप भोंडवे, हिंद केसरी योगेश दोडके, महाराष्ट्र केसरी सईद चाऊस, महाराष्ट्र केसरी अशोक शिर्के, अर्जुन देवा शेळके, शिवाजी चव्हाण, नीलेश मदने, शिवाजीराव कराळे, शंकर खोसे, धनंजय खसे, दत्तात्रय खैरे, दादासाहेब पांडुळे, अतुल कावळे, पंच संभाजी निकाळजे, सोपान बाजीराव काळे, संदीप कर्डिले, शुभम जाधव, योगेश चंदेल आदी उपस्थित होते.




## गौतम गंभीरचा सज्जड दम

**मेलबर्न :** मेलबर्न कसोटीतील पराभवानंतर भारतीय ड्रेसिंग रुममधील बेबनावही समोर आला आहे. ऑस्ट्रेलियन संघाने मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली आहे. आणि उर्वरित सिडनी कसोटी भारतीय संघाने जिंकली नाही तर बॉर्डर गावसकर चषक संघ गमावेलच, शिवाय आयसीसी कसोटी अजिंक्यपदाच्या शर्यतीतूनही बाहेर पडेल. त्यामुळे भारतीय संघावर सध्या विजयाचे दडपण आहे. त्यातच मैदानावर आघाडीच्या फलंदाजांची कामगिरी चांगली होत नाही. आणि गोलंदाजीत जसप्रीत बुमराहला इतरांची साथ मिळत नाही. त्यामुळे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर खेळाडूंवर वैतागले आहेत. चौथ्या कसोटीत संघ प्रशासनाने आखून दिलेल्या रणनीतीचं पालन न केलेल्या खेळाडूंवर गंभीर नाराज असल्याचे दिसत आहे. पराभवानंतर त्याने ड्रेसिंग रुममध्येच खेळाडूंची एक बैठक बोलावली. आणि यात कुणाचंही नाव घेतले नसले तरी 'सांगितलेल्या गोष्टींचं पालन न करता मनमनी करणाऱ्या खेळाडूंना आता खपवून घेणार नाही, असा सज्जड इशाराच गंभीरने दिल्याचे समोर येत आहे.



## भारताचा मोठा आंतराष्ट्रीय विजय

**नवी दिल्ली :** भारतीय महिला फुटबॉल संघाने दि.३० डिसेंबर रोजी आंतरराष्ट्रीय मैत्रीपूर्ण सामन्यात सामनावीर लिंडा कोम सेर्टोचे पदार्पणातील चार गोल तर प्यारी शाशाने अवघ्या आठ मिनिटांत केलेल्या हॅट्ट्रिकच्या जोरावर मालदीवचा १४-० असा पराभव केला आहे. यासह भारताचे नवनियुक्त स्वीडन प्रशिक्षक जोकीम अलेक्झांडरसन यांनी आपल्या कार्यकाळाची सुरुवात शानदार विजयाने केली. मालदीव विरुद्ध दुसरा आणि शेवटचा मैत्रीपूर्ण सामना गुरूवारी (दि.२) खेळवला जाणार आहे. प्रशिक्षक अलेक्झांडरसन यांनी आठ खेळाडूंना पदार्पण करण्याची संधी दिली, त्यापैकी तीन खेळाडूंनी आक्रमणात उत्कृष्ट कामगिरी केली आणि आठ गोल केले. आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधील भारतीय महिला संघाचा हा दुसरा सर्वात मोठा विजय आहे. यापूर्वी बांगलादेशमध्ये २०१० च्या चॅम्पियनशिपमध्ये संघाने भूतानचा १८-० ने पराभव केला होता.



## ऑस्ट्रेलियन पंतप्रधानांची खास भेट

**मेलबर्न :** बॉर्डर गावस्कर मालिकेदरम्यान ऑस्ट्रेलियन पंतप्रधानांनी भारतीय संघाला दुसऱ्यांदा भेटीचे आंमत्रण दिले. भारत विरूद्ध संघांदम्यानच्या सरावसामन्यापूर्वी ऑस्ट्रेलियन पंतप्रथान ॲन्थनी ॲल्बेनस यांनी भारतीय संघांची भेट घेतली होती. नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी पंतप्रधानांनी त्यांच्या शासकीय निवास्थानी दोन्ही संघांची पुन्हा भेट घेतली आहे. एकीकडे ऑस्ट्रेलियन मीडिया भारतीय खेळाडूंवर टीका करत असताना, ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान भारतीय संघाचे आदरातिथ्य करून सातत्त्याने त्यांच्याशी संवाद साधताना पाहायला मिळत आहेत. पंतप्रधानांनी आपल्या इंस्टाग्राम हँडलवरून भारत व ऑस्ट्रेलिया संघांसोबतचा फोटो शेअर केला आहे. ज्यामध्ये भारतीय दिग्गज खेळाडू विराट कोहली सोबतचा फोटो देखील त्यांनी शेअर केला. रोहित शर्माने ऑस्ट्रेलियन खेळाडू व पंतप्रधानांसबोत संवाद साधला. रोहित म्हणाला की, आम्हाला आणखी एक कसोटी सामना खेळायचा आहे. आशा आहे की आम्ही या साममन्यात प्रेक्षकांचे मनोरंजन करू शकू.

### राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा

# सांगलीचे सुवर्ण चढाईत यश

**। सांगली । प्रतिनिधी ।**

**महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.च्या मान्यतेने सांगली जिल्हा कबड्डी असो.ने युवक मराठा मंडळाच्या सहकार्याने ५१व्या कुमार-कुमारी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन सांगलीतील सांगलीवाडी येथील चिंचबाग मैदानावर करण्यात आले आहे. यास्पर्धेत कुमार गटातील पुणे ग्रामीण, रायगड व ठाणे शहर यांनी कुमार गटात उपांत्य फेरी गाठली आहे. यजमान सांगलीला मात्र उपांत्य फेरी गाठण्यासाठी सुवर्ण चढाईपर्यंत झुंजावे लागले.**



या स्पर्धेतील कुमार गटाच्या उपांत्यपूर्व सामन्यात सांगलीने सुवर्ण चढाईच्या डावात नंदुरबारला ३०-२९ असे चकवित उपांत्य फेरी गाठली. सुरवातीपासून अतितटीने खेळला गेलेल्या या सामन्यात पूर्वार्धात १३-१२ अशी आघाडी सांगलीकडे होती. परंतु, नंदुरबारने पूर्ण डावात त्यांना २३-२३ असे बरोबरीत रोखले. ही कोंडी सोडविण्याकरीता ५-५ चढायांचा जादा डाव खेळविण्यात आला. त्यानंतर ही २९-२९ अशा बरोबरीत हा डाव संपला. शेवटी सामन्याच्या नियमानुसार सुवर्ण चढाई देण्यात आली. त्याकरिता पुन्हा नाणेफेक करण्यात आली. यावेळी, नंदुरबारच्या बाजूने नाणेफेकीचा कौल लागला. परंतु, नंदुरबारचा खेळाडू चढाईत गुण घेऊ न शकल्याने पंचाने त्याला बाद दिले. त्यामुळे सांगलीचा संघ उपांत्य फेरीत दाखल झाला. आदित्य येसगुडे, व्यंकटेश वडार यांच्या झंझावाती चढाया त्यांना ओम् शिंदे, प्रतीक जाधव यांची मिळालेली पकडीची भक्कम साथ यामुळे सांगलीला हा विजय मिळविता आला.

दुसऱ्या सामन्यात पुणे ग्रामीणने ५-५ चढाईत कोल्हापूरचे आव्हान ३१-३० असे संपविले. पहिल्या डावात १३-१० अशी आघाडी घेणाऱ्या पुणे ग्रामीणला कोल्हापूरने पूर्ण डावात २५-२५ असे बरोबरीत रोखले. या बरोबरीमुळे दोन्ही संघाना ५-५ चढाया देण्यात आल्या. त्यात एका गुणांनी पुणेकरांनी बाजी मारली. प्रणव भांगर, साहिल माने यांच्या चढाई पकडीच्या खेळाला या विजयाचे श्रेय जाते. तिसऱ्या सामन्यात रायगडने परभणीवर ३८-३३ अशी मात केली. विश्रांतीला १९-१२ अशी आघाडी घेणाऱ्या रायगडला परभणीने नंतर कडवी लढत दिली. राज मोरे, नीरज मिसाळ यांच्या दमदार चढाया त्यांना समीर हिरवे, हर्ष सुकर यांची मिळालेली भक्कम बचावाची साथ यामुळेच रायगडने हे साध्य केले.

शेवटच्या सामन्यात ठाणे शहरने मुंबई उपनगर पश्चिमचा ३७-३३ असा पाडाव केला. आक्रमक सुरुवात करीत ठाण्याने पहिल्या डावात २१-१२ अशी मोठी आघाडी घेतली. दुसऱ्या डावात उपनगरने आपला खेळ गतिमान करीत ही आघाडी कमी करीत आणली. परंतु, संघाला विजयी करण्यात ते कमी पडले. आफताब मंसूरी, आदित्य पिनाने, सोहम जाधव यांच्या सर्वांगसुंदर खेळाने ठाण्याने हा विजय साकारला.

## वार्षिक सर्वसाधारण सभा

**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा क्रिकेट असो.च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन सोमवारी (दि.१३) सकाळी अकरा वाजता पेण येथे करण्यात येणार आहे. याबाबत दि.२८ डिसेंबर रोजी असो.चे सर्व पदाधिकारी, कार्यकरणीचे सदस्य, आश्रयदाता सदस्य, हयात सदस्य, सामान्य सदस्य, सर्व क्लब व अकॅडमीचे सदस्य व माजी खेळाडू यांना या सभेला उपस्थित राहण्यासाठी नोटीस द्वारे कळविण्यात आले आहे. ज्या सदस्यांना नोटीस मिळाली नसेल तर या प्रसिद्धी माध्यमाद्वारे सभेला उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष अनिरुद्ध पाटील व सचिव प्रदिप नाईक यांच्यावतीने करण्यात आले आहे. रायगड जिल्हा क्रिकेट असो.च्यावतीने जिल्ह्यातील क्रिकेट खेळाच्या विकास व विविध वयोगटातील स्पर्धेचे आयोजन करण्याविषयी चर्चा करणे तसेच जिल्ह्यातील क्रिकेटच्यासर्वांगीणविकासासाठी महत्त्वाचे निर्णय या सभेत घेतले जाणार असल्याची माहिती प्रदिप नाईक यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे.

# शिवराज्याभिषेकाचा देखणा सोहळा संपन्न

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**



मुरुड तालुक्यातील साळाव येथील जिंदल विद्या मंदिरात नुकतेच वार्षिक स्नेहसंमेलन, सत्कार आणि पारितोषिक वितरण समारंभ कार्यक्रम संपन्न झाला. यंदाच्या कार्यक्रमाचे शीर्षक 'धरोहर' होते, ज्याअंतर्गत 'आपली संस्कृती, आपला वारसा' हा विषय प्रत्येक नृत्यातून सादर करण्यात आला. यावेळी, शिवराज्याभिषेक सोहळ्याचे भव्य आणि देखणे सादरीकरण या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले.

या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून साळाव येथील जे.एस. डब्ल्यू. कंपनीचे प्रमुख पंकज मलिक आणि नीलू मलिक हे उपस्थित होते. समारंभादरम्यान प्राचार्य मुकेश ठाकूर यांनी शाळेचा वार्षिक प्रगती अहवाल सादर केला, ज्यामध्ये शैक्षणिक, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय कामगिरीचे विवरण होते. तसेच, त्यांनी शिक्षकवृंद आणि पालकांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी, विद्यार्थ्यांनी 'शालेय जीवन', 'झाडे लावा, झाडे जगवा', 'मोबाईलचे दुष्परिणाम', 'सुर-असुर' आणि 'मंगल पांडे' (जीवन कहाणी) या विषयांवर नृत्य सादर केले. तसेच, सर्वांचे आकर्षण ठरलेले शिवराज्यभिषेक सोहळ्याचे सादरीकरण करण्यात आले. सर्व शालेय विद्यार्थ्यांनी आकर्षक शिवकालीन पोशाख व दमदार सरावामुळे हा शिवराज्यभिषेक सोहळा देखणा व दिमाखदार पणे संपन्न झाला. प्रत्येक नृत्यातून 'आपली संस्कृती, आपला वारसा' हा विषय प्रभावीपणे मांडण्यात आला, ज्यामुळे उपस्थितांचे मनोबल उंचावले.

दरम्यान, पंकज मलिक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आत्मविश्वास, परिश्रम आणि नेतृत्वगुणांच्या महत्त्वावर भर दिला. त्यांनी छ. शिवाजी महाराजांचे आदर्श आणि ध्येयवादी दृष्टिकोन आजच्या पिढीने आत्मसात करण्याचे आवाहनही केले. यावेळी, उत्कृष्ट शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

## महाराष्ट्राचा सलग पाचवा विजय

**। मुंबई । प्रतिनिधी ।**



सध्या देशात सुरू असलेल्या विजय हजारे राष्ट्रीय एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत 'ब' गटातले आपले वर्चस्व कायम ठेवणाऱ्या महाराष्ट्राने सलग पाचवा विजय मिळवत बाद
फेरी जवळपास निश्चित केली आहे. त्यांनी या सामन्यात सिक्कीमचे आठ गडी बाद करून आणि ९६ चेंडू राखून एकतर्फी विजय मिळवला आहे.

मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात महाराष्ट्राने प्रथम फलंदाजी करणाऱ्या सिक्कीमला ५० षटकांत ८ बाद २३४ असे रोखले आणि त्यानंतर विजयाचे हे आव्हान ३४ षटकांत पार केले. या स्पर्धेत फॉर्मात असलेल्या ओम भोसले याने पुन्हा एकदा सातत्य दाखवले; परंतु, तो शतकापासून ६ धावा दूर राहिला. १०१ चेंडूत त्याने ९४ धावांची खेळी केली. सिद्धेश वीरनेही आपले सातत्य राखले. त्यानेही ४९ चेंडूत ६४ धावांची खेळी साकार केली. यष्टीरक्षक फलंदाज निखिल नाईकने नाबाद ४६ धावा फटकावल्या. तत्पूर्वी, प्रथम फलंदाजी करताना सिक्कीमने ३२ षटकांत ३ बाद १४४ अशी सुरुवात केली होती; परंतु, त्यानंतर त्यांना ९० धावाच अधिक करता आल्या.

# दिल्लीत होणार कबड्डी स्पर्धा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

दिल्ली येथे दि. ३ ते ८ जानेवारी या कालावधीत होणाऱ्या अखिल भारतीय नागरी सेवा कबड्डी स्पर्धेकरीता स्नेहल साळुंखे या खेळाडूच्या खांद्यावर महाराष्ट्राच्या महिला संघाची धुरा सोपविण्यात आली आहे. या महिला संघात तिच्या सोबत सुवर्णा बारटक्के व सायली जाधव यांचा देखील समावेश आहे. तसेच, सलग ६ वर्ष महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधीत्व केलेल्या अंकुश महाले याच्यावर महाराष्ट्राच्या पुरुष संघाचे नेतृत्व सोपविण्यात आले आहे. या संघात निलेश चिंदरकर हा अनुभवी खेळाडू आहे. ४ दिवसाच्या सरावानंतर हा संघ बुधवारी (दि.१) रात्री स्पर्धेकरीता दिल्लीला रवाना झाला आहे.

अखिल भारतीय नागरी सेवा कबड्डी स्पर्धेकरीता महिला संघात स्नेहल साळुंखे (कर्णधार), सुवर्णा बारटक्के, सायली जाधव, प्रियांका तावडे, कल्पिता शिंदे, मनीषा जगताप, मनीषा मानकर, स्वाती काकडे, अलका निमसे, वैशाली खरमाळे, माधवी राऊळ, सारिका क्षीरसागर, जयश्री साठे, ज्योती राक्षे यांची निवड करण्यात आली असून प्रशिक्षक म्हणून संतोष जाधव, तर व्यवस्थापक म्हणून गणेश भोईर हे जबाबदारी पार पाडणार आहेत. तसेच, पुरुष संघात अंकुश महाले (कर्णधार), निलेश चिंदरकर, मारोती पवार, शुभम मोठे, अजिंक्य महाले, विक्रम कदम, सूरज कांबळे, बालाजी क्षीरसागर, शुभम सुर्वे, कुणाल शिंदे, विशाल कोटमे, नागराज जाधव, नितीन मोरे यांची निवड करण्यात आली असून प्रशिक्षक म्हणून आनंदा हेगडे, तर व्यवस्थापक म्हणून जयवंत शेट्ये जबाबदारी पार पाडणार आहेत.

## रोहि-राटची घसरण

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघातील वरिष्ठ खेळाडू विराट कोहली व रोहित शर्मा खराब कसोटी फॉर्मशी झगडत आहेत. विराटचे शतक वगळता दोघांचीही कामगिरी खराब राहिली आहे. २०२४ मधील निराशजनक कामगिरीमुळे रोहित व विराट यांच्या कसोटी रँकिंगमध्ये घसरण झाली आहे. कसोटी क्रमवारीत अनेक युवा फलंदाजांनी त्यांना मागे टाकले आहे. ६३३ रेटींगसह विराटच्या क्रमवारीत ३ क्रमांकांनी घसरण झाली आहे. तो आयसीसी कसोटी क्रमवारीत २४ व्या क्रमांकावर आला असून २३ व्या क्रमांकावर पाकिस्तानचा पदार्पणवीर सलमान अघा आहे. त्याचबरोबर रोहितची आयसीसी कसोटी क्रमवारी ३५ व्या क्रमांकावरून ५ क्रमांकांनी घसरली आहे. रोहित सध्या ५६० रेटींगसह ४० व्या स्थानावर आहे.

# साईराज स्पोर्ट्सची नेताजीवर मात

**। मुंबई । प्रतिनिधी ।**



मुंबई शहर कबड्डी असो.ने आयोजित केलेल्या जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा वडाळा येथील भारतीय क्रीडा मंदिराच्या पटांगणावर पार पडत आहेत. या स्पर्धेत श्री साईराज स्पोर्टस आंबेवाडी मंडळ, ज्ञानेश्वर मंडळ व श्री गणेश क्लब यांनी पुरुष द्वितीय श्रेणीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.

या स्पर्धेत पुरुष द्वितीय श्रेणी गटातील श्री साईराज स्पोर्ट्स आंबेवाडी मंडळने ५-५ चढायांच्या डावात वीर नेजाजीचा प्रतिकार ३३-३२ असा संपविला. पूर्वार्धात ११-१९ अशा पिछाडीवर पडलेल्या आंबेवाडीने पूर्ण डावात २७-२७ अशी बरोबरी साधली. त्यामुळे सामन्याचा निर्णय लावण्याकरीता प्रत्येक संघाला ५-५ चढाया देण्यात आल्या. त्यात आंबेवाडीने ६-५ अशी सरशी साधली. साहिल शेलार, भावेश वाघ यांनी आंबेवाडी कडून, तर आदित्य चव्हाण, विजय कदम वीर नेताजी कडून उत्कृष्ट खेळले.

दुसऱ्या सामन्यात साईराज स्पोर्ट्सने जिजामाता नगर सार्वजनिक गणेश मंडळाचा ३३-२२ असा पाडाव केला. विश्रांतीला ११-०६ अशी आघाडी घेणाऱ्या साईराजने नंतर देखील त्याच तडफेने खेळत आपला विजय साकारला. जिजामाताचा जयदास पायमोळी चमकला. ज्ञानेश्वर मंडळाने श्री गावदेवीला ४५-२८ असे नमवित आगेकूच केली. पूर्वार्धात २५-१० अशी आघाडी घेणाऱ्या ज्ञानेश्वरने उत्तरार्धात आपल जोश कायम ठेवत हा विजय साकारला. राहुल जुईकर, प्रणव कणेकर यांच्या चतुरस्त्र खेळाने ही किमया साधली. श्री गावदेवीचे विकास घाग, आदित्य शेलार बरे खेळले.

तिसऱ्या सामन्यात श्री गणेश क्लबने अमेय बिरमोळे, श्रीकांत मोरे यांच्या चतुरस्त्र खेळाच्या जोरावर हिंदकेसरीचा ३०-१६ असा सहज पराभव केला. हिंद केसरीचा प्रणव वराडकरची लढत एकाकी ठरली. शिवनेरी मंडळाने जय खापरेश्वरचा ३१-१२ असा, तर श्री साईनाथ मंडळाने बाल उत्कर्षला ३१-११ असे पराभूत करीत आगेकूच केली.

### परागचे आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिनिधित्व | २ सुवर्ण, ११ रौप्य, ३ कांस्यपदकांची कमाई

# ऑलिम्पिक विजेता चालवतोय टॅक्सी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**



देशात अनेक असे खेळाडू आहेत, जे ऑलिम्पिकमध्ये देशाचे प्रतिनिधित्व करत असतात. परंतु, त्यांचे पुढे काय होते? याबाबत खूप कमी जण उत्सुक असतात. त्यांना आपल्या उदरनिर्वाहासाठ इतर मार्ग अवलंबवावे लागतात. अशातच भारतासाठी २ सुवर्ण, ११ रौप्य आणि ३ कांस्यपदक जिंकणारे पराग पाटील सध्या मुंबईत ओला टॅक्सी चालवत असल्याचे मुंबईतील एका युवा उद्योजकाने जगासमोर आणले आहे.

मुंबईतील उद्योजक आर्यसिंग कुशवाह याने सोशल मिडीयावर एक पोस्ट करत म्हटले की, माझा ओला चालक एक ऑलिम्पिअन आहे. पराग पाटील, ज्येष्ठ ऑलिम्पिअन. तिहेरी उडी प्रकारात आशिया खंडात दुसरे स्थान मिळवलेले, तसेच लांब उडी प्रकारात आशिया खंडात तिसरे ठरलेले पराग पाटील. प्रत्येकवेळी त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे प्रतिनिधित्व केले. कोणतीही स्पर्धा असो ते कधीच रिकाम्या हाताने परतले नाहीत. देशासाठी त्यांनी २ सुवर्ण, ११ रौप्य आणि ३ कांस्यपदक पटकावले आहे. तरीही त्यांच्याकडे कोणतेही आर्थिक साधन नाही, अशी व्यथा त्याने मांडली आहे.

तसेच, पराग यांच्या कुटुंबाला हातभार लावण्यासाठी पुरेसा निधी नाही. त्यांना त्यांच्या ॲथलेटिक कारकीर्दीवर पाणी सोडावे लागले. पराग यांना जो कोणी मदत करू शकेल, त्या प्रत्येकासाठी ही पोस्ट आहे. जेणेकरून पराग पुन्हा भारताचे प्रतिनिधित्व करून आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताला विजय मिळवून देतील. असे त्याने आवाहन देखील केले आहे.

### पराग पाटील यांची कारकिर्द

पराग पाटील यांनी ३०व्या वर्षी आपली नोकरी सांभाळत आंतरराष्ट्रीय ॲथलेटिक म्हणून आपल्या कारकीर्दीला सुरुवात केली. त्यांनी २०१३ च्या आंतरराष्ट्रीय दिग्गज ऍथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये पहिल्यांदा देशाचे प्रतिनिधित्व केले. या स्पर्धेत त्यांनी देशासाठी ३ रौप्य पदके पटकावली होती. त्यांनी २०१५ मध्ये झालेल्या ऑस्ट्रेलियन मास्टर्स गेम्ससह अनेक स्पर्धांमध्ये भाग घेतला. यामध्ये त्यांनी २ सुवर्ण तसेच २ रौप्यपदक पटकावले. एका माहितीनुसार, आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांसाठी पराग पाटील यांनी इटलीमधील वरिष्ठ ऑलिम्पिकमध्ये भाग घेण्यासाठी तब्बल १७ टक्के मासिक व्याजदराने पैसे घेतले. तरीही त्यांना निधीच्या कमतरतेमुळे त्यांनी अनेक कष्ट सहन करत १ रौप्य आणि २ कांस्यपदके जिंकली आहेत.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)